CMYK

सोलापूर तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | सोमवार, ९ मार्च २०२६ | वर्ष ४ थे अंक १ ला | पाने १२ | किंमत रु. ६/- | ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



संस्कृतीची त्यागाची प्रेरणा असल्यामुळे दुसऱ्याच्या अधिकाररक्षणासाठी अथवा समष्टीच्या कल्याणासाठी त्याग करणारे आपल्या रचनेत महान समजले गेले. पितृवचनासाठी सत्तेचा त्याग करणारे राम, वृत्रासुराला मारण्यासाठी अस्थिदान करणाऱ्या दधीचींपासून उदयपूरच्या गादीचा वंशदीपक उदयसिंह जीवित राहावा म्हणून स्वपुत्राचे बलिदान देणारी पन्नादाई- देशाला स्वतंत्र करण्यासाठी आत्माहुती देणारे सर्व क्रांतिकारक आपल्या देशात पूज्य मानले गेले.

**पं. दीनदयाल उपाध्याय**
पूर्व अध्यक्ष, भारतीय जनसंघ


## महत्त्वाचे

### अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा आजपासून

**नवी दिल्ली** : संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा सोमवार ९ मार्चपासून प्रारंभ होत असून पहिल्या दिवशीच म्हणजे सोमवारी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याविरुध्द काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी दाखल केलेला अविश्वास प्रस्ताव चर्चेला येणार आहे. नियमाप्रमाणे अध्यक्षांविरुध्द अविश्वास प्रस्ताव अधिवेशनाच्या पहिल्या दिवशीच चर्चेला घ्यावा लागतो. चर्चेनंतर या प्रस्तावावर मतदान होणार आहे. आपल्याविरुध्दच्या अविश्वास प्रस्तावावर निर्णय होत नाही तोपर्यंत सभागृहात न येण्याची भूमिका अध्यक्ष ओम बिर्ला यांनी घेतली आहे. त्यामुळे अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी ते सभागृहात येणार नाहीत. मात्र अविश्वास प्रस्ताव फेटाळल्यानंतर मंगळवारपासून ते लोकसभेच्या कामकाजात भाग घेतील, असे मानले जाते.

# भारत पुन्हा विश्वविजेता

## सॅमसन, ईशान, अभिषेकची तडाखेबंद फलंदाजी



**सामनावीर बुमराहचे १५ धावांत ४ बळी**

◆ **अहमदाबाद, ८ मार्च**

आयसीसी पुरुषांच्या टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात नरेंद्र मोदी स्टेडियमवर सुमारे ९० हजार प्रेक्षकांच्या उपस्थितीत सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने मिचेल सॅण्टनरच्या नेतृत्वाखालील न्यूझीलंड संघाचा ९६ धावांनी पराभव करून सलग दुसऱ्यांदा टी-२० विश्वचषक जिंकला.

भारताच्या ५ बाद २५५ धावांना प्रत्युत्तर देताना न्यूझीलंडचा संपूर्ण संघ १९ षटकांत १५९ धावांतच गारद झाला.

प्रथम फलंदाजी करताना भारताच्या पहिल्या फळीतील खेळाडूंनी धुव्वाधार फलंदाजी केली. संजू सॅमसन (८९), अभिषेक शर्मा (५२) व ईशान किशनने (५४) या पहिल्या फळीतील फलंदाजांनी धडाकेबाज फलंदाजी करत भारताच्या डावाचा पाया भक्कम केला. संजू सॅमसन आणि अभिषेक शर्माने ४३ चेंडूंत ९८ धावांची सलामी भागीदारी केली. रचिन रवींद्रने अभिषेकला सेफर्टकडून झेलबाद करून ही सलामीची जोडी फोडली. सूर गवसलेल्या अभिषेकने अवघ्या २१ चेंडूंत ६ चौकार व ३ षट्कारांसह ५२ धावांची अर्धशतकी खेळी केली.



**संजू सॅमसनची पुन्हा विजयी खेळी**
**धावा ८९**
**चेंडू ४६**
**चौकार ५**
**षट्कार ८**

**सॅमसन-ईशानची १०५ धावांची भागीदारी**

पुढे सॅमसन व ईशान किशन या जोडीनेही न्यूझीलंडच्या गोलंदाजांचा खरपूस समाचार घेत दुसऱ्या गड्यासाठी १०५ धावांची भागीदारी करून भारताला २०० धावांचा टप्पा ओलांडून दिला. मध्यम गती वेगवान गोलंदाज जेम्स निशामच्या गोलंदाजीला बळी पडण्यापूर्वी सॅमसनने पुन्हा एकदा आपल्या बॅटची चमक दाखवित ४८ चेंडूंत ८९ धावांची खेळी केली, यात त्याने ५ चौकार व ८ षट्कार खेचले. दरम्यान ईशान किशननेही आपले अर्धशतक साजरे केले, मात्र तोही सॅमसनच्या पाठोपाठ निशामच्या गोलंदाजीला बळी पडला. ईशान किशनने २५ चेंडूंत ४ चौकार व ४ षट्कारांच्या मदतीने ५४ धावांची खेळी केली. तोपर्यंत भारताने १५.५ षटकांत ३ बाद २०४ धावांचा टप्पा गाठला. कर्णधार सूर्यकुमार यादवकडून मोठ्या खेळीची अपेक्षा होती, परंतु तोही भोपळा न फोडताच भारताच्या याच धावसंख्येवर बाद झाला. निशामने सूर्यकुमारच्या रूपाने आपला तिसरा बळी घेतला.

तिलक वर्मा व शिवम दुबेने नाबाद खेळी करत भारताला २० षटकांत ५ बाद २५५ अशा आव्हानात्मक धावा रचून दिल्या. तिलकने ६ चेंडूंत नाबाद ८ धावांची, तर शिवमने ८ चेंडूंत ३ चौकार व २ षट्कारांच्या मदतीने नाबाद २८ धावांची खेळी केली.

न्यूझीलंडकडून जेम्स निशामने ३ बळी, तर मॅट हेनरी व रचिन रवींद्रने प्रत्येकी १ बळी टिपण्यात यश मिळविले.

**न्यूझीलंडची घसरगुंडी**

विजयासाठी २५६ धावांचा पाठलाग करताना न्यूझीलंडची त्रेधातिरपीट उडाली. सलामीवीर टीम सेफर्टवगळता पहिल्या फळीतील इतर फलंदाज एक अंकी

*(वृत्त शेवटच्या पानावर)* ▸

### भारताने घडविला इतिहास

कोणत्याही संघाने तीन वेळा टी-२० विश्वचषक जिंकला नाही. सलग दोन वेळा कुणीही स्पर्धा जिंकली नाही आणि कोणत्याही देशाने मायदेशात टी-२० विश्वचषक जिंकला नाही, हा सर्व पराक्रम सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने रविवारी नरेंद्र मोदी स्टेडियमवर अंतिम सामना जिंकून तिसऱ्यांदा टी-२० विश्वचषक जिंकण्याचा इतिहास घडविला.

भारताने यापूर्वी दोनदा आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक जिंकला आहे. २००७ मध्ये महेंद्रसिंह धोनीच्या नेतृत्वाखाली आणि २०२४ मध्ये रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारताने टी-२० विश्वचषक जिंकला. आता सूर्यकुमारने भारताला सलग दुसऱ्यांदा विश्वचषक जिंकून दिला. इंग्लंड आणि वेस्ट इंडीजसह ते स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात यशस्वी संघांपैकी एक आहेत.

# अमेरिकन सैनिक इराणमध्ये घुसणार

## ट्रम्प यांचा जमिनीवरून हल्ल्याचा इशारा

◆ **वॉशिंग्टन, ८ मार्च**



व्हेनेझुएलामध्ये राबविण्यात आलेली 'ऑपरेशन ॲब्सोल्युट रिझोल्व'सारखी मोहीम इराणमध्ये लवकरच होईल, आता तेथे जमिनीवरून कारवाई करण्याची वेळ आली आहे. इराणी सत्ताधारी एकतर मारले जातील किंवा त्यांना अटक करून अमेरिकेत आणले जाईल, असा इशारा राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शनिवारी पत्रपरिषदेतून दिला.

अमेरिकेने व्हेनेझुएलाच्या नवीन सरकारला औपचारिकपणे मान्यता दिली आहे आणि सोने आणि इतर खनिजांसाठी ऐतिहासिक करार केला आहे. इस्रायल आणि अमेरिकेच्या कारवाईत इराणचे मोठे नुकसान झाले. त्यांच्याकडे शस्त्रांची कमतरता आहे. आतापर्यंतची कारवाई यशस्वी झाली. आता लवकरच जमिनीवरून मोहीम राबवली जाईल असे ट्रम्प यांनी सांगितले. तीन दिवसांत अमेरिकन सैन्याने ४२ इराणी युद्धनौका नष्ट केल्या. त्यांचे वायुदल कमकुवत झाले आहे. पायाभूत सुविधा उद्ध्वस्त केल्याने दळणवळण व्यवस्था कोलमडली आहे. अण्वस्त्रांचा धोका असल्याने आम्हाला तातडीने कारवाई करावी लागली. इराणची परिस्थिती आता खूपच भयानक आहे आणि ते संवाद स्थापित करण्याचा प्रयत्न करीत असल्याचा दावा त्यांनी केला.

◂*(वृत्तसंस्था)*

### रशियाच्या मदतीचा फायदा होणार नाही

आखाती देशातील अमेरिकेची लष्करी आणि हवाई तळांची रशियाकडून इराणला माहिती मिळत आहे का, असा प्रश्न पत्रकारांनी विचारला असता ट्रम्प म्हणाले, रशियाने इराणला कितीही मदत केली, तरी त्याचा फायदा होणार नाही. यासंदर्भात आमच्याकडे पुरावे उपलब्ध नाहीत. जर रशियाकडून असा प्रकार झाल्याचे उघडकीस आल्यास त्यांना मोठी किंमत चुकवावी लागेल. सध्या अमेरिकेकडे पुरेसे तेलसाठे आहेत. संघर्षाचा तेल पुरवठ्यावर परिणाम होणार नाही याची काळजी आम्ही घेणार आहोत.

### शेवटच्या गोळीपर्यंत प्रत्युत्तर देऊ : पेझेश्कियान



**इराणी राष्ट्रपती मसूद पेझेश्कियान म्हणाले, अमेरिकेने जमिनी कारवाई केल्यास त्यांना मोठी किंमत चुकवावी लागेल. शेवटची गोळी शिल्लक असेपर्यंत आम्ही प्रतिकार करू, पण शरणागती पत्करणार नाही. शेजारी देशांची एकता खंडित करण्याचा ट्रम्प यांचा प्रयत्न आहे. आखाती देशांनी अमेरिकेचा डाव ओळखायला हवा. इराण सार्वभौमत्व आणि सुरक्षेशी तडजोड करणार नाही.**

# ३०० कोटी झाडे लावणार

**मुंबई** : महाराष्ट्राचे वनक्षेत्र ३३ टक्क्यांपर्यंत वाढविण्यासाठी ३३० कोटी झाडे लावण्यात येतील आणि वृक्षांचे संवर्धन सुनिश्चित करण्यासाठी सरकारी धोरणात वृक्षसंवर्धनाचा समावेश केला जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी सांगितले. येथे आयोजित 'वृक्ष संवर्धन : दुसरी आंतरराष्ट्रीय वृक्षसंवर्धन परिषद-२०२६'मध्ये देवेंद्र फडणवीस बोलत होते. वृक्षसंवर्धन मूलतः झाडांसाठी एकप्रकारे डॉक्टर उपलब्ध करते. यामुळे तज्ज्ञांना प्रगत तंत्रज्ञानाच्या मदतीने झाडांच्या आरोग्याचे मूल्यांकन करण्यास आणि संवर्धनाचे उपाय करण्यास सक्षम केले जाते.

# बांगलादेशमध्ये काली मंदिरात बॉम्बस्फोट; १५ जखमी

◆ **ढाका, ८ मार्च**

दक्षिण-पूर्व बांगलादेशच्या चितगाव विभागात येणाऱ्या कुमिला जिल्ह्यातील प्रख्यात काली मंदिरात आरती सुरू असताना स्फोट झाला. यात १५ हिंदू नागरिक जखमी झाले. तोंडाला कापड बांधून एका इसमाने मंदिर परिसरात एका पिशवीत स्फोटके ठेवली होती. काही वेळातच त्याचा स्फोट झाल्याचे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात आढळून आले.

एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, मंदिरात शनिवारी रात्री ८ वाजताच्या सुमारास आरती सुरू होती. यावेळी हिंदू भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मंदिर परिसरात भीषण स्फोट झाला. बचाव पथकाने तातडीने १५ जखमींना तातडीने रुग्णालयात हलविले. या घटनेत मंदिराचे नुकसान झाले. सुरक्षा दलाने मंदिराच्या सीसीटीव्ही कॅमेराची तपासणी केली असता, त्यात तोंडाला कापड बांधून एक इसम मंदिरात आला. त्याने तिथे एक स्फोटके असलेली बॅग ठेवली आणि काही वेळातच बॅगेमधील स्फोटकांचा स्फोट होऊन मंदिर परिसर हादरला. स्फोटामध्ये मंदिरातील पुजारी केशव चक्रवर्ती गंभीर जखमी झाले. दरम्यान, मंदिरात स्फोटके ठेवणाऱ्या हल्लेखोरांनी जवळच्या बौद्ध मठावर आणि एका खाजगी कार्यालयावर क्रूड बॉम्ब फेकले. त्यात अब्दुल बारेक आणि जिहाद नावाचे दोघेजण जखमी झाले. सुरक्षा दल आणि तपास यंत्रणा हल्लेखोरांचा शोध घेत आहे. बांगलादेशमध्ये नवे सरकार स्थापन झाल्यानंतर हिंदू मंदिरावर हल्ला झाल्याची ही पहिलीच घटना आहे.

◂*(वृत्तसंस्था)*



सोलापूर : टीम इंडियाने विजय मिळविल्यानंतर छत्रपती शिवाजी चौकात जल्लोष करतानाचा रविवारी रात्री टिपलेला क्षण. (छायाचित्र : केवल तिवारी)



अकलूज - येथे या सामन्याचे प्रक्षेपण मोठ्या पडद्यावर उदयसिंह क्रीडा मंडळाच्या वतीने उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते पाटील यांनी केले होते. सामना जिंकल्यानंतर जल्लोष करताना क्रिकेटप्रेमी.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# स्त्रीशक्तीचा जागर; जिल्ह्यात महिला दिन उत्साहात

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ८ मार्च-

**जिल्ह्यातील विविध शाळा, महाविद्यालयात, संस्था, संघटनांतर्फे जागतिक महिला दिन साजरा करण्यता आला. यावेळी महिलांसाठी वविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. केवळ औपचारिकता न पाळता, प्रत्यक्ष क्षेत्रात काम करणाऱ्या कष्टकरी महिलांपासून ते उच्चपदस्थ अधिकाऱ्यांपर्यंत अनेक कर्तृत्ववान महिलांना व्यासपीठावर सन्मानित करून त्यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. यानिमित्त राबवण्यात आलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांनी महिला दिनाला विशेष उजाळा दिला.**

## आपुलकी प्रतिष्ठान, सांगोला




महिला दिनानिमित्त सांगोल्यातील आपुलकी प्रतिष्ठानच्या वतीने पाच गरजू महिलांना उदरनिर्वाहासाठी आवश्यक वस्तू भेट देत महिला दिन साजरा करण्यात आला. यामध्ये दोन महिलांना शेळ्या, दोन महिलांना शिलाई मशीन तर एका महिलेला पिठाची गिरणी देण्यात आली. दत्तात्रय जाधव, ॲड. सारंग वांगीकर, दत्तात्रय खंडागळे यांच्या हस्ते लाभार्थींना या वस्तू प्रदान करण्यात आल्या. यावेळी आपुलकी सदस्य शहाजी गडहिरे, ॲड. सारंग वांगीकर, दत्तात्रय खंडागळे यांनी मनोगतात हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे नमूद केले. प्रास्ताविक अध्यक्ष राजेंद्र यादव यांनी केले. आभार सोमनाथ सपाटे यांनी मानले.

## श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशालेत निर्मल नार सन्मान



श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात महिला दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माजी आमदार दिलीप माने, प्रमुख पाहुणे म्हणून उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, उपशिक्षणाधिकारी (प्राथ.) जि.प. सोलापूरचे स्मिता नडीमेटला, नगरसेविका अश्विनी चव्हाण, सहा.पोलिस निरीक्षक स्वरांजली खामकर तर प्रमुख उपस्थिती म्हणून इंदिरा ज्ञानवर्धिनी सोलापूर या संस्थेचे सचिव मा. भिकाजी गाजरे, व्याख्याते व माजी निवृत्त प्राध्यापक डॉ. भिमाशंकर बिराजदार, प्राचार्य डी. डी. गाजरे यांची प्रमुख उपस्थिती होती. सुरुवातीस कार्यक्रमाचे अध्यक्ष व मान्यवरांच्या हस्ते स्त्रिशक्तीच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून दिपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. महिला दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या तसेच माता पालकांना 'निर्मल नारी सन्मान २०२६' ने सन्मानित करण्यात आले. पुरस्कारार्थी माता पालकामध्ये चंद्रभागा भडंगे, सिताबाई आदलिंगे, जिजाबाई पाटणकर, कस्तुर कांबळे, सप्पव्वा कट्टीमनी, रुक्मिणी काळे, तनुजा गुंड यांचा समावेश होता तर डॉक्टर सारिका होमकर, नंदिनी जानकर, ललिता बडे, ज्ञानेश्वरी भोसले यांचा समावेश विविध क्षेत्रातील पुरस्कारार्थी मध्ये होता. कार्यक्रमास ६०० हुन अधिक महिला पालकांची उपस्थिती होती. कार्यक्रमानंतर मातापालकासाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. कार्यक्रमास प्राचार्य डी. डी. गाजरे यांचे मार्गदर्शन लाभले. सूत्रसंचालन पूनम चव्हाण यांनी केले तर आभार गायकवाड व्ही. एस. यांनी मानले. संस्थेचे अध्यक्ष ॲड विपीन ठोकळ, संस्थेचे उपाध्यक्ष सचिन ठोकळ, संचालिका सौ. शिल्पा ठोकळ, सचिव भिकाजी गाजरे यांनी नियोजनबाद्ध कार्यक्रमाबद्दल शाळेचे अभिनंदन केले.

## वखारिया विद्यालय, बार्शी



वखारिया विद्यालयात महिला दिन समारंभ उत्साहात संपन्न झाला. प्रारंभी मुख्याध्यापक दयानंद रेवडकर, शिक्षक शंकर शिंदे, प्रमुख पाहुण्या म्हणून कृषी अधिकारी श्रीमती ज्योती खपाले, ब्रांच पोस्ट मास्तर अंकिता बुरगुटे आणि शालेय पोषण आहाराच्या आजी श्रीमती वैजयंता बाकले यांचे हस्ते कर्मवीर डॉ.मामासाहेब जगदाळे आणि क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रांजली सांगुळे, जुई पवार, ईश्वरी नाईकवाडी, कार्तिकी बुरगुटे, राधिका पवार, सृष्टी साळुंखे या विद्यार्थिनींनी कर्तुत्ववान महिलाविषयक मनोगत व्यक्त केले. राजेश्वरी जगदाळे, साक्षी कावरे, तहेनियत बागवान, ज्ञानेश्वरी खुने, श्रावणी बुरगुटे, प्रणाली घाटे, भक्ती डोंगरे या विद्यार्थिनींनी कर्तुत्वान महिलांची वेशभूषा परिधान केली होती. प्रस्ताविक अनुष्का चव्हाण तर सूत्रसंचालन समृद्धी ठोंगे आणि आसावरी काळे या विद्यार्थिनींनी केले.

## महत्वाचे...



### पद्मश्री सुमतीबाई स्कूलमध्ये शैक्षणिक प्रदर्शनाचे आयोजन

**सोलापूर, दि. ८ मार्च-**

पद्मश्री सुमतीबाई इंग्लिश मिडीयम प्री-प्रायमरी व प्रायमरी स्कुलच्या वतीने दोन दिवसीय शैक्षणिक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. प्रदर्शनाचे उद्घाटन एन. बी. नवले, सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे उपप्राचार्य डॉ. आर. टी. व्यवहारे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी त्यांच्यासमवेत व्यासपीठावर प्री-प्रायमरीच्या समन्वयक अर्चना अक्कलकोटे, प्रायमरीच्या पर्यवेक्षिका कल्पना रामावत, हायस्कूलच्या मुख्याध्यापिका स्वाती कांबळे व पर्यवेक्षक जयेश शिरढोणे यांची प्रमुख उपस्थिती होती. धनश्री बारडकर यांनी सूत्रसंचालन केले. तर सहशिक्षिका जयश्री गुंड यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. याप्रसंगी कल्पना रामावत यांच्या हस्ते पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. शिक्षिका संगीता फुटाणे यांनी आभार मानले. प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी देवई शहा यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रम पार पडला.




### अहिल्याबाई प्रशालेत मराठी भाषा दिन

**सोलापूर, दि. ८ मार्च-**


येथील अहिल्याबाई प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रम प्राचार्य इस्माईल शेख यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अध्यक्षा अल्पना जाधव यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून प्रसिद्ध कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमात प्रा.धनाजी धेंडे यांनी मनोगत व्यक्त केल. प्राध्यापिका शितल राठोड यांनी सादर केलेल्या एकपात्री प्रयोगांनी सर्वांची मने जिंकली. सूत्रसंचालन सना कुरेशी यांनी केले तर आभार सहशिक्षिका गुलनाज शेख यांनी मानले.



### भा. वि. स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

**सोलापूर, दि. ८ मार्च-**


श्री सुशीलकुमार शिंदे भा. वि. इंग्लिश मीडियम स्कूलचा स्नेहसंमेलन उत्साहात पार पडला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष संतोष पैकेकरी व मुख्याध्यापिका पूनम सोनटक्के यांनी नटराज मूर्ती पूजन करून कार्यक्रमास सुरुवात केली इयत्ता पहिली ते आठवीच्या मुलांनी वेगवेगळ्या गाणांवर आकर्षक नृत्य सादर केले.



### इंटरमिजिएट व एलिमेंट्री परीक्षेत मल्लिकार्जुन हायस्कूलचे यश

**सोलापूर, दि. ८ मार्च-**

श्री मल्लिकार्जुन हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने घेण्यात आलेल्या रेखाकला परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. इंटरमिजिएट परीक्षेचा शंभर टक्के लागला असून ९ विद्यार्थी ए ग्रेड घेऊन उत्तीर्ण झाले आहेत व एलिमेंट्री परीक्षेचा ९० टक्के निकाल लागला असून या परीक्षेत ९ विद्यार्थी ए ग्रेड ,४ विद्यार्थी बी ग्रेड व ५ विद्यार्थी सी ग्रेड घेऊन उत्तीर्ण झाले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे संस्थापक आप्पासाहेब हत्तुरे, अध्यक्ष सिद्धप्पा वरनाळ, माजी प्राचार्य वैजिनाथ हत्तुरे, मार्गदर्शक धरेप्पा हत्तुरे, प्र. मुख्याध्यापक रमेश दिंडोरे यांनी अभिनंदन केले.



### 'पहाट' उपक्रमांतर्गत जात प्रमाणपत्र वितरण

**सोलापूर, दि. ८ मार्च-**

कुर्डूवाडी पोलीस स्टेशनच्या वतीने 'पहाट' उपक्रमांतर्गत विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात पारधी समाजाच्या नागरिकांना जात प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी उपस्थित नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची माहिती देण्यात आली. भेंड येथे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत उपस्थित मान्यवर आणि नागरिकांच्या हस्ते विविध प्रकारची रोपे लावण्यात आली. 'पहाट' उपक्रमाच्या माध्यमातून सामाजिक सलोखा, पर्यावरण संरक्षण व शासकीय योजनांची जनजागृती करण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. कार्यक्रमास पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, सहापोलीस अधीक्षक अंजना कृष्णा व्ही एस तसेच अतुल मोहिते, पोलीस निरीक्षक, कुर्डूवाडी पोलीस ठाणे व नायब तहसीलदार, ठोंबरे व भडकवाड, माढा तहसील कार्यालय, आदिवासी विकास महामंडळाचे अधिकारी सरतापे तसेच प्रथम एज्युकेशन फाऊंडेशनचे अध्यक्ष दिपक शिरोळे उपस्थित होते.

## इंडियन मेडिकल असोसिएशन टेंभूर्णी



टेंभूर्णी येथे इंडियन मेडिकल असोसिएशन टेंभूर्णी, टेंभूर्णी डॉक्टर्स असोसिएशन, रोटरी क्लब टेंभूर्णी व इनरव्हील क्लब टेंभूर्णी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून स्त्रीरोगतज्ञ डॉ. वंदना गांधी उपस्थित होते.

यावेळी लायन्स क्लब पंढरपूर ड्रीमच्या लायन ललिता कोळवले यांनीही महिलांनी सामाजिक, शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रात धाडसाने पुढे येऊन नेतृत्व करावे, असे आवाहन केले. कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सुमारे २५ ते ३० कर्तृत्ववान महिलांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी नूतन जिल्हा परिषद सदस्या ॲड. अमृता वाघे, पंचायत समिती सदस्या सौ. प्रतिभा खरात, श्रीमती शीला पाटील यांच्यासह आरोग्य, कला, शिक्षण, पोलीस, बँकिंग, शेती आदी क्षेत्रातील प्रतिनिधी, डॉक्टर, रोटरी व इनरव्हील क्लबचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आय.एम.ए.चे डॉ. मदन कांबळे, डॉ. अमित चोपडे, टेंभूर्णी डॉक्टर्स असोसिएशनचे डॉ. लालासाहेब शेंडगे, डॉ. विशाल जाधव, रोटरी क्लबचे रो. दीपक व्यवहारे, रो. संदीप मोकाशी तसेच इनरव्हील क्लबच्या सविता कोकाटे, स्वरूपा बोबडे, स्वराली बोबडे यांचे सहकार्य लाभले.

## भारतीय स्त्री शक्तीच्या सांगोला शाखेला राज्यस्तरीय पुरस्कार




महाराष्ट्र शासनाच्या राज्य महिला आयोगाच्या वतीने ग्रामीण भागात महिलांच्या सक्षमीकरणासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्था व व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. यात भारतीय स्त्री शक्तीच्या सांगोला शाखेला उत्कृष्ट समाजकार्याबद्दल राज्यस्तरीय पुरस्कार महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

याप्रसंगी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, सचिव नंदिनी आवडे, ॲड. मनीषा कायंदे, रवींद्र नाट्य मंदिरच्या संचालिका मृणाल जोगळेकर उपस्थित होते. हा पुरस्कार सांगोला शाखेच्या अध्यक्षा ॲड. राजेश्वरी केदार, सचिवा वसुंधरा कुलकर्णी, सहसचिवा डॉ.चित्रा जांभळे यांनी स्वीकारला.

भारतीय स्त्री शक्ती, शाखा सांगोला ही १ जून २००४ पासून ग्रामीण व दुष्काळग्रस्त भागात महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी कार्यरत आहे.

मैत्रीण कुटुंब सल्ला केंद्र, महिला आरोग्य जनजागृती अभियान, किशोर-किशोरी विकास कार्यक्रम, तेरे मेरे सपने विवाहपूर्व संवाद प्रकल्प, बालविवाह प्रतिबंध संस्थेच्या या सातत्यपूर्ण, पारदर्शक व परिणामकारक कार्याची दखल घेऊन सदर पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## दत्त प्राथमिक विद्यामंदिर, बार्शी

दत्त प्राथमिक विद्यामंदिर बार्शी येथे मातापालक मेळावा घेण्यात आला. माता पालक मेळाव्यात विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. मातापालकांच्या रांगोळी व मेहंदी काढण्याच्या स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेचे नियोजन ललिता चव्हाण यांनी केले. परीक्षक म्हणून युवराज जगताप यांनी काम पाहिले.

स्पर्धानिहाय यशस्वी स्पर्धक; रांगोळी : प्रथम-सोनाली थोरात, द्वितीय-निशा झोळ, तृतीय-शोभा मोरे. मेहंदी : प्रथम-अंजुम शेख, द्वितीय-गायत्री साळवे, तृतीय-लक्ष्मी मोरे. सेवानिवृत्त शिक्षिका सविता बाबतीवाले यांचे हस्ते करण्यात बक्षीस वितरण करण्यात आले. सूत्रसंचालन अरुणा मठपती यांनी केले.

यावेळी पद्मजा झोंबाडे, संगीता काळे, श्रीकांत कुंभारे, सचिन काळे, युवराज जगताप, सुनिल लंगोटे, मंगेश मोरे, ललिता चव्हाण, चंद्रकांत लोखंडे, राहुल ठोंगे, संतोष ठोंबरे, शितल पाटील, संदीप भोरे, श्रीकांत चव्हाण उपस्थित होते.

## रामभाऊ जोशी हायस्कूल, करकंब



महिला सक्षम करावयाच्या असतील तर कुटुंबाची व समाजाची साथ असणे आवश्यक असून देशाचे विकासासाठी महिला सबलीकरण गरजेचे असल्याचे मत प्राध्यापिका अश्विनी शिंगटे यांनी व्यक्त केले. करकंब येथे महिला दिनानिमित्त डी.ए.व्ही.महात्मा आनंद स्वामी सरस्वती जुनिअर कॉलेज व रामभाऊ जोशी हायस्कूल यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी मुख्याध्यापक हेमंत कदम, पर्यवेक्षक धनवंत करळे उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी मनिषा ढोबळे दर्शिका खोबरखेडे, पूजा मोरे, संगीता काळे यांनी मनोगत व्यक्त केले. रांगोळी स्पर्धेत नंबर आलेल्या विद्यार्थिनींना मान्यवरांचे हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. सूत्रसंचालन अतुल अभंगराव यांनी केले तर आभार धनवंत करळे यांनी मानले.

## जिव्हाळा विद्यामंदिर, कुर्डुवाडी



जिव्हाळा सुसंस्कार विद्यामंदिर कुर्डूवाडी येथे जागतिक महिला दिनानिमित्त महिला साक्षरता सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. या सप्ताहाचे उद्घाटन मुख्याध्यापिका सारिका गोटे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर कुर्डूवाडी शहरातून प्रभात फेरी काढण्यात आली. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन मुख्याध्यापिका सारिका गोटे व कुर्डूवाडी नगरपालिकेच्या नगराध्यक्षा जयश्री भिसे यांच्या हस्ते करण्यात आले. ॲड. सुनंदा भगत यांनी महिलांना कायदेविषयक जनजागृती या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. भाग्यश्री पाटील यांनी महिलांसाठी आरोग्य पोषण व स्वच्छता याविषयी मार्गदर्शन केले तर कॉन्स्टेबल कस्तुरे यांनी सायबर सुरक्षितता व पोस्को कायद्याबद्दल माहिती सांगितली. यावेळी महिला पालक प्रतिनिधी प्रियंका गुंजाळ (सरपंच बारलोणी), अनुजा कुलकर्णी (समालोचिका), शहनाज शेख (पंचायत समिती कुर्डूवाडी) शुभांगी गंभीरे (अंगणवाडी सेविका), सुनीता सातव (निवृत्त मुख्याध्यापिका) रचना शहा (उद्योजिका) यांचा सन्मान करण्यात आला. सुमारे १४० पेक्षा अधिक महिलांनी मनोरंजनात्मक खेळात सहभाग घेतला व बक्षीस मिळविले. संस्थापक अध्यक्ष शिवराज वायचळ, सचिव अजित वायचळ यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. सूत्रसंचालन गीतांजली शिंदे आणि निलोफर सय्यद यांनी केले तर आभार साधना झोळ यांनी मानले. कार्यक्रमासाठी साधना झोळ, निलोफर सय्यद, गीतांजली शिंदे, रूपाली गायकवाड, सुवर्णा साळुंके आदींनी परिश्रम घेतले.

## दत्त प्राथमिक व सोपल प्रशाला, बार्शी



दत्त प्राथमिक व सोपल प्रशालेत महिला दिनानिमित्त डॉ. स्वाती भातलवंडे यांचे आरोग्यविषयक मार्गदर्शन आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी छत्रपती क्रीडा, शिक्षण व समाजसेवी संस्था, उपळाई (ठोंगे) संस्थेच्या सचिवा तेजस्वी ठोंगे, प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. स्वाती भातलवंडे, प्रमुख उपस्थिती म्हणून सचिन काळे (मुख्याध्यापक, दिलीपराव सोपल प्रशाला), शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्या पदमजा झोंबाडे, पूजा जगन्नाथ गोरमाळे, संगीता काळे, अरुणा मठपती, श्रीमती शितल पाटील, श्रीमती ललिता चव्हाण उपस्थित होत्या. सूत्रसंचालन श्रीकांत कुंभारे यांनी केले. कार्यक्रमास सचिन काळे, युवराज जगताप, सुनिल लंगोटे, मंगेश मोरे, श्रीमती ललिता चव्हाण चंद्रकांत लोखंडे, राहुल ठोंगे, संतोष ठोंबरे, शितल पाटील हे शिक्षक बंधू भगिनी व सेवक संदीप भोरे, श्रीकांत चव्हाण उपस्थित होते.

## शेळगावात स्त्रीशक्तीचा जागर



शेळगाव (आर), ( ता. बार्शी) येथे जागतिक महिला दिनानिमित्त शेळगाव (आर) येथे एकता महिला मंच यांच्या वतीने विविध उपक्रम आणि स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी एकता महिला मंचने विविध खेळांच्या स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. यामध्ये पारंपारिक खेळांपासून ते आधुनिक मनोरंजक खेळांपर्यंत महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

यावेळी गीतांजली जोशी, सविता काटे, सारीका जाधव, आशा विभुते, पंचशीला बनसोडे, जयश्री बादगुडे, रंजना गवळी, मनिषा गवळी, राणी गवळी, मंजुळा गवळी, वैशाली साळुंके, सोनाली गायकवाड, अश्विनी गोडगे उपस्थित होते.

## गणपतराव साठे विद्यालय, माढा



माढा येथील सहकार महर्षी गणपतराव साठे विद्यालयात महिला दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रमाता जिजाऊ मासाहेब व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. युट्युब स्टार प्रसाद गेंगजी यांच्यावतीने विद्यालयाला चार स्मार्ट टीव्ही भेट देण्यात आले. त्यांच्या मातोश्री शोभा गेंगजी यांच्या हस्ते टीव्हीचे अनावरण करण्यात आले. प्रास्ताविक मुख्याध्यापक शैलेंद्र कांबळे यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माढा नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्षा कल्पना जगदाळे होत्या. स्वीटी इंटरप्राईजेसच्या वर्षा कदम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी माढा नगरपंचायत सभापती निर्मला थोरात, सभापती रेशमा लंकेश्वर, नगरसेविका शबाना बागवान, रुपाली रसाळ, वर्षा शिंदे, सुवर्णा शिंदे उपस्थित होते. सूत्रसंचालन समाधान लटके यांनी तर आभार योगिता माकोडे यांनी मानले.



अजित दादांसारख्या मोठ्या लोकनेत्याचा अशा पद्धतीने मृत्यू होतो, तेव्हा जनमानसात शंका उपस्थित होणे स्वाभाविक आहे. सध्या जो सरकारी अहवाल समोर येत आहे, त्यावर जनता विश्वास ठेवायला तयार नाही. त्यामुळे केवळ पोलिस तपासावर विसंबून न राहता केंद्राने तातडीने हस्तक्षेप करावा.
**महादेव जानकर**, रासप नेते

तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, सोमवार, ९ मार्च २०२६ 

विमान अपघाताची सखोल चौकशी व्हावी ही सर्वांचीच भावना आहे आणि त्यानुसार राज्य व केंद्र सरकारने तातडीने आदेश दिले आहेत. कोणी म्हणतो बॉम्ब ठेवला, तर कोणी पायलटच्या माध्यमातून घातपाताचा संशय व्यक्त करतोय. अशा प्रकारे आपापल्या अकलेचे तारे तोडणे चुकीचे आहे.
**गिरीश महाजन**, भाजपा आमदार



# आखाती देशांचे पाणी तोडणार

## अमेरिकेच्या हल्ल्यानंतर इराणचा इशारा ● तेल, वायूनंतर आता पाणी शुद्धीकरण प्रकल्प लक्ष्य

◆ **तेहरान, ८ मार्च**

इस्रायल-अमेरिकेकडून सातत्याने होणारे हल्ले आणि जमिनी कारवाई करण्याचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिलेले संकेत यामुळे इराण संतापला आहे. इराणचे राष्ट्रपती मसूद पेझिश्कयान यांनी आखाती देशातील पाणी शुद्धीकरण प्रकल्पावर क्षेपणास्त्राचा मारा करण्याचा इशारा दिला. अमेरिकेच्या हवाई हल्ल्यात इराणमधील डिसॅलिनेशन प्लांट (समुद्राच्या पाण्याचे गोड्या पाण्यात रूपांतर करणारी सुविधा) उद्ध्वस्त करण्यात आला. यानंतर आखाती देशातील या प्रकल्पांवर हल्ले करणार असल्याचे पेझिश्कयान यांनी म्हटले आहे.



इराणविरुद्ध इस्रायल-अमेरिका युद्धादरम्यान पाण्याचे संकट आखाती देशांसाठी एक मोठा धोका बनण्याची शक्यता आहे. कुवेत, ओमान आणि सौदी अरेबियासारखे देश पिण्याच्या पाण्यासाठी डिसॅलिनेशन प्लांटवर जास्त अवलंबून असतात. या प्लांटवर क्षेपणास्त्र किंवा ड्रोन हल्ला झाल्यास अनेक प्रमुख आखाती शहरांमध्ये गंभीर पाणी संकट निर्माण होऊ शकते. इराणने रविवारी बहरिनमधील एका डिसॅलिनेशन प्लांटवर हल्ला केला, यामुळे काही भागातील पाणीपुरवठा बंद झाला. पर्शियन गल्फ किनाऱ्यावर शेकडो डिसॅलिनेशन प्लांट आहेत. हे प्लांट पिण्यायोग्य पाणी तयार करण्यासाठी समुद्राच्या पाण्यातून मीठ काढून टाकतात, जर या प्लांटचे नुकसान झाले तर अनेक प्रमुख आखाती शहरांना तीव्र पाण्याची टंचाई भासू शकते.

### सैनिकांची होणार कोंडी

डिसॅलिनेशन तंत्रज्ञान आखाती देशांच्या पाण्याच्या गरजांचा एक महत्त्वाचा भाग पूर्ण करते. कुवेतमध्ये, सुमारे ९० टक्के पिण्याचे पाणी डिसॅलिनेशनद्वारे येते. ओमानमध्ये, हे प्रमाण अंदाजे ८६ टक्के आहे, तर सौदी अरेबियामध्ये सुमारे ७० टक्के पिण्याचे पाणी डिसॅलिनेशनद्वारे तयार केले जाते. या तंत्रज्ञानाला रिव्हर्स ऑस्मोसिस म्हणतात. इराणने सातत्याने या प्लांटवर हल्ले सुरू ठेवल्यास युद्धभूमीवर लढणाऱ्या सैनिकांनाही पिण्याचे पाणी पुरवणे कठीण जाईल. ◂(वृत्तसंस्था)

### युएई, कतारमधील जल प्रकल्पांवर हल्ले

संयुक्त अरब अमिरातीमधील फुजैराह एफ-१ पॉवर ॲण्ड वॉटर कॉम्प्लेक्स आणि कुवेतमधील दोहा वेस्ट डिसॅलिनेशन प्लांटवर नुकतेच इराणने हल्ले चढविले. अनेक डिसॅलिनेशन प्लांट ऊर्जा प्रकल्पांशी जोडलेले आहेत. जल प्रकल्पांना जाणूनबुजून लक्ष्य केले गेले तर आखाती देश युद्धात सहभागी होऊ शकतात. ■

### नागरिकांचे स्थलांतर करावे लागणार

सौदी अरेबियाच्या जुबैल डिसॅलिनेशन प्लांट किंवा त्याच्या पाईप लाईनचे गंभीर नुकसान झाले तर राजधानी रियाधमधून नागरिकांचे स्थलांतरण करावे लागेल. सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरातींनी पाईप लाईन, जलाशयात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली आहे. दुसरीकडे, इराण स्वतः डिसॅलिनेशनवर जास्त अवलंबून नाही. त्याचे बहुतेक पाणी नद्या, धरणे आणि भूजल यातून येते. ■



# इस्रायलचे इराणच्या तेल साठ्यांवर हल्ले

## ३ डेपो व ३० इंधन टँक उद्ध्वस्त ● प्रत्युत्तरात पाच देशांवर ड्रोनचा मारा

◆ **तेहरान, ८ मार्च**

इस्रायलने इराणमधील तेल साठवणूक आणि तेल शुद्धीकरण प्रकल्पांना लक्ष्य करीत रविवारी जोरदार हल्ले चढविले. ड्रोन, क्षेपणास्त्रांच्या हल्ल्यात ३० इराणी इंधन टँक आणि तीन तेल डेपो उद्ध्वस्त झाले. प्रत्युत्तरात इराणने इस्रायल, कुवेत, सौदी अरब, बहरिन आणि संयुक्त अरब अमिराती (युएई) यासह पाच देशांवर हल्ले केले.

इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्स अर्थात् आयआरजीसीचे प्रवक्ते अली मोहम्मद नैनी यांनी निवेदनात म्हटले की, इस्रायलने रविवारी तेल व पाणी शुद्धीकरण प्रकल्पासह पायाभूत सुविधांना लक्ष्य केले. प्रत्युत्तरात इस्रायलसह पाच देशांवर ड्रोन, क्षेपणास्त्रांचा मारा करण्यात आला. अमेरिका आणि इस्रायलविरुद्ध सहा महिने युद्ध लढण्यास आम्ही सक्षम आहोत. मध्य पूर्वेतील अमेरिका आणि इस्रायली लष्करी तळ आणि सुविधांशी संबंधित २०० हून अधिक लक्ष्यांवर अचूक हल्ला करण्यात आला. यापुढे देखील आमचे हल्ले सुरूच राहणार आहे. ◂(वृत्तसंस्था)

### संघर्षात इराणमध्ये झालेले नुकसान

- इराणमध्ये आतापर्यंत ६,६६८ नागरी भागांना लक्ष्य करण्यात आले
- हल्ल्यांमध्ये ५,५३५ घरे आणि १०४१ दुकानांचे नुकसान झाले
- १४ वैद्यकीय केंद्रे आणि ६५ शाळांवरही हल्ले करण्यात आले
- युद्धात आतापर्यंत १४८३ इराणी नागरिकांचा मृत्यू झाला ■

### अत्याधुनिक ड्रोनचा वापर

आयआरजीसीने ऑपरेशन ट्रू प्रॉमिस-४ अंतर्गत हल्ल्याची तीव्रता वाढवली आहे. नवीन खैबर शेकान घन इंधन क्षेपणास्त्राने उत्तर इस्रायली शहरातील हैफा येथील लष्करी तळांना लक्ष्य केले. याशिवाय अमेरिकन सैन्य तैनात असलेल्या भागांना देखील लक्ष्य केले. इराणी नौदलाने बहरिनमधील सलमान बंदरातील अमेरिकन नौदल पायाभूत सुविधांवर हल्ला केला. ■

# भावाकडून अभियंता बहिणीची हत्या

## प्रेयसीशी ताटातूट झाल्याने होता तणावात

◆ **मुरादाबाद, ८ मार्च**

प्रेयसीशी ताटातूट झाल्यामुळे तणावात असलेल्या युट्युबर भावाने अभियंता बहिणीची चाकू भोसकून हत्या केली. आईवरही चाकूने वार करून गंभीर जखमी केले. ही धक्कादायक घटना शुक्रवारी मुरादाबादमध्ये उघडकीस आली. पोलिस हल्लेखोर भावाचा शोध घेत आहेत. हिमशिखा सिंह असे मृत बहिणीचे तर नीलिमा जखमी आईचे नाव आहे. आरोपी हार्दिक सिंह फरार आहे.

हार्दिकची आई नीलिमा यांनी पोलिसांना सांगितले की, प्रेयसीसोबत ताटातूट झाल्यानंतर हार्दिक चिडचिडा झाला होता. तो तिच्याशी लग्न करण्याच्या हट्टाला पेटला होता, तर ती त्याला सोडून गेली होती. हार्दिकला असे वाटत होते की, त्याची प्रेयसीशी ताटातूट बहीण हिमशिखा आणि आईमुळेच झाली. त्यामुळे तो माझ्यावर आणि हिमशिखावर चिडू लागला होता.

### दोघेही राहात होते एकत्र

पतीपासून विभक्त झाल्यानंतर नीलिमा मुरादाबादमध्ये हिमशिखा आणि हार्दिकसोबत राहात होत्या. हिमशिखा आणि हार्दिक जुळे भावंड होते. दोघेही अभियंता होते. हार्दिक गुडगावमधील एका आयटी कंपनीत काम करत होता. हिमशिखा गुरुग्राममध्ये एका आयटी कंपनीत अभियंता होती. वर्षभरापूर्वी हार्दिकची नोकरी सुटली होती. तेव्हापासून तो बहिणीसोबत राहून युट्युबवर कंटेंट अपलोड करू लागला होता. भावंड गुडगावमध्ये राहत होते आणि आई नीलिमा मुरादाबादमध्ये एका विमा कंपनीत काम करत होती. घटनेच्या दिवशी हार्दिक आईला सरप्राईज असल्याचे सांगून तिच्या ऑफिसमधून घरी घेऊन आला होता. आई घरात शिरताच तिला हिमशिखा रक्ताच्या थारोळ्यात पडून असल्याचे दिसली. ती ओरडताच हार्दिकने आईवरही चाकूने वार करून जखमी केले. जखमी आईवर रूग्णालयात उपचार सुरू आहेत. ◂(वृत्तसंस्था)

### चाकूने केले तब्बल ४० वार

हार्दिकचे बंगळुरुमध्ये राहणाऱ्या एका मुलीसोबत प्रेमसंबंध होते. ती मुलगीही गुरुग्राममधील एका कंपनीत नोकरी करत होती. काही कारणांमुळे हार्दिकचे ब्रेकअप झाले होते. ब्रेकअपमुळे हार्दिक आपल्या बहिणीवर इतका चिडला होता की त्याने तिची अत्यंत क्रूरपणे हत्या केली. त्याने हिमशिखाला घरात धावत पकडून चाकूने सुमारे ४० वार केले. तिचे पोट, छाती, गळा आणि शरीराच्या प्रत्येक भागावर चाकूचे घाव आहेत. ■

# हिजबुल्लाहचे ४१ कमांडर ठार

## पूर्व लेबनानमध्ये कारवाई

◆ **बैरुत, ८ मार्च**

पूर्व लेबनानमध्ये इस्रायलच्या स्पेशल फोर्सच्या कंमाडोने जमिनी कारवाई करीत दहशतवादी हिजबुल्लाहच्या ४१ कमांडर्सचा खात्मा केला. बेका व्हॅलीमधील नबी शीत शहरात शनिवारी मध्यरात्रीनंतर ही कारवाई करण्यात आल्याची माहिती इस्रायलच्या संरक्षण विभागाने दिली आहे.

इस्रायली कमांडो ऑपरेशनचा उद्देश १९८६ पासून बेपत्ता असलेले इस्रायली हवाई दलाचे अधिकारी रॉन अराद यांचे अवशेष शोधणे होते. रात्रीच्या वेळी करण्यात आलेल्या या मोहिमेत हवाई हल्ले आणि जमिनीवरील कारवाईचा समावेश होता. इस्रायली कमांडो आणि हिजबुल्लाहच्या जवानांमध्ये चकमक झाली. आम्हाला हिजबुल्लाहचे कमांडर्स एका इमारतीत लपून असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानंतर तातडीने मोहीम राबविण्यात आली. लेबनानच्या आरोग्य मंत्रालयाने हल्ल्याची पुष्टी केली आहे. त्यांनी निवेदनात म्हटले की, नबी शीत आणि आसपासच्या भागात झालेल्या हल्ल्यांमध्ये हिजबुल्लाहचे ४१ सदस्य मारले गेले, तर ४० पेक्षा अधिक जखमी आह. तीन दिवसांत झालेल्या विविध हल्ल्यांत ४०० लोक ठार झाले, यात ८३ मुलांचा समावेश आहे. हल्ल्यांमुळे परिसरातील अनेक इमारतींचे नुकसान झाले. इस्रायली संरक्षण दलाकडून शुक्रवारी कारवाईपूर्वी परिसरातील रहिवाशांना स्थलांतर करण्याची सूचना दिली होती. संभाव्य हल्ल्याची शक्यता पाहता लहान मुलांना आधीच शहरातून बाहेर काढल्याचे नबी शीतचे महापौर हानी मौसावी यांनी सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

### रॉन अराद कोण होते?

रॉन अरादचे अवशेष शोधण्यासाठी लेबनानमध्ये एक विशेष मोहीम राबवली, परंतु त्यात कोणताही शोध लागला नाही असे इस्रायली लष्कराने सांगितले. १९८६ मध्ये लेबनानमध्ये एका मोहिमेदरम्यान इस्रायलचे लढाऊ विमान कोसळले तेव्हा रॉन अराद बेपत्ता झाले होते. विमानातून बाहेर पडल्यानंतर त्यांना पकडण्यात आले होते. परंतु त्यानंतर ते मृत झाल्याचे बोलले जाते. परंतु त्यांचे अवशेष अद्याप सापडलेले नाहीत. ■

# अपघातात भाजपा नेत्याच्या भावासह दोघांचा मृत्यू

◆ **सहारनपूर, ८ मार्च**

जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या अपघातांमध्ये भाजपा नेत्याच्या भावासह दोघांचा मृत्यू झाला तर दोघे गंभीर जखमी झाले. जखमींवर वेगवेगळ्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान, बारगावमध्ये संतप्त कुटुंबीय आणि ग्रामस्थांनी मृतदेह रस्त्यावर ठेवून बहेरा-नन्हेरा रस्ता रोखला. ग्रामस्थ वरिष्ठ अधिकाऱ्यांना घटनास्थळी बोलवा, यासाठी आग्रही होते.

सदर बाजार पोलिस ठाण्याच्या हद्दीत पेपर मिल समोर शनिवारी एका अज्ञात वाहनाने स्कूटरला धडक दिली. यात हिंमतनगर निवासी संजय शर्मा, मोनू पंडित आणि पिंटू जखमी झाले. तिघांनाही जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असता डॉक्टरांनी संजय शर्मा यांना मृत घोषित केले. संजय शर्मा हे भाजपा सहकार सेलचे महानगर समन्वयक राजेश शर्मा यांचे भाऊ होते. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी कुटुंबाला माहिती दिली. जखमींवर सध्या विविध खाजगी रुग्णालयांत उपचार सुरू आहेत. दुसऱ्या घटनेत रविवारी सकाळी ७ वाजताच्या सुमारास चारठावल पोलिस स्टेशन परिसरातील कसौली गावातील रहिवासी विकास हा दुचाकीने बडगावच्या मिर्झापूर येथील एका नातेवाईकाला घेण्यासाठी जात होता. बडेडा गावातील दारूच्या दुकानाजवळ येताच विरुद्ध दिशेने येणाऱ्या अनियंत्रित दुधाच्या ट्रकला त्याची धडक झाली. यात विकासचा जागीच मृत्यू झाला. या अपघातामुळे संतप्त कुटुंबासह नागरिकांनी घटनास्थळी मृतदेह ठेवून बडगाव-नन्हेरा मार्गावर रस्ता रोखला. ◂(वृत्तसंस्था)

# हत्याकांडातील आरोपींच्या घरावर बुलडोझर कारवाई

◆ **नवी दिल्ली, ८ मार्च**

होळीच्या दिवशी पाण्याचा फुगा फेकण्यावरुन झालेल्या वादात एका तरुणाची हत्या करण्यात आली. ही घटना पश्चिम दिल्लीतील उत्तमनगर येथे घडली होती. या घटनेनंतर प्रशासनाने आता कडक कारवाई सुरू केली आहे. दिल्ली महानगरपालिकेने या प्रकरणातील एक आरोपी निजामुद्दीनची मालमत्ता बुलडोझरने पाडली आहे. अधिकाऱ्यांच्या मते, ही कारवाई बेकायदेशीर बांधकामांविरुद्ध केली जात आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, होळीच्या दिवशी पाण्याचा फुगा फेकण्यावरून सुरू झालेल्या वादातून हे प्रकरण घडले. ४ मार्चला रात्री ११ वाजेच्या सुमारास उत्तमनगर पोलिस ठाण्यात दोन शेजारच्या कुटुंबांमध्ये भांडण झाल्याची तक्रार करणारा पीसीआर कॉल आला. वाद वाढला आणि दोन्ही बाजूंचे सदस्य रस्त्यावर उतरले. त्यामुळे दोन्ही गटांत हाणामारी झाली. यात एका गटाचे तीन तर दुसऱ्या गटाचे पाच जण जखमी झाले. सर्व जखमींना रुग्णालयात नेण्यात आले. दुसऱ्या दिवशी एका तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या प्रकरणी दिल्ली पोलिसांनी आतापर्यंत सात जणांना अटक केली आहे. यात सहा प्रौढ आणि एका अल्पवयीन मुलाचा समावेश आहे. ◂(वृत्तसंस्था)





### असामाजिक घटकाकडून तणाव निर्माणाचा प्रयत्न

डीसीपी कुशल पाल सिंह यांनी सांगितले की, प्राथमिक तपासात असे दिसून आले आहे की, दोन्ही कुटुंबे एकमेकांना सुमारे ५० वर्षांपासून ओळखतात. पार्किंग आणि कचरा विल्हेवाट लावण्यासारख्या किरकोळ मुद्यांवरून यापूर्वी त्यांच्यात वाद झाले होते. काही असामाजिक घटक या घटनेला धार्मिक रंग देऊन तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. परंतु, परिसरातील परिस्थिती नियंत्रणात आहे, असेही पोलिसांनी सांगितले. ■

# राज्यपालांच्या हेलिकॉप्टरचे श्रीनगरमध्ये आपात्कालीन लॅण्डिंग

**श्रीनगर** : उत्तराखंडचे राज्यपाल लेफ्टनंट जनरल गुरमित सिंग (निवृत्त) यांच्या हेलिकॉप्टरमध्ये रविवारी अचानक तांत्रिक बिघाड झाल्याने खळबळ उडाली आहे. वैमानिकाने परिस्थितीचे संवेदनशीलतेने निरीक्षण करून श्रीनगरमधील जीव्हीके हेलिपॅडवर आपात्कालीन लॅण्डिंग केले. त्यामुळे कोणताही अनर्थ घडला नाही. कोतवाली निरीक्षक कुलदीप सिंग म्हणाले, राज्यपाल पोलिस अतिथिगृहात थांबले आहेत. तांत्रिक बिघाड दुरुस्त होताच ते पुढच्या दौऱ्यासाठी निघतील. ■

## चित्रपट वार्ता

### घटस्फोट अर्जावर थलपतीने मौन सोडले



**चेन्नई** : दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेता थलपती विजय यांचे वैयक्तिक जीवन सध्या प्रचंड चर्चेत आहे. २७ वर्षांच्या वैवाहिक नात्यानंतर विजयच्या पत्नी संगीता सोरनालिंगम यांनी कोर्टात घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला आहे. या अर्जात त्यांनी विजयवर एका अभिनेत्रीसोबत विवाहबाह्य संबंध असल्याचा आरोप केला आहे. गेल्या काही दिवसांपासून या चर्चांनी जोर धरला होता. अखेर थलपती विजयने सार्वजनिक कार्यक्रमात पहिल्यांदाच आपल्या भावनिक प्रतिक्रिया व्यक्त केल्या. माझ्याभोवती असलेल्या अलिकडच्या समस्यांबद्दल काळजी करू नका. कारण त्यावर तुम्ही तुमचा वेळ घालवण्याइतक्या त्या समस्या महत्त्वाच्या नाहीत. मी स्वतः त्यांची काळजी घेईन. माझ्या समस्यांमुळे तुम्हाला दु:खी किंवा तणावग्रस्त होताना पाहून मला सर्वांत जास्त त्रास होतो, असे थलपती म्हणाला. ■

### विजय देवरकोंडाचे भरभरून कौतुक



**हैदराबाद** : मराठी आणि तेलुगू चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय कलाकार रश्मिका मंदाना आणि विजय देवरकोंडा यांचे लग्न २६ फेब्रुवारी रोजी जयपूरमध्ये पार पडले आणि समारंभाच्या भव्यतेमुळे सर्वांचे लक्ष वेधले. या लग्नसोहळ्याचे फोटो आता सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत, ज्यावर चाहत्यांनी प्रेमाचा वर्षाव केला आहे. लग्नानंतर विजयचे काका रंगिनेनी यांनी विजयबद्दल कौतुक व्यक्त करत सोशल मीडियावर काही फोटो शेअर केले आहेत. पोस्टमध्ये विजय खूप नम्र आणि मृदू दिसत असल्याचे फोटो दाखवतात. लग्नानंतर तो आपल्या आजी-आजोबांच्या घरी गेला आणि त्यांना श्रद्धांजली वाहिली. फोटोमध्ये विजयचे कुटुंबही दिसत आहे, तर काकांनी त्यांच्या भावनिक कॅप्शनमुळे चाहत्यांचे मन जिंकले आहे. लग्नानंतर रश्मिका आणि विजय तेलंगणातील महबूबनगर जिल्ह्यातील विजयच्या मूळ गावी थुम्मनपेटा येथे परतले. येथे नवविवाहित जोडप्याने पारंपरिक विधीनुसार सत्यनारायण व्रत केले आणि गावकऱ्यांसाठी जेवणाचे आयोजन केले. ■

# निशांत कुमारांचा जदयूमध्ये प्रवेश

## संघटना मजबूत करण्यासाठी करणार काम

◆ **पाटणा, ८ मार्च**



मुख्यमंत्री नितीश कुमार यांचे पुत्र निशांत कुमार यांनी रविवारी जदयुमध्ये प्रवेश केला. केंद्रीय मंत्री राजीव रंजन ललन सिंह आणि पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष संजय झा यांच्यासह वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत पक्ष मुख्यालयात त्यांनी पक्षप्रवेश केला. याप्रसंगी ते म्हणाले, मी पक्षाचे संघटन मजबूत करण्यासाठी काम करणार आहे. निशांत कुमार हे अभियांत्रिकी पदवीधर आहे.

निशांत कुमार म्हणाले, माझ्या वडिलांनी राज्यसभेत जाण्याचा घेतलेला निर्णय हा त्यांचा वैयक्तिक होता. आम्ही सर्व त्यांचा आदर करतो. आम्ही त्यांच्या मार्गदर्शनात काम करत राहू. मी संघटना मजबूत करण्यासाठी काम करणार आहे. बिहारचे सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहिलेल्या नितीश कुमारांनी गत वीस वर्षांत राज्यासाठी खूप काही केले आहे. राज्यातील लोक त्यांचे राज्याच्या विकासातील योगदान कधीही विसरणार नाहीत. ◂(वृत्तसंस्था)

### उपमुख्यमंत्रिपदाची जबाबदारी मिळणार

नवीन सरकारमध्ये निशांत यांना उपमुख्यमंत्री बनवले जाईल, अशी अटकळ आहे. नितीशकुमार यांच्या एका जवळच्या सहकाऱ्याने दावा केला की, त्यांच्या वडिलांच्या राजीनाम्यानंतर स्थापन होणाऱ्या नवीन सरकारमध्ये निशांत यांना उपमुख्यमंत्री करण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला आहे. दरम्यान, ते पुढील महिन्यात विधान परिषदेवर निवडून येतील, असा दावा आमदार हरी नारायण सिंह यांनी केला आहे. ■

# ‘समृद्धी’वर अपघात, मृत्युमुखी पडणाऱ्यांचे प्रमाण वाढले

## मुंबई-पुणे एक्सप्रेस-वेची परिस्थिती चांगली

◆ **मुंबई, ८ मार्च**

२०२५ मध्ये नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गावर अपघात आणि त्यामुळे होणाऱ्या मृत्युंमध्ये झपाट्याने वाढ झाली, तर मुंबई-पुणे एक्सप्रेस-वे वर किरकोळ अपघातांमध्ये वाढ झाली असून, एकूण अपघातांमध्ये किरकोळ घट झाली आहे, असे अधिकाऱ्यांनी रविवारी महाराष्ट्र महामार्ग पोलिसांच्या तात्पुरत्या आकडेवारीचा हवाला देत सांगितले.

महामार्ग पोलिसांच्या आकडेवारीनुसार, समृद्धी महामार्गार २०२५ मध्ये १८५ अपघातांची नोंद झाली. हे प्रमाण २०२४ च्या १३७ अपघातांपेक्षा ३५ टक्के जास्त आहे. नागपूरला देशाच्या आर्थिक राजधानीशी जोडणाऱ्या या मार्गिकेवरील प्राणघातक अपघात २०२४ मध्ये ९६ वरून २०२५ मध्ये १२८ पर्यंत वाढले, तर मृतांची संख्या १२६ वरून १५२ पर्यंत वाढली, जी अनुक्रमे ३३ टक्के आणि २१ टक्के वाढ दर्शवते. गंभीर दुखापतींमुळे होणाऱ्या अपघातांची संख्याही २३ वरून ४६ पर्यंत दुप्पट झाली. अशा अपघातांमध्ये गंभीर जखमी झालेल्यांची संख्या ५० वरून १४० पर्यंत वाढली, असे आकडेवारीवरून दिसून आले.

सहा-लेन प्रवेश-नियंत्रित समृद्धी कॉरिडॉर डिसेंबर २०२२ पासून टप्प्याटप्प्याने वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. मागील वर्षी त्याचा संपूर्ण भाग कार्यान्वित झाला.


योगायोगाने महाराष्ट्र परिवहन आयुक्त कार्यालयाने या वर्षी २२ जानेवारी रोजी जारी केलेल्या निवेदनात समृद्धी महामार्गावरील अपघात आणि मृत्युदरात वाढ झाल्याचा उल्लेख केला नव्हता. देशातील पहिला प्रवेश-नियंत्रित मार्गिका असलेल्या मुंबई-पुणे एक्सप्रेस-वेवरील गंभीर अपघात आणि मृत्युदरात घट झाल्याचे त्यांनी अधोरेखित केले. या कालावधीत मुंबई-पुणे एक्सप्रेस-वे वरील अपघातांमध्ये २२ टक्क्यांनी घट झाली. रस्ते सुरक्षा उपाययोजना, कडक अंमलबजावणी आणि जागरुकता मोहिमेमुळे हे शक्य झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

### किरकोळ अपघात १२ टक्क्यांनी वाढले

२०२५ मध्ये मुंबई-पुणे एक्सप्रेस वे-वर १८७ अपघातांची नोंद झाली, जी २०२४ मध्ये १९१ पेक्षा थोडी कमी आहे, म्हणजेच त्यात दोन टक्क्यांनी घट झाली. किरकोळ दुखापतींचे अपघात १२ टक्क्यांनी वाढले. म्हणजेच २५ वरून २८ टक्के झाले, तर किरकोळ दुखापत झालेल्या व्यक्तींची संख्या ४२ टक्क्यांनी वाढली, म्हणजेच ६५ वरून ९२ झाली. ■

### फिनलंडच्या अध्यक्षांना ‘धुरंधर २’ची प्रतीक्षा

**मुंबई** : फिनलंडचे राष्ट्राध्यक्ष अलेक्झांडर स्टब त्यांच्या भारत दौऱ्यादरम्यान सिनेप्रेमींना आश्चर्यचकित करणारे विधान केले आहे. त्यांनी सांगितले की, त्यांच्या मुलाच्या सल्ल्यानुसार त्यांनी भारत येण्यापूर्वी हिंदी चित्रपट ‘धुरंधर २’ची पाहिला होता. चित्रपटातील दहशतवादाविरुद्धची लढाई आणि त्यातील कथानक त्यांना अत्यंत आवडले आणि आता ते या चित्रपटाच्या सीक्वेल ‘धुरंधर २’ची पाहण्यासाठी उत्सुक आहेत.स्टब म्हणाले, माझ्या भारत प्रवासाच्या आधी माझ्या मुलाने मला ‘धुरंधर २’ ट्रेलर पाहण्याचा सल्ला दिला आणि मी पाहिला. या चित्रपटात दहशतवाद्यांविरुद्धची लढाई आणि देशभक्तीची भावना खूप प्रेरणादायी आहे. मी १९ मार्चला या सीक्वेलचा अनुभव घेण्यास उत्सुक आहे. १९ मार्चपासून संपूर्ण जगभरात प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून, सोशल मीडियावर ट्रेलरवर प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिक्रिया मिळत आहेत. स्टब यांचे हे विधान चित्रपटाच्या लोकप्रियतेवर आणि जागतिक स्तरावर हिंदी चित्रपटांचा प्रभाव यावर प्रकाश टाकते. ■



CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# युनोचा काही उपयोग आहे?

जग जेवढे आधुनिक आणि तंत्रज्ञानाने परिपूर्ण होत आहे, तेवढेच ते अत्यंत हिंसक आणि स्वार्थी होत असल्याच्या घटना समोर येत आहेत. जगाने यापूर्वी दोन विनाशकारी महायुद्धांचा अनुभव घेतला आहे. दुसऱ्या महायुद्धात लक्षावधी नागरिक प्राणास मुकले. ज्यांचा युद्धाशी काहीही संबंध नव्हता, अशा नागरिकांची संख्या मृतांमध्ये सर्वांत जास्त होती. इतरांचे प्रदेश बळकावण्याच्या नादापायी पहिले आणि दुसरे महायुद्ध लढले गेले. या विनाशकारी युद्धांनंतर जगात शांतता राखण्यासाठी २४ ऑक्टोबर १९४५ रोजी संयुक्त राष्ट्र संघाची (युनो) स्थापना झाली. विविध देशांमधील वाद संघर्षाऐवजी चर्चा करून सोडविण्यासाठी हा जागतिक मंच सक्रिय भूमिका पार पाडेल, अशी अपेक्षा होती. पण, दुर्दैवाने ही अपेक्षा फोल ठरली हे वारंवार उद्भवणाऱ्या जागतिक संघर्षांनी सिद्ध झाले आहे. युनोच्या मध्यस्थीने मोठा संघर्ष थांबल्याचे एकही उदाहरण उपलब्ध नाही. याचे कारण म्हणजे ज्या बड्या देशांकडे संघर्ष थांबविण्याची जबाबदारी आहे, ते अमेरिका, रशिया, चीन हे प्रमुख देशच युद्धखोर आहेत आणि शिवाय ते युनोच्या सुरक्षा परिषदेचे स्थायी सदस्य आहेत. या देशांकडे विशाल भूभाग, नैसर्गिक साधनसंपत्ती आणि प्रचंड श्रीमंती असतानाही दुसऱ्यांच्या जमिनीवर या त्रिकुटाचा डोळा असतो. अमेरिकेने अनेक गरीब देशांना देशोधडीला लावले. इराक, सीरिया, अफगाणिस्तान, लिबिया आदी देश अजूनही सावरलेले नाहीत. व्हेनेझुएलाचे अध्यक्ष निकोलस मादुरो यांना त्यांच्या निवासस्थानात घुसून अमेरिकेने त्यांचे अपहरण केले. डोनाल्ड ट्रम्प यांची ही कृती एखाद्या हुकूमशहासारखी आहे. व्हेनेझुएलाकडे कच्च्या तेलाचे विशाल साठे आहेत. त्यावर काळी नजर असलेल्या ट्रम्प यांनी मादुरोंना पदच्युत करीत बळजबरीने त्यांचे अपहरण केले. ट्रम्प यांची ही कृती केवळ आंतरराष्ट्रीय कायद्यांचे उल्लंघन तर आहेच, शिवाय ते अनैतिक कृत्य आहे. पण, निषेध करण्यापलीकडे युनो काहीही करू शकली नाही. अमेरिका, रशिया आणि चीन या बड्या देशांच्या युद्धखोर वृत्तीला लगाम लावण्याची हिंमत युनोत नाही. जगाला वेठीस धरण्याचे काम हे देश वारंवार करीत आले आहेत. त्यांना वाटेल तेव्हा युद्ध करायचे, दुसऱ्यांची भूमी दरोडेखोराप्रमाणे बळकाविण्याचे पाप हे देश करीत आले आहेत. आकाराच्या बाबतीत रशियाचा जगात प्रथम क्रमांक लागतो, पण केवळ जमिनीसाठी त्याने युक्रेनवर युद्ध लादले. यापूर्वी क्रिमिया तर गिळंकृत केलाच आहे. चीनचेही तसेच. अत्यंत घातकी आणि दगाबाज असलेल्या ड्रॅगनने एकही शेजारी देश सोडलेला नाही. मंगोलिया, भारत, तुर्कस्थान, भूतान, तैवान, तिबेट, फिलीपिन्स, व्हिएतनाम, इंडोनेशिया आदी देशांची भूमी त्याने हिसकावली आहे. दक्षिण चीन सागरात चीनची दादागिरी आहे. जवळपास ४१ लाख चौरस किलोमीटर एवढ्या विशाल भूभागावर चीनने बेकायदेशीर ताबा मिळविला. जमिनीचे हे प्रमाण चीनच्या कायदेशीर भूभागाच्या तुलनेत ४३ टक्के एवढे आहे. ज्या देशांवर जगात शांतता प्रस्थापित करण्याची आणि स्थिरता ठेवण्याची जबाबदारी आहे ते देशच युद्धखोर आहेत. त्यामुळे शांततावादी आणि कमकुवत असलेल्या देशांनी कुणाकडे दाद मागायची हा प्रश्न निर्माण झाला आहे. सुरक्षा परिषद आणि आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्था या जगातील सर्वांत शक्तिशाली संघटना आहेत. पण, कायम शांततेचा पुरस्कार करणारा आणि जागतिक शांततेची कामना करणारा बुद्धाचा भारत या दोन्ही संघटनांचा सदस्य नाही, हे दुर्दैव. युनोच्या सुरक्षा परिषदेतील पाच स्थायी सदस्यांना (अमेरिका, रशिया, चीन, फ्रान्स व ब्रिटन) मिळालेला नकाराधिकार (व्हेटो) हा जागतिक शांततेच्या समोर असलेला सर्वांत मोठा अडथळा आहे. स्वतःच्या फायद्यासाठी नकाराधिकाराचा गैरवापर या तथाकथित बड्या देशांनी केल्याची अनेक उदाहरणे आहेत. भारतात अनेक दहशतवादी हल्ले घडविणाऱ्या मौलाना मसूद अजहरला दहशतवादी घोषित करण्याच्या भारताच्या प्रस्तावाविरोधात चीनने नकाराधिकाराचा वापर केला. सुरक्षा परिषदेतील सदस्यसंख्या वाढविण्याची मागणी भारत, ब्राझील, दक्षिण आफ्रिका हे देश बराच काळ करीत आहेत; पण, त्याला चीन आणि अमेरिका आडकाठी आणत आहेत. सुरक्षा परिषद अशी असल्यामुळे जगात वारंवार संघर्ष निर्माण होत असताना ते रोखण्यात युनोला साफ अपयश आले आहे.

खरे तर सुरक्षा परिषदेतील बड्या देशांनी मन मोठे करीत आणि बलवान असूनही प्रसंगी लवचीकता दाखवून संघर्ष होणार नाहीत याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. क्षणात पृथ्वी नष्ट करण्याची क्षमता असलेली महाविनाशकारी शस्त्रे आज काही देशांकडे आहेत. सुदैवाने हिरोशिमा-नागासाकीनंतर कोणत्याही देशाने अण्वस्त्रांचा वापर केलेला नाही. पण, दुर्दैवाने याच अण्वस्त्रांचा धाक दाखवीत दबावनीतीचे राजकारण करण्यात हे बडे देश सर्वांत पुढे असतात. जून २०२५ मध्ये इराण-इस्रायल यांच्यात १२ दिवस भीषण संघर्ष झाला. हे युद्ध रोखण्यात युनोला यश आले नाही. संघर्षात शेकडो नागरिकांचा मृत्यू झाला. हजारो घरे नष्ट झालीत. वित्त आणि प्राणहानी रोखण्यासाठी संघर्षविराम केला होता, पण तणाव मात्र कायम राहिला. जेमतेम आठ महिन्यांच्या शांततेनंतर हे दोन्ही देश पुन्हा मैदानात उतरले आहेत. रशिया-युक्रेन युद्ध संपलेले नसताना पश्चिम आशियात नवा संघर्ष पेटला आहे. इराणचे सर्वोच्च धार्मिक नेते दिवंगत अयातुल्लाह अली हुसेनी खामेनी यांच्या अडेलतट्टू भूमिकेमुळे अमेरिकेचे युद्धखोर राष्ट्रप्रमुख डोनाल्ड ट्रम्प यांना मध्य पूर्वेत हल्ला करण्याची संधी मिळाली. युक्रेन-रशिया युद्धाचा परिणाम युरोपातील काही देश आणि बाल्कन प्रदेशांपुरताच मर्यादित राहिला. आता इराण-अमेरिका संघर्षामुळे जगासमोर ऊर्जा संकट उभे ठाकले आहे. भारतावर त्याचे परिणाम जाणवू लागले आहेत.

मध्यपूर्वेतील देशांमध्ये कच्चे तेल आणि नैसर्गिक वायूचे विशाल साठे आहेत. ऊर्जा गरज भागविण्यासाठी भारतासह अनेक देशांची मदार या आखाती देशांवरच आहे. भारतासारख्या १४० कोटी लोकसंख्या असलेल्या देशाला याचा मोठा आर्थिक फटका बसणार आहे. या युद्धाशी भारताचा काहीही संबंध नसला तरी त्याचे परिणाम जाणवू लागले आहेत. भारताची एलपीजी गॅसची जवळपास ८५ ते ९० टक्के गरज मध्यपूर्वेतील देशांकडून आयात करून भागवावी लागते. संयुक्त अरब अमिरातीकडून ४० टक्के, कतारकडून २० तर सौदी अरेबियाकडून आणि कुवैतकडून जवळपास १५ टक्के एलपीजीची आयात भारताला करावी लागते.

भारत दरवर्षी ३० दशलक्ष टन एलपीजीची आयात करतो. देशांतर्गत उत्पादनातून गरज भागत नसल्याने दरवर्षी ६० ते ६५ टक्के घरगुती वापराचा गॅस आयात करावा लागतो. दुर्दैवाने हे चारही देश युद्धात अडकल्याने स्वयंपाकाच्या गॅसची आयात बाधित झाली. परिणामी सरकारला सिलेंडरच्या किमतीत ६० रुपयांनी वाढ करावी लागली. भारतावर अवलंबून असलेले श्रीलंका, नेपाळ आणि भूतान या देशांनाही ऊर्जा संकटाला सामोरे जावे लागू शकते. इराणने या चारही देशांवर क्षेपणास्त्रे आणि ड्रोन्सचा मारा करीत रिफायनरीज आणि वायू प्रकल्पांना लक्ष्य केले. तसेच होर्मुझ खाडीतील जहाज वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाल्याने संघर्ष आणखी आठ दिवस सुरू राहिल्यास आशियातील अनेक देशांपुढे ऊर्जासंकट उभे ठाकल्याशिवाय राहणार नाही. कारण, याच आखातातून आशियातील देशांना तब्बल ८९ टक्के तेल आणि वायूचा पुरवठा होतो. जगातील एकूण निर्यातीपैकी २५ टक्के कच्च्या तेलाची निर्यात आखातातून होते. कच्चे तेल आणि वायूच्या संदर्भात अमेरिका आणि इस्रायल संपन्न असल्याने या देशांना युद्धाचा फरक पडणार नाही. पण, आशियातील देश मात्र संकटात सापडले आहेत. युनोत काही धमक असेल आणि त्याच्या अस्तित्वाला काही अर्थ असेल तर त्याने हा संघर्ष संपुष्टात आणावा. अन्यथा, युनोचे असणे आणि नसणे यात फरक राहणार नाही.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# खामेनीचा अस्त, खामेनीचा उदय!

रमझानच्या महिन्यात इराणचे ८६ वर्षीय धार्मिक व सर्वोच्च नेते अयातोल्ला अली खामेनी अमेरिका- इस्रायलच्या संयुक्त हल्ल्यात ठार झाले आणि त्यांचा राजकीय पुनर्जन्मही झाला. अमेरिकेने ही कारवाई केली नसती तर आणखी काही वर्षांत खामेनींना नैसर्गिक मृत्यू आला असता आणि त्यांचे नाव इतिहासजमा झाले असते. मात्र, अमेरिकेने त्यांना ठार करून मध्यपूर्वेच्या इतिहासात खामेनींचे नाव जणू अमर करून टाकले आणि इराण आता खामेनींच्या मुलास नवा शासक घोषित करण्याच्या तयारीत आहे. असे झाल्यास खामेनींच्या अमरत्वावर एकप्रकारे शिक्कामोर्तब केले जाईल.

**हा तर भूकंप :** अमेरिका-इस्रायल यांनी इराणविरुद्ध सुरू केलेले युद्ध, त्यात खामेनी व इराणच्या काही नेत्यांचे ठार होणे यावर सर्वाधिक परखड भाष्य केले आहे ते एका अमेरिकन राष्ट्रपतीनेच. वयाच्या केवळ ४६ व्या वर्षी अमेरिकेचे राष्ट्रपतिपद भूषविणाऱ्या बिल क्लिंटन यांनी या साऱ्या घटनाक्रमावर केलेले भाष्य ट्रम्प यांना वेदनादायक ठरेल असे आहे. क्लिंटन यांनी समाज माध्यमांवर आपली भूमिका मांडली आहे. पहिल्या प्रतिक्रियेत त्यांनी म्हटले आहे, खामेनींचे ठार होणे हा एक भूकंप आहे आणि मोठ्या भूकंपानंतर काही काळ नंतरही धक्के बसत असतात. ते आता बसणार आहेत. राष्ट्रपतिपदाची ८ वर्षांची कारकीर्द पूर्ण करतानाही लोकप्रियतेच्या शिखरावर असण्याचे भाग्य ज्या काही अमेरिकन नेत्यांना लाभले त्यापैकी क्लिंटन एक. अगदी मोनिका लेविन्स्की प्रकरणात अडकल्यानंतरही त्यांच्या लोकप्रियतेत घट झाली नव्हती.

**ते काय होते? :** अमेरिकेने २०२५ च्या जून महिन्यात इराणच्या आण्विक संयंत्रांवर हल्ला करून ते नेस्तनाबूत केल्याचे आम्हाला सांगण्यात आले होते. आम्ही त्यावर विश्वास ठेवला. मग, आता हा हल्ला कशासाठी करण्यात आला? पुन्हा आण्विक संयंत्रांचे कारण सांगण्यात आले. आता जर इराणचे आण्विक संयंत्र उद्ध्वस्त करण्यात आले असेल तर मग २०२५ च्या हल्ल्यात काय उद्ध्वस्त करण्यात आले होते, काय साध्य करण्यात आले होते असा करडा प्रश्न क्लिंटन यांनी विचारला आहे. क्लिंटन पुढे म्हणतात, माझ्या ८ वर्षांच्या कार्यकाळात जवळपास दररोजच मला इराणबाबत निर्णय घ्यावे लागत होते. ते मी घेतले. झालेल्या चुका आम्ही दुरुस्त केल्या. प्रत्येक निर्णयाचे एक पावित्र्य असते. गंभीरता असते आणि युद्धासारख्या निर्णयाची गंभीरता तर अधिकच मोठी असते. पण, या युद्धाची माहिती राष्ट्रपतींच्या ओव्हल कार्यालयातून रीतसर न देता, गोल्फ मैदानावरून एक ६ मिनिटांची पोस्ट टाकून देण्यात आली. अमेरिकेच्या राष्ट्रपतिपदाचा असा ‘सन्मान’ राखण्यात आला.

**राजा-महाराजा नाही :** अमेरिकेचा राष्ट्रपती हा काही राजा- महाराजा नाही. आपल्या प्रत्येक निर्णयासाठी अमेरिकन जनतेला उत्तरदायी असणारे ते एक घटनात्मक पद आहे. युद्धासारखा मोठा निर्णय घेण्यापूर्वी काय काय करण्यात आले पाहिजे याची तरतूद अमेरिकन घटनेत करण्यात आली आहे. काय झाले त्या साऱ्या तरतुदींचे? सारे काही पायदळी तुडविण्यात आले. सर्व घटनात्मक संस्थांना अंधारात ठेवून, एका समाज माध्यमावर या निर्णयाची घोषणा करण्यात आली अशा जहाल शब्दांत क्लिंटन यांनी आपली भूमिका मांडली आहे.

**शिया-सुन्नी एकजूट :** मुस्लिम धर्मात शिया-सुन्नी हे दोन पंथ आहेत. दोघांचे कधी जमले नाही. पण, खामेनी ठार झाल्यानंतर सुन्नीबहुल देशांमध्येही जे वातावरण दिसून येत आहे, ते पाहता ट्रम्प यांनी शिया-सुन्नी यांच्यात एकजूट घडवून आणली असे मानले जाईल. ख्रिश्चन धर्मात पोप यांना जे स्थान असते, तेच स्थान खामेनी यांचे शिया पंथात होते.

**अनपेक्षित उत्तर :** अमेरिका-इस्रायल यांच्या संयुक्त हल्ल्यास इराणकडून दिले जात असलेले उत्तर अनपेक्षित असे आहे. अमेरिका आपल्या पल्ल्यात येणार नाही याची कल्पना असल्याने इराणने मध्यपूर्वेतील अमेरिकन लष्करी तळांना-वकिलातींना लक्ष्य बनवीत मोठ्या प्रमाणावर अमेरिकेचे नुकसान केले आहे. भारत-पाकिस्तान युद्धात किती विमाने पाडली गेलीत हे ट्रम्प अधूनमधून सांगत असतात. या युद्धात एका दिवसात अमेरिकेची किती लढाऊ विमाने जळून खाक झाली हे ट्रम्प यांनी आता सांगावे.

**चीनचा सहभाग :** भारत-पाकिस्तान युद्धात पाकिस्तानला सर्व प्रकारची मदत चीनने केली होती. आता रशिया व चीन हे दोन्ही देश इराणला लष्करी साहित्य पुरवीत आहेत. चीनने तर एक निवेदन प्रसिद्ध करीत, आपण इराणच्या पाठीशी ठामपणे उभे राहू हे सांगितले आहे. कारण, अमेरिकेला बलाढ्य होऊ देणे हे चीन व रशिया या दोन्ही देशांना परवडणारे नाही. इराणने मागील काही दिवसांत अमेरिकेच्या हवाई व नौदल तळाला ज्या अचूकपणे लक्ष्य केले आहे, ती इराणची ताकद नाही. हे सारे चीन करीत आहे. अमेरिकेच्या पाचव्या आरमाराचे मुख्यालय बहरिनमध्ये आहे. त्याला लक्ष्य करण्यात आले. कुवैतमध्ये असणाऱ्या हवाई तळाला मोठ्या प्रमाणावर नुकसान पोहोचविण्यात इराण यशस्वी झाला.चीनच्या साहाय्याशिवाय इराण हे करू शकत नाही. येणाऱ्या काळात इराण काही भयावह प्रक्षेपणास्त्रांचा मारा करू शकतो. कारण आता या युद्धाची सूत्रे इराणी नेतृत्वाच्या हाती राहिलेली नाहीत. या लढाईत हे नेतृत्व मारले गेले आहे. त्याची जागा आता चीन व रशियाने घेतली आहे. हेच देश आता इराणच्या लष्करी कारवाईचे सूत्रसंचालन करीत असल्याचे म्हटले जाते. इराणच्या भात्यात कोणकोणती शस्त्रास्त्रे आहेत याचाही अंदाज कुणाला बांधता आलेला नाही. मात्र, इराणवर अमेरिकेचा कब्जा होऊ न देणे ही बाब आता चीन व रशिया यांच्यासाठी प्रतिष्ठेची झाली आहे.

**इराण शाबूत :** इराणचे लष्करी नेतृत्व ठार झाल्याचा दावा अमेरिका करीत असली तरी इराणमधील लष्करी यंत्रणा कोलमडून पडल्याचे दिसत नाही. इराणचे लष्करी अधिकारी युद्ध सुरू ठेवण्यात, ते वाढविण्यात यशस्वी होत आहेत. दुसरीकडे या देशातील शाळा व रुग्णालयांवर अमेरिका व इस्त्रायलकडून जे हल्ले केले जात आहेत, त्याने इराणची जनता अमेरिकेच्या विरोधात गेलेली दिसत आहे. मधल्या काळात इराणची जनता खामेनींच्या राजवटीविरुद्ध बंड करण्याच्या स्थितीत दिसत होती. अमेरिकेच्या या हल्ल्यानंतर तेथील चित्र पार बदलल्याचे म्हटले जाते.

**हार्मूजची नाकेबंदी :** मध्यपूर्वेत भडकलेल्या या युद्धाचे राजकीय परिणाम तर आहेतच, शिवाय त्याचे आर्थिक परिणामही आहेत. इराणने हार्मूजची खाडी बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. खाडीच्या दोन्ही बाजूला तेलवाहक जहाजांच्या रांगा लागल्या आहेत. भारत, जपानसह अशियातील देशांची ८६ टक्के तेलवाहतूक या खाडीतून केली जाते तर जगातील २५ टक्के तेलवाहतूक या खाडीतून होत असते. ही खाडी बंद करून इराण, कुवैत, बहरिन, कतार व संयुक्त अरब अमिरात या अमेरिकेच्या मित्र देशांची कोंडी करू शकतो.

**केवळ २४ तासांत :** अमेरिका व इस्रायल यांनी इराणचे आण्विक संयंत्र उद्ध्वस्त केल्याची घोषणा केली असली तरी इराण २४ तासांत अण्वस्त्र तयार करू शकतो असे सांगितले जाते.

इराणने अणुबॉम्बसाठी लागणारे युरेनियम ६० टक्के शुद्ध करण्याची क्षमता यापूर्वीच गाठली असल्याचे मानले जाते. प्रत्यक्षात अणुबॉम्बसाठी युरेनियमची शुद्धता ९० टक्के असावी लागते. याचा अर्थ इराण कमी धोक्याचे अण्वस्त्र तयार करण्याच्या स्थितीत आजही आहे आणि त्याला चीनचा सक्रिय पाठिंबा असल्याने काय काय होऊ शकते हे सांगण्याची गरज आहे?

## वेध

**पुंडलिक आंबटकर**

# सशक्त भारताची तटस्थ भूमिका

सध्या जग तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर येऊन ठेपले आहे. २४ फेब्रुवारी २०२२ पासून रशिया आणि युक्रेनमध्ये युद्ध सुरू आहे. आता अमेरिका आणि इस्रायलने इराणशी युद्ध छेडले आहे. अमेरिका आणि इस्रायलच्या संयुक्त हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्यासह ४८ प्रमुख नेते, ४० लष्करी कमांडर आणि डझनभर वरिष्ठ अधिकारी मारले गेले. वास्तविक या युद्धाशी भारताचा कुठलाही संबंध नाही. परंतु, तरीही भारतातील अनेक ठिकाणी आंदोलने सुरू आहेत. भारत सरकारने याबाबत हस्तक्षेप करावा, अशी मागणी काही मुस्लिमांकडून करण्यात येत आहे. विरोधी पक्षांनीही या प्रकरणी रान उठवून आगीत तेल ओतले आहे. खामेनी यांच्यावरील हल्ल्याबाबत संसदेत चर्चा घडवून आणावी, अशी या लोकांची मागणी आहे. परंतु, बांगलादेशात हिंदूंची सरेआम कत्तल करण्यात आली तेव्हा यांनी तोंडातून एक शब्दही काढला नव्हता. पहलगाम हल्ल्यात २७ हिंदूंची धर्म विचारून निर्घृण हत्या करण्यात आली तेव्हा हे आंदोलक कुठे होते? खामेनी यांच्या बाजूने एकही मुस्लिम राष्ट्र उभे नसताना भारताने यात का म्हणून हस्तक्षेप करावा? भारताने आधीच स्पष्ट केले आहे की, हा काळ युद्धाचा नाही. भारत आज विकासाच्या मार्गावर वेगाने अग्रेसर झालेला आहे. अशा परिस्थितीत कुठल्याही प्रकारचे युद्ध देशाला मागे घेऊन जाणारे ठरू शकते. त्यामुळे भारताने कुठल्याही जागतिक संघर्षाच्या स्थितीत सदैव तटस्थ राहण्याची भूमिका निवडली आहे.



शिया आणि सुन्नी यांच्यातील विस्तव जात नसताना भारतासारख्या हिंदू राष्ट्राने या प्रकरणात दखल तरी का द्यावी? इराण आपला मित्र देश असल्याचे काही आंदोलक सांगत आहेत. परंतु, इराणने भारतासोबत नेमकी कोणती मैत्री निभावली, हे एकदा या लोकांनी स्पष्ट करून सांगितले पाहिजे. खामेनी यांनी ३६ वर्षांच्या सत्तेत इराणमध्ये कठोर हुकूमशाही राबवून जनतेवर प्रचंड अत्याचार केले. १९९९ चे विद्यार्थी आंदोलन, २००९ चे ग्रीन मुव्हमेंट आणि २०२२ मध्ये हिजाबविरोधी निदर्शने करणाऱ्यांचा प्रचंड छळ करण्यात आला. अशा परिस्थितीत खामेनी मुस्लिमांचे रहबर अर्थात धर्मगुरू कसे काय ठरू शकतात?

अवघ्या १६ वर्षांच्या निराधार मुलीला भरचौकात फाशी देणाऱ्या व्यक्तीस धर्मगुरू म्हणून गौरविणे, हे न समजण्यापलीकडचे आहे. खामेनीच्या इशाऱ्यावरून २०२२ मध्ये हजारो आंदोलकांना गोळ्या घालण्यात आल्या. त्यामुळेच खामेनीच्या खातम्यानंतर इराणमध्ये महिला व मुली आनंद साजरा करीत असताना भारतातील काही लोकांना मात्र प्रचंड दु:ख झाले आहे! अलिकडे नवी महासत्ता म्हणून भारताचा उदय झाला आहे. सशक्त भारताला परम् वैभवापर्यंत नेण्याचा संकल्प सरकारचा आहे. यासाठी २०४७ पर्यंतचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे. महाराष्ट्र सरकारने नुकताच आपला ७.६९ लाख कोटींचा अर्थसंकल्प सादर केला. विशेष म्हणजे, महायुती सरकारने २०४७ पर्यंत महाराष्ट्राला ५ ट्रिलियन डॉलर्सची महासत्ता करण्याचा संकल्प सोडला आहे. यासाठी सरकारने प्रत्येक क्षेत्राचे योगदान निर्धारित केले आहे. एका अहवालात आगामी २० ते २५ वर्षांत भारत ३० ट्रिलियन डॉलर्सचा टप्पा गाठेल, असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. ही बाब अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्राला मान्य नसल्यानेच भारताच्या मार्गात अडथळा आणण्याचे प्रयत्न होत आहे.

उमेरिकेचे उपविदेशमंत्री ख्रिस्तोफर लँडो भारताची वाढती अर्थव्यवस्था पाहून खूपच अस्वस्थ झालेले आहेत. ‘आम्ही २० वर्षांपूर्वी चीनबाबत ज्या चुका केल्या त्या भारताबाबत होऊ देणार नाही!’ अशी खदखद त्यांनी बोलून दाखविली आहे. भारताचा आर्थिक उदय अमेरिका ठरवू शकत नाही. भारत आपला मार्ग शोधण्यासाठी सक्षम आहे. आगामी काळात श्रीमंत राष्ट्रांकडून भारताच्या प्रगतीत खोडा घालण्याचे प्रयत्न नक्कीच होणार आहे आणि त्यामुळेच भारताने कुठल्याही युद्धजन्य स्थितीत तटस्थ राहण्याचा मार्ग निवडला आहे. रशिया आणि इस्रायलने सदैव भारताची पाठराखण केली आहे. त्यामुळे हे दोन देश भारताचे सच्चे मित्र होय. परंतु, रशिया आणि इस्रायलमध्ये वैमनस्य आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात कोणीच कोणाचा कायमचा शत्रू अथवा मित्र नसतो, असे म्हटले जाते. परंतु, अमेरिकेला जगावर अधिराज्य राखायचे असल्याने या देशाला नवीन स्पर्धक नको आहेत. त्यामुळे भारताला व्यापारिक समतोल राखूनच पुढे जावे लागणार आहे. अशा परिस्थितीत सरकारची तटस्थ भूमिका सशक्त भारताची पावती देणारी ठरत आहे.

९८८१७१६०२७

## प्रासंगिक

**डॉ. दीपक शिकारपूर**

# अर्थसंकल्प २०२६ : डिजिटल पॉवर हाऊस

मुख्यमंत्री आणि अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ६ मार्च २०२६ रोजी सादर केलेला राज्याचा अर्थसंकल्प हा महाराष्ट्राला ‘ट्रिलियन डॉलर इकॉनॉमी’कडे नेणारा एक महत्त्वाचा टप्पा आहे. या अर्थसंकल्पाने केवळ कृषी आणि पायाभूत सुविधांवरच भर दिला नाही, तर माहिती तंत्रज्ञान, ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्स आणि शाश्वत ऊर्जेवर आधारित ‘ग्रीन डेटा सेंटर्स’च्या माध्यमातून राज्याच्या औद्योगिक नकाशात आमूलाग्र बदल घडवण्याचे ध्येय ठेवले आहे.

**१. नवीन आयटी आणि एआय विभागाची स्थापना :** तंत्रज्ञान क्षेत्रातील वेगाने होणारे बदल लक्षात घेऊन, सरकारने स्वतंत्र ‘इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) विभाग’ स्थापन करण्याची घोषणा केली आहे. या विभागासाठी स्वतंत्र आयुक्तालय असेल, ज्यामुळे धोरणात्मक निर्णय घेणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे अधिक वेगवान होईल. तसेच, सरकारने ओनल आणि सर्वामलसारख्या जागतिक संस्थांशी सामंजस्य करार करून राज्याला एआय संशोधनाचे केंद्र बनविण्याचे पाऊल उचलले आहे.

**२. ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्स : चार लाख नोकऱ्यांचे उद्दिष्ट :** ‘महाराष्ट्र ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर पॉलिसी २०२५’ च्या माध्यमातून राज्याने देशात जीसीसी क्षेत्रात नेतृत्व करण्याचे ठरवले आहे.

**लक्ष्य :** राज्यात ४०० नवीन जीसीसी केंद्रे स्थापन करणे.

**रोजगार :** या माध्यमातून पुढील काही वर्षांत चार लाख उच्च-कौशल्य नोकऱ्या निर्माण केल्या जातील.

**पुणे शहराचे महत्त्व :** पुणे हे सध्या देशातील जीसीसीसाठी सर्वाधिक पसंतीचे ठिकाण ठरत आहे. बँकिंग, फायनान्स, ऑटोमोटिव्ह आणि इंजिनीअरिंग क्षेत्रातील बहुराष्ट्रीय कंपन्यांचे हे ‘कॅप्टिव्ह तंत्रज्ञान केंद्र’ म्हणून उदयास येत आहे.

**विकेंद्रीकरण :** मुंबई-पुण्यासोबतच आता नाशिक, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर या शहरांमध्येही जीसीसी क्लस्टर्स विकसित केले जाणार आहेत.

**३. ग्रीन डेटा सेंटर्स आणि अक्षय ऊर्जा :** डेटा सेंटर्स हे आधुनिक अर्थव्यवस्थेचे कणा आहेत, परंतु ते मोठ्या प्रमाणात वीज वापरतात. यावर उपाय म्हणून महाराष्ट्र सरकारने ‘ग्रीन डेटा सेंटर’ धोरणाला चालना दिली आहे.

**स्वतंत्र वीज निर्मिती :** डेटा सेंटर पार्कना आता स्वतःचा अक्षय ऊर्जा (सौर, पवन किंवा जलविद्युत) प्रकल्प उभारण्याची आणि वीज वितरित करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

**नागपूर येथे प्रगत डेटा सेंटर :** राज्याचा सार्वभौम डेटा सुरक्षित ठेवण्यासाठी नागपूरमध्ये एक ‘स्टेट-ऑफ-द-आर्ट’ डेटा सेंटर उभारले जाणार आहे.

**शाश्वतता :** उद्योगांना कमी दरात हिरवी वीज (ग्रीन एनर्जी) उपलब्ध करून देऊन महाराष्ट्राला आशिया-पॅसिफिकमधील प्रमुख डिजिटल हब बनविण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे.

**४. पुणे :** भविष्यातील जागतिक तंत्रज्ञान केंद्र : पुणे शहरासाठी या अर्थसंकल्पात विशेष तरतुदी आहेत. आयटी कॉरिडॉरमधील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी भूमिगत बोगदे बांधण्याची घोषणा करण्यात आली आहे. मुंबई-पुणे हाय-स्पीड रेल्वे आणि मेट्रो विस्तारामुळे पुण्याची कनेक्टिव्हिटी वाढून नवीन गुंतवणुकीला चालना मिळेल.

**५. रोजगार आणि कौशल्य विकास :** केवळ तंत्रज्ञान आणून उपयोग नाही तर त्यासाठी लागणारे मनुष्यबळ तयार करण्यासाठी सरकारने ‘३६ नवदिशा केंद्र’ स्थापन करण्याची घोषणा केली आहे. हे केंद्र तरुणांना परदेशातील नोकऱ्यांसाठी आवश्यक भाषा कौशल्ये आणि तांत्रिक प्रशिक्षण देतील. तसेच, ‘मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक’ आणि ‘अॅग्रिस्टॅक’ सारख्या योजनांतून ग्रामीण भागातही तंत्रज्ञानावर आधारित रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

**६. स्टार्टअप इकोसिस्टिम :** ‘मुख्यमंत्री महाफंड’ आणि ५०,००० स्टार्टअप्स : सरकारने महाराष्ट्राला देशाची ‘स्टार्टअप राजधानी’ बनविण्यासाठी ‘महाराष्ट्र स्टार्टअप आणि नावीन्यता धोरण २०२५’ ला गती दिली आहे. मुख्यमंत्री महाफंड (५०० कोटी) : नवीन उद्योजकांना सुरुवातीच्या टप्प्यावर आर्थिक बळ देण्यासाठी ५०० कोटी रुपयांचा निधी राखीव ठेवण्यात आला आहे. यातून पात्र स्टार्टअप्सना ५ ते १० लाख रुपयांपर्यंतचे कर्ज अत्यंत कमी व्याजदरात उपलब्ध होईल.

**लक्ष्य :** पुढील ५ वर्षांत १.२५ लाख उद्योजक तयार करणे आणि ५० हजार नवीन स्टार्टअप्सना अधिकृत मान्यता मिळवून देणे.

**कौशल्य आधारित निवड :** तांत्रिक शिक्षण घेतलेल्या ३० लाख तरुणांमधून एआय-आधारित चाचण्या आणि हॅकाथॉनद्वारे २५ हजार सर्वोत्तम उमेदवारांची निवड करून त्यांना सरकार थेट पाठबळ देईल.

**पेटंट साहाय्य :** भारतीय पेटंटसाठी ५ लाख आणि आंतरराष्ट्रीय पेटंटसाठी २० लाख रुपयांपर्यंतची मदत देऊन ‘बौद्धिक संपदा’ निर्मितीला प्रोत्साहन दिले जाईल.

**७. आर्टिफिशिअल इंटेलिजन्स :** धोरणात्मक भागीदारी : महाराष्ट्र हे एआय दत्तक घेणारे देशातील पहिले राज्य ठरत आहे. अर्थसंकल्पात जाहीर केल्याप्रमाणे : जागतिक भागीदारी ओपनेआय आणि सर्वमेआय (भारतीय भाषांसाठी एआय विकसित करणारी संस्था) यांच्यासोबत सरकारने करार केले आहेत.

**‘शिक्षा साथी’ एआय टूल :** अंगणवाडी सेविकांसाठी एआय-आधारित चॅटबॉट लाँच करण्यात आला आहे, जो मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी मार्गदर्शन करेल.

**८ . फ्रंटियर टेक्नॉलॉजी आणि पुण्याचे महत्त्व :** पुणे हे केवळ आयटी हब न राहता आता ‘डीपटेक’ आणि ‘क्वांटम कॉम्प्युटिंग’चे केंद्र म्हणून विकसित केले जात आहे. पुण्यात जागतिक दर्जाचे ३-४ ‘जीसीसी पार्क’ उभारले जातील, जिथे बहुराष्ट्रीय कंपन्यांचे संशोधन केंद्र असतील.

**एव्हीजीसी-एक्सआर पॉलिसी :** ॲनिमेशन आणि गेमिंग क्षेत्रातील स्टार्टअप्ससाठी विशेष सवलती जाहीर केल्या आहेत, ज्याचा मोठा फायदा पुण्यातील आयटी कंपन्यांना होईल.

**आयआयटी बॉम्बेसोबत सहकार्य :** उदयोन्मुख तंत्रज्ञानामध्ये संशोधनासाठी आयआयटी बॉम्बे आणि ‘भारतजेन’ सोबत सामंजस्य करार करण्यात आले आहेत. २०२६ चा हा अर्थसंकल्प विकसित महाराष्ट्र २०४७ च्या दिशेने टाकलेले एक धाडसी पाऊल आहे. आयटी आणि जीसीसी धोरणामुळे महाराष्ट्रातील तरुणांना जागतिक स्तरावरील संधी उपलब्ध होतील, तर ग्रीन डेटा सेंटर्समुळे पर्यावरणाचे रक्षण करत औद्योगिक प्रगती साधता येईल. पुण्यासारखी शहरे या नवीन डिजिटल क्रांतीची प्रमुख केंद्रे म्हणून उदयास येतील, यात शंका नाही.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत)

## वाचक पत्रे

### डिजिटल आवृत्ती सुधारणा

डिजिटल युगात ऑनलाईन आवृत्ती अधिक सुलभ आणि अद्ययावत असणे आवश्यक आहे. तरुण भारतचे मोबाईल ॲप आणि ई-पेपर अत्यंत वाचकप्रिय आहे. त्यावर सातत्याने अपडेटेड बातम्या येतील याची अपेक्षा आहे. तसेच व्हिडीओवर भर द्यावा, ही विनंती.

**अपेक्षा पुराणिक**/पुणे

### तरुण भारतचे स्वागत

पुण्यात आपल्या आवृत्तीचा शुभारंभ झाला, ही अत्यंत आनंदाची बाब आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारधारेतून प्रेरित पत्रकारिता समाजात सकारात्मक परिवर्तन घडवू शकते. आज माध्यम क्षेत्रात वेगवान बातम्यांच्या शर्यतीत अनेकदा सत्य मागे पडते. अशा वेळी अभ्यासपूर्ण, राष्ट्रहिताला प्राधान्य देणारे आणि संस्कारक्षम लेखन करणारे व्यासपीठ आवश्यक आहे. स्थानिक प्रश्नांबरोबरच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विषयांवरही स्पष्ट भूमिका मांडावी. पुणेकर वाचकांचा विश्वास जिंकत ही आवृत्ती लवकरच लोकप्रिय होईल, असा विश्वास आहे.

**विद्या साळुंखे**/पुणे

### ही सारी काँग्रेसचीच देण

भारत-अमेरिका दरम्यान झालेल्या व्यापारिक करारावर काँग्रेस नेते शेतकऱ्यांबद्दल जो कळवळा दाखवत आहे ते पाहता मन भरून आले. काय वाईट परिस्थिती आणली आहे नियतीने. विदेशी शेतकरी जे तंत्रज्ञान वापरून कृषी उत्पादनांची आपल्या भारत देशात स्वस्तात निर्यात करू शकतात ते तंत्रज्ञान भारतीय शेतकऱ्याला मिळू न देण्याचे धोरण राबविणारी काँग्रेस आजही सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करून अडून बसली आहे. तीच काँग्रेस आज शेतकऱ्यांवर अन्याय झाला म्हणून ओरडत आहे. याला काय म्हणावे ? जयराम रमेश यांनी परकीय उत्पादन आयात करून विदेशी राष्ट्रांच्या हितासाठी शेतीत तंत्रज्ञान वापराला बंदी घातली. इथल्या शेतकऱ्यांचे नुकसान करून त्यांचे आर्थिक नुकसान केले. या अगोदर कृत्रिम धाग्याची आयात करून कापूस उत्पादक शेतकऱ्यांना कर्जात बुडवले. शेती करणाऱ्या काँग्रेसी समर्थकांना विनंती आहे की त्यांनी त्यांच्या पक्षाच्या नेत्यांना तंत्रज्ञान मिळू न देण्याच्या धोरणाबद्दल जाब विचारावा.

**जयंत बापट**/७२६३०८९२०४

### विद्यार्थ्यांवर लक्ष केंद्रित करावे

पुणे हे शिक्षणाचे केंद्र मानले जाते. देशभरातील विद्यार्थी येथे शिक्षणासाठी येतात. अशा शहरात तरुण भारतने विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना विशेष प्राधान्य द्यावे. प्रवेशप्रक्रिया, स्पर्धा परीक्षा, शिष्यवृत्ती, तसेच करीअर मार्गदर्शन यावर नियमित माहिती असावी. विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याविषयी जनजागृती करणारे लेखही आवश्यक आहेत. युवा पिढी राष्ट्रनिर्मितीची ताकद आहे. त्यांना योग्य दिशा देण्याचे काम तरुण भारतने करावे.

**गजानन तेली**/पुणे

### धर्माचा चष्मा आणि सोयीस्कर मौन

देशाची राजधानी दिल्लीतील उत्तम नगर परिसरात नुकतीच एक धक्कादायक आणि माणुसकीला काळिमा फासणारी घटना घडली. होळीचा रंग एका लहान मुलीकडून अनवधानाने उडाला, म्हणून तिच्या वडिलांची हत्या जिहादी मानसिकतेच्या टोळक्याने केल्याची बातमी ऐकली. दिल्लीत दिवसाढवळ्या घडलेल्या या घटनेने संपूर्ण देश हादरला असला, तरी राजकीय वर्तुळ आणि तथाकथित विचारवंत या घटनेबाबत सोयीस्कर मौन बाळगून आहेत. रंग खेळताना अनवधानाने रंग उडाला, यासारख्या क्षुल्लक कारणावरून एका तरुणाला गाठून त्याचा जीव घेणे, ही केवळ गुन्हेगारी नसून ती एका विशिष्ट द्वेषमूलक मानसिकतेचे दर्शन घडवते. पीडित तरुण आपल्या कुटुंबाचा आधार होता; परंतु त्याच्या हत्येने एका हिंदू कुटुंबाचा आधार आज कायमचा हिरावला गेला आहे. जेव्हा हीच घटना उलट्या क्रमाने घडते, तेव्हा लोकशाही धोक्यात आहे किंवा असहिष्णुता वाढली आहे असा टाहो फोडणारे राहुल गांधी, प्रियांका गांधी यांच्यासह डावे विचारवंत, सिने कलाकार, मानवाधिकारवादी ही सगळी मंडळी आज मात्र या घटनेवर चकार शब्दही काढायला तयार नाहीत. अन्यायाला धर्माचा चष्मा लावून पाहिले जात असेल, तर याला सर्वधर्मसमभाव म्हणायचे का? हा महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो. आजही काश्मीरमधील हिंदू आपल्याच देशात विस्थापित म्हणून जगत आहेत. त्यांच्या हक्कांवर आणि त्यांच्यावर झालेल्या अन्यायावर काँग्रेसचे भाऊ-बहीण, फारुख अब्दुल्ला, मेहबुबा मुफ्ती, डावी मंडळी आजही ब्र काढत नाहीत. दिल्लीतील या हत्याकांडातील दोषींना कठोरात कठोर आणि फाशीची शिक्षा मिळावी यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी एकमुखाने आवाज उठवणे गरजेचे होते. कायद्याचे राज्य हे केवळ कागदावर नसून ते कृतीत दिसायला हवे.

**अविनाश देशपांडे**/९४२२९५०७५०

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### शिवाजी नाईटच्या दोघींची राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. ८ मार्च -**

छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजच्या अंजू सूर्यवंशी व वैष्णवी भोईटे यांची राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली. अंजूची ८० किलोवरील गटातून आणि वैष्णवीची ५२ किलो गटातून निवड झाली. जालंदर पंजाब येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बॉक्सिंग स्पर्धे साठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या वतीने निवड झाली.के. एन. भिसे महाविद्यालय कुर्डूवाडी येथे विद्यापीठाने आयोजित केलेल्या सराव शिबिरामधून त्यांची निवड झाली. अंजू ही बीए भाग तीनमध्ये शिकत असून घरची आर्थिक परिस्थिती नाजूक असल्याने कमवा शिका योजनेतून शैक्षणिक खर्चाचे नियोजन करते, राहिलेल्या वेळामध्ये क्रीडा आवड जोपासत सतत तीन वर्ष सराव करून या वर्षी बॉक्सिंग स्पर्धेसाठी तिने आपली निवड सार्थ ठरवली. वैष्णवी ही बीकॉम थर्ड इयरमध्ये शिकत असून गत दोन वर्षापासून सराव करत असताना महाविद्यालयीन स्पर्धेमध्ये द्वितीय स्थान प्राप्त केले.या खेळाडूंना प्रा.संतोष गवळी, प्रा. सोहेल पठाण व प्रा.सचिन गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले. या खेळाडूचे मराठा समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष माजी महापौर मनोहरपंत सपाटे, जनरल सेक्रेटरी प्रा. महेश माने उपाध्यक्ष ज्ञानेश्वर सपाटे प्राचार्य डॉ नितीन मोटे यांनी अभिनंदन करुन पुढील स्पर्धेला शुभेच्छा दिल्या.



### जैन कासार प्रतिष्ठानच्यावतीने नऊ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप

**सोलापूर, दि. ८ मार्च-**

जैन कासार प्रतिष्ठानच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या चिंतामणी पार्श्वनाथ शिष्यवृत्तीचे या वर्षीचे वाटप अध्यक्ष हुकूमचंद हेसे, संस्थापक अध्यक्ष डॉ.विलास हरपाळे, अध्याय शिष्यवृत्ती फंडाचे संयोजक महावीर दुरुगकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना करण्यात आले. यावर्षी उच्च शिक्षण घेत असलेल्या गरजू व होतकरू अशा नऊ विद्यार्थ्यांना ५१ हजार रुपयांच्या धनादेशाद्वारे वाटप करण्यात आले. मागील चार वर्षांपासून उपक्रम चालू असून आतापर्यंत अडीच लाख रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात आल्याची माहिती संयोजक महावीर दुरुगकर यांनी दिली. दि. जैन कासार संस्थेचे अध्यक्ष विजयअण्णा कासार, डॉ. विलास हरपाळे, भारतभूषण मैंदर्गे, प्राचार्य अशोक साळवी, डॉ.मधुकर लोखंडे, यांनी दिलेल्या देणगीतून ही शिष्यवृत्ती देण्यात येते. प्रतिष्ठानने चिंतामणी पार्श्वनाथ फंडाची सुरुवात केली असून पंचवीस लाख रुपये जमा करण्याचा संकल्प असल्याचे अध्यक्ष श्री. हेसे यांनी सांगितले. सोलापूर, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातील पद्मराज कासार, ओंकार पाटील, संदेश काटकर, पूनम इंजे, अन्यना कंदले, रोहन कंदले, संकेत बोळ, अरिहंत पाटील आदी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले.

# सोलापुरात बुधवारी ३५ खेळाडूंचा सन्मान

## खेळाडू शिवकालीन मैदानी खेळांचा वारसा जपणारे

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ मार्च-**

पारंपारिक शिवकालीन मैदानी खेळांचा वारसा जपणाऱ्या ३५ खेळाडूंचा सन्मान सोहळ्याचा कार्यक्रम बुधवार, ११ मार्च रोजी सायंकाळी ५.३० वाजता जुना विडी घरकुल येथील कै. प्रकाश तुकाराम सोमा सभागृह, जुना विडी घरकुल, एच ग्रुप, हैदराबाद रोड येथे आयोजित करण्यात आला आहे.

योंगमुडो, दांडपट्टा, लाठी-काठी या खेळात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या प्रशिक्षक, मार्गदर्शक यांच्यासह ३५ हून अधिक महिला खेळाडूंचा आदर्श-सर्वोत्कृष्ट खेळाडू, आदर्श प्रशिक्षक, मार्गदर्शक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. रुद्रशक्ती गुरुकुल शिवकालीन मर्दानी व क्रीडा प्रशिक्षण केंद्र, विडी घरकुल येथील महिला खेळाडूंच्या वर्षभरातील अप्रतिम कामगिरीची दखल घेऊन हा पुरस्कार सोहळा कार्यक्रम आयोजित केला आहे. हा कार्यक्रम कन्या फाऊंडेशनच्यावतीने आयोजित करण्यात आला आहे. तसेच धनश्री विविध विकास संस्था, रुद्रशक्ती गुरुकुल शिवकालीन मर्दानी व क्रीडा प्रशिक्षण केंद्र आणि योंगमुडो असोसिएशन यांच्या विद्यमाने आयोजित केला आहे.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कन्या फाऊंडेशनच्या प्रमुख योगिता मठपती, धनश्री विविध विकास संस्थेचे अध्यक्ष नीलकंठ स्वामी, योंगमुडो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे सरचिटणीस नागेश शेट्टीकर, रुद्रशक्ती गुरुकुल शिवकालीन मर्दानी व क्रीडा प्रशिक्षण केंद्राच्या अध्यक्षां संगिता फुलारी, उपाध्यक्षा रोहिणी भुसारे, सचिवा संजना मिस्कीन, समाजसेवक हरीश सोमा,मीनाक्षी सोमा, मुख्य प्रशिक्षक विवेक मिस्कीन, साक्षी कानगुडे, पूजा शेट्टीकर, बसवराज मठपती, रोटरी क्लब ऑफ अक्कलकोटचे अध्यक्ष जी.एच.पाटील आदी उपस्थित राहणार आहेत.

### या खेळाडूंचा होणार सन्मान

मीनाक्षी हरीष सोमा, हरीष प्रकाश सोमा, विवेक विजय मिस्कीन, संगिता योगिनाथ फुलारी, रोहिणी तुकाराम भुसारे, जना विवेक मिस्कीन, नागेश शशिकांत शेट्टीकर, जी.एच. पाटील, सोनाक्षी मोहन माडे, पूजा नागेश शेट्टीकर, भावना अजय गड्डम, स्वप्नाली नृसिंह जमादार, दर्शनी संतोष सोमा, श्रद्धा दीपक इप्पनपल्ली, गौरी गिरीराज माळी, वेदश्री अमरनाथ गुडूर, प्रवलिका मोहन कामुर्ती, जानवी मल्लिकार्जुन म्हेत्रे, बिंदूप्रिया भास्कर कुने, वैभवी शिवानंद आळगुडगी, तेजल अंबादास रच्चा, मान्यता देविदास रोहिटे, संध्या सोमण्णा पुजारी, श्रद्धा तानाजी सरवदे, मता नागनाथ अलशेट्टी, आदिती नंदकुमार नल्ला, पल्लवी सिद्राम बिनगुंडी, भविष्या सतीश सिंदम, आराध्या बसवराज मसरेड्डी, नव्या राजेश कुस्मा, कोमल कृष्णा मनीकोंडा, श्रावणी सुनील गवळी, साक्षी शशिकांत कानगुंडे, मोनिका नागेश कसबे,ममता चंद्रशेखर मंडल.



## मानसिक व शारीरिक स्वास्थ्यासाठी नियमित योग व ध्यानाची गरज

### योग व निसर्गोपचार तज्ज्ञ कल्पना मोकाशी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मार्च-**

मानसिक व शारीरिक स्वास्थ्य चांगले ठेवण्यासाठी प्रत्येक स्त्रीने दररोज स्वतःसाठी एक तास वेळ देऊन योग व ध्यान करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन योग व निसर्गोपचार तज्ज्ञ कल्पना मोकाशी यांनी केले.

जागतिक महिला दिनानिमित्त वडाळा येथील सखी मंचच्या वतीने काकानगर प्राथमिक शाळेतील सांस्कृतिक सभागृहात वडाळा गावातील आशा वर्कर्स, परिचारिका, अंगणवाडी कर्मचारी व कष्टकरी महिलांचा सत्कार व महिलांच्या निरोगी आरोग्यासाठी योग व ध्यानाचे महत्त्व या विषयावर मोकाशी व्याख्यानप्रसंगी बोलत होत्या. प्राचार्या डॉ. वैशाली साठे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. डॉ. रेखा रिसवडकर, डॉ. वैशाली गवळी, सोनाली घोडके, तुळसा चौगुले, प्रा.डॉ. प्रतिभा बिरादार, प्रा.उज्वला शिंदे, प्रा.स्मिता शिंदे, उपस्थित होत्या. सूत्रसंचालन प्रा. उज्वला शिंदे, प्रास्ताविक प्रा. प्रतिभा बिराजदार तर आभार प्रदर्शन प्रा. स्मिता शिंदे यांनी केले.

## स.हि.ने प्रशालेतील २ विद्यार्थ्यांना इन्स्पायर अवॉर्ड जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ मार्च-**

भारत सरकारच्या Department of Science and Technology (DST) विभाग आयोजित Inspire ward Manak -२०२५-२६ साठी स.हि.ने. प्रशालेच्या दोन विज्ञान साहित्याची निवड झाली आहे. सिद्धी संजय पाटील (९) -Two wheeler Umbrella आणि मृणाल नीरज महामुरे(७) - Smart Sitting lert System for health and comfort या दोन्ही विद्यार्थिनीस DST कडून प्रत्येकी रू दहा हजार रक्कम मिळणार आहे.

या विद्यार्थिनींना मुख्याध्यापिका नीता येरम ाळकर व विज्ञान विभाग प्रमुख संगीता रेळेकर यांनी मार्गदर्शन केले होते. त्यांचे सरस्वती मंदिर संस्थेचे अध्यक्ष ॲड. पांडुरंग पांडुरंग देशमुख, उपाध्यक्ष रेवती कुलकर्णी, सचिव रोहिणी तडवळकर यांनी अभिनंदन केले.

## आस्था सामाजिक संस्थेचे महिला गुणगौरव पुरस्कार जाहीर; मंगळवारी वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मार्च-**

सोलापूर समाज कार्यात अग्रेसर असणारी आस्था सामाजिक संस्थेच्या वतीने ८ मार्च जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून शैक्षणिक, क्रीडा व सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या म हिलांना गुणगौरव पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार असल्याची माहिती अध्यक्ष आनंद तालिकोटी व प्रसिद्धी प्रमुख सुहास छंचुरे यांनी दिली.

हा पुरस्कार वितरण सोहळा मंगळवार १० मार्च रोजी सायंकाळी ६.३० वाजता शिवानुभव मंगल कार्यालय पूर्व मंगळवार पेठ या ठिकाणी होणार आहे. या पुरस्काराचे स्वरूप ट्राफी, प्रम ाणपत्र,शाल, फेटा,रोप असे आहे. पालिकेच्या स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते, माजी महापौर शोभा बनशेट्टी, राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक भाग्यश्री जाधव, लायन्स क्लब ऑफ सोलापूर अध्यक्षा नंदा लोहोटी, गांधी नाथा रंगजी प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सरोजिनी मुलींटी, रूद्र अकादमी ऑफ मार्शल आर्ट योगा प्रधान संचालिका संगीता जाधव यांच्या प्रमुख उपस्थिती संपन्न होणार आहे.

### हे आहेत पुरस्काराचे मानकरी

अनिता मोरे (महिला पोलिस अंमलदार), श्वेता हुल्ले (आवाज महाराष्ट्र निवेदिका), वंदना तळीखेडे (महाराष्ट्र कामगार कल्याण महिला कामगार साह्यिका), प्रिया माने (म.न.पा आरोग्य सेविका), ऐश्वर्या खडके (उद्योजिका, सहशिक्षिका), प्रतिमा स्वामी (वि.मो.मेहता प्रशाला), अश्विनी देवद्वारे (सहशिक्षिका चतुराबाई श्राविका प्राथमिक), अर्चना अक्कलकोटे ( पी.एस. इंग्लिश मीडियम हायस्कूल शिक्षका), अंजली सांबळे (एलआयसी एजंट), ज्ञानेश्वरी भोसले (वृत्तपत्र समन्वयक), तेजस्वी रायलिवाला (प्रशिक्षिका मोटर ड्रायव्हिंग स्कूल), महादेवी धुळे ( समाजसेविका), स्नेहल पेंडसे (योग प्रशिक्षिका), सुजाता जुगदार (मुख्याध्यापिका छत्रपती शिवाजी प्रशाला), उषा क्षिरसागर (पोस्ट मास्टर).



## काहींना कुटुंब हाच पक्ष वाटतो तर शिंदे साहेबांना कार्यकर्ता हेच कुटुंब वाटतं : प्रा. डॉ. ज्योती वाघमारे

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ मार्च-**

हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी सर्वसामान्य कष्टकरी कार्यकर्त्यांना संधी दिली. त्यांचाच वारसा पुढे चालवत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माझ्यासारख्या गरीब, मागासवर्गीय कुटुंबातील मुलीला सर्वोच्च अशा सभागृहात खासदार केले. काहींना कुटुंब हाच पक्ष वाटतो तर शिंदे साहेबांनी कार्यकर्ता हेच कुटुंब मानले आहे असे सांगतानाच सर्वांना अभिमान वाटेल असं गल्लीतला आवाज दिल्लीत पोहोचवेन.लढत राहीन असेच पाठबळ द्या अशी भावना राज्यसभेच्या नूतन खासदार प्रा. डॉ. ज्योती वाघमारे यांनी केले.

राज्यसभेवर खासदार म्हणून बिनविरोध निवड झाल्यानंतर प्रा. डॉ. ज्योती वाघमारे यांचा सोलापूर श्रमिक पत्रकार संघ आणि महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी विचारमंचावर शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, अमर पाटील, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष तथा नगरसेवक मनीष केत, संघाचे सरचिटणीस सागर सुरवसे, खजिनदार किरण बनसोडे, जिल्हाध्यक्ष अभिषेक आदेप्पा, विश्वभूषण लिमये आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

### घोड्यावर बसून आल्या नूतन खासदार

चार हुतात्मा पुतळा आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास अभिवादन केल्यानंतर कार्यकर्त्यांच्या आग्रहामुळे नूतन खासदार प्रा. डॉ. ज्योती वाघमारे या घोड्यावर बसून श्रमिक पत्रकार संघापर्यंत आल्या. त्यानंतर घोड्यावर बसूनच त्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत गेल्या. खासदार ज्योतीताई तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है चा नारा कार्यकर्त्यांनी दिला.



## सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित, सोलापूर

**द्वारा पंचवटी नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर**

**ताबा नोटीस - नमूना 'Z' नोटीस**

**म.स.सं. नियम १९६० मधील नियम १०७ (११) ड-१**

**स्थावर मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा (Symbolic) घेतल्या बाबतची नोटीस**

भी खाली सही करणार वसूली, मालमत्ता जप्त व विक्री अधिकारी सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित सोलापूर द्वारा पंचवटी नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर ज्याअर्थी मला प्राप्त महाराष्ट्र सहकारी संस्था आधीनियम १९६० कलम १५६ व महाराष्ट्र सहकारी संस्था आधीनियम १९६१ चे नियम १०७ अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारान्वये तसेच मा. उपनिबंधक सहकारी संस्था सोलापूर शहर, सोलापूर यांच्याकडून प्राप्त झालेला कलम १०१ च्या दाखल्यानुसार खालील नमूद कर्जदार / जामीनदारास नियमानुसार मागणी व जप्ती नोटीस पाठवून त्यांच्या राहत्या घरी जाऊन जंगम मालमत्तेचा निरंक पंचनामा केलेला आहे. त्यानंतर त्यांच्या मालकीच्या स्थावर मालमत्तेचा १०७ (१०) नुसार जप्ती आदेश दिलेला आहे. संस्थेकडे गहाणखत / जप्त असणारी / जप्त केलेली स्थावर मालमत्ता नियम १०७ चे (नियम ११ ड-१) नुसार नमुना झेड नोटीस देऊन सदरील मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा घेतलेला आहे. विशेष करून ऋणको व तमाम नागरिकांना या नोटीसिद्वारे सावध करण्यात येते कि, या स्थावर मालमत्तेबाबत कोणीही खरेदी, विक्री, गहाण-दान, टाच, बोजा किंवा इतर हक्कात व्यवहार करू नये. या उपर कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास तो पंचवटी नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर यांचे खाली दर्शविलेल्या येणे बोजाची रक्कम व त्यावरील होणारे व्याज व वसुली खर्चास कायदेशीररीत्या अधीन रहावे लागेल याची नोंद घ्यावी. त्याची खालील नमूद स्थावर मालमत्ता तिचे वर्णन खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | थकबाकीदाराचे /जाबदाराचे नाव व गाव | वसुली दाखला क्र. व दिनांक | स्थावर मालमत्तेचे वर्णन | गट / भूम ापन क्र. व उपविभाग | येणेबाकी रु. २८/०२/२०२६ अखेर |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. शुभम गुंडोपंत देशपांडे यांचे जाबदार नं.४ श्री. गुंडोपंत शामराव देशपांडे यांचे सामायिक हिस्सा पुरते | १०१/३५३/ २०२४ | मौजे - लिंबीचिंचोळी, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर | १५१ | २,९६,७७६/- |
| २ | श्री. राम अपण्णा हातागळे यांचे जाबदार नं.२ श्री. कल्प्पा शंकर वाघमोडे यांचे हिस्सा पुरते | १०१/३६२/ २०१६ | मौजे - कसबे सोलापूर ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर | १७१/१/ दक्षिण | ५,८८,५८८/- |
| ३ | श्री. संजय जगन्नाथ सिंदगी यांचे हिस्सा पुरते | १०१/६५६/ २०१६ | मौजे भवानी पेठ टीपी ०२ ता. न.भु.का. न.भु.अ.जि. सोलापूर | १०२/ सी/१३ | २,३०,४३५/- |
| ४ | श्री. श्रीनाथ रामचंद्र संभाराम यांचे जाबदार नं.२ श्री. अमोल प्रेमनाथ चव्हाण यांचे हिस्सा पुरते | १०१/६५६/ २०१६ | मौजे - मजरेवाडी, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर | ९४/२/अ | १०,१७,०८९/- |
| ५ | संजय विलास मुळे | १०१/३४२/ २०२५ | मौजे - कसबे सोलापूर, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर | १६६/२/ प्लॉट नं. २९ | ९,१५,१४५/- |

ही उद्‌घोषणा प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत आपली थकबाकी, त्यावरील पुढील होणारे व्याज व इतर खर्चासह थकबाकी रक्कम संस्थेकडे भरणा करून त्याची रितसर पावती घेऊन तसेच कर्ज खाते बेबाक प्रमाणपत्र घ्यावे अन्यथा कायद्यातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही केली जाईल. म्हणजेच आपल्या स्थावर मालमत्तेचा ताबा / कब्जा प्रत्यक्ष घेण्यासाठी मा. जिल्हादंडाधिकारी साहेब तथा मा. जिल्हाधिकारी सोलापूर यांच्याकडे रितसर प्रकरण दाखल करून व पुढील योग्ताय ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

ताबा / कब्जा घेतल्याची नमुना झे नोटीस प्रसिध्द केली.

हि नोटीस दिली दिनांक : ०८/०३/२०२६.

(शिक्का)

स्वाक्षरीत/-
एन.ए. एकबोटे
वसूली, मालमत्ता जप्त व विक्री अधिकारी
सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित सोलापूर द्वारा - पंचवटी नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर




## वेळापुरातील मोफत आरोग्य शिबीरात 134 जणांची आरोग्य तपासणी

### ४४५ चष्म्यांचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापुर, दि. ८ मार्च-**

वेळापूर येथे घेण्यात आलेल्या मोफत आरोग्य शिबिराचे उद्घाटन आमदार उत्तमराव जानकर यांच्या हस्ते करण्यात आले

आमदार उत्तमराव जानकर यांच्या मार्गदर्शनाखाली व सेवासदन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, मिरज यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच अमोल पनासे मित्र परिवार यांच्या वतीने भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपिठावर समिती सदस्या विमलताई जानकर , जि.प. सदस्या सौ, मिनाक्षि सरतापे, वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे, मार्केट कमिटीचे माजी संचालक दादासाहेब घाडगे, रिपाई आठवले माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, डॉ. स्नेहल जानकर, काशिनाथ आडत, माजी उपसरपंच जावेद मुलाणी,आयोजक अमोल पनासे, सौ सीमा खाडे आधी उपस्थित होते.

झालेल्या आरोग्य शिबिरामध्ये तज्ज्ञ डॉ. एम के इनामदार, डॉ गिरमे डॉ कदम, डॉ. स्नेहल जानकर डॉ. बापूराव ओहाळ,डॉ. तुषार माने, डॉ. अमर माने , डॉ. अभिजीत पाटील, डॉ. सागर पवार,डॉ. आबासाहेब देवकते, डॉ. मनोज देवकते, डॉ. शिवाजी पनासे, आदि. डॉक्टरांनी डोळे तपासणी, नाक घसा तपासणी, दंत तपासणी, दमा, एलर्जी, त्वचारोग, हृदयविकार, डायबिटीज, थायरॉईड, संधिवात, पोटाचे विकार यासह विविध आजारा बाबत तपासणी केली. यामध्ये मोतीबिंदू ५२, पंचर्कम २६, अर्थौंदा १५, न्यूरो १२, हृदयाचे १७, कान नाक ४,डॉ. एमडी दाखवायचे ५, इरोसर्जन ३, रुग्ण आढळुन आले. त्याच बरोबर ४४५ जणांना चष्मे वाटप करण्यात आले. शिबीर कार्यक्रम ास माजि जि.प. सदस्य सतीशराव माने देशमुख, सुषमा नारनवर, गौतम माने, नागनाथ भोसले, मारुती लोढे, बाबा माने, , ॲड. प्रवीण वाघमोडे, सोनाली पाटील, मीनाक्षी पाटील, निशा गिरमे, मीनाक्षी नाईकनवरे, म हादेव साबळे, युवराज झंजे, आप्पासो पाटील , संजय देशपांडे, संजय मंडले, हनुमंत वायदंडे, दिपक राऊत, जवान माने देशमुख, दादा तुपे, दिपक माने देशमुख, रणजीत सरवदे, शंकर आडत, युवराज मंडले, नारायण साठे,रोहीत चव्हाण, समिर तांबोळी, मंगेश तुपे, यांच्यासह आनेक मान्यवर उपस्थित होते.

## वाहन लंपास केल्याप्रकरणी अटकपूर्व जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ मार्च-**

धमकी देत वाहन लंपास क्रेल्याप्रकरणी आरोपी आदित्य जाधव याचा अटकटपूर्व जामीन येथील जिल्हा व सत्र न्यायाधिश एम.एस. शर्मा यांनी मंजूर केला आहे.



याबाबतची हकीकत अशी मंद्रुप पोलीस स्टेशन, तालुका दक्षिण सोलापूर येथे आरोपी आदित्य अभयकुमार जाधव (वय २५ वर्षे, रा. सोलापूर) यांच्यावर १४ डिसेंबर २०२५ रोजी हा गुन्हा दाखल करण्यात आला होता. १४ डिसेंबर रोजी रात्री ९:३० वाजता बाळासाहेब नंदुरे याच्या घरी मोहित गायकवाड, आदित्य जाधव, लक्ष्मीकांत कोळी, समर्थ खुरूद, सुदर्शन ठाकूर, संकल्प चव्हाण येऊन म्हणाले की, तुमचा मुलगा प्रथमेश नंदुरे याने मोहित गायकवाड याच्याकडून दोन महिन्या पूर्वी २ लाख रुपये कर्ज घेतला आहे त्या पैशाचे व्याज दे नाही तर तुझी गाडी घेऊन जातो असे लाकडाने धमकी देऊन म ोटारसायकल (एमएच १३ डीडब्ल्यू ३७५४) घेऊन गेले. सदर प्रकरणामध्ये आरोपी आदित्य जाधवच्यावतीने ॲड. जयराज दिपक नंदूरकर यांनी येथील मे. जिल्हा व सत्र न्यायालयात अटकपूर्व जामि नासाठी अर्ज दाखल करण्यात आला होता. मा. न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून ४ मार्च २०२६ रोजी आरोपीस अटकपूर्व जामीन मंजूर केला.


**इंदिरा श्रमिक महिला नागरी सहकारी बँक नि. सोलापूर (विसर्जित)**
२५४, साखर पेठ, सोलापूर - ४१३००५ , डॉ. सौ. वैशाली साळवे - अवसायक

**- जाहीर प्रकटन -**

इंदिरा श्रमिक महिला नागरी सहकारी बँक नि, सोलापूर (अवसायनात) २५४, साखर पेठ, सोलापूर - ४१३००५ या अवसायन बँकेची रद्दी, फर्निचर, तिजोरी व लोखंडी रॅक यांची कोटेशन मागवून विक्री करावयाची आहे. सदर डेडस्टॉक बँकेच्या उपरोक्त नमूद पत्त्यावरील कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध आहे. तरी इच्छुक खरेदीदारांनी सदर डेडस्टॉकची पाहणी करुन डेडस्टॉक तपशीलानुसार दि. ०९.०३.२०२६ ते दि.११.०३.२०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत कोटेशन बँकेचे व्यवस्थापक यांचेकडे सादर करावीत. विहित मुदतीनंतर आलेल्या कोटेशन्सचा विचार केला जाणर नाही. याची नोंद घ्यावी.

स्थळ : सोलापूर
दिनांक : ०७.०३.२०२६

स्वाक्षरीत/- अवसायक
इंदिरा श्रमिक महिला नागरी सहकारी बँक नि. सोलापूर (अवसायनात)

# टी-२० विश्वचषकाचा थरार



## महत्त्वाचे

### लक्ष्य सेन ऑल इंग्लंड ओपन उपविजेता



**बर्मिंगम** : भारताचा २४ वर्षीय लक्ष्य सेनने रविवारी येथे पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत चीन तैपेईच्या लिन चुन-यीविरुद्ध २१-१५, २२-२० असा पराभव पत्करल्यानंतर त्याला ऑल इंग्लंड ओपन २०२६ स्पर्धेत रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. अंतिम फेरीच्या आधी कोर्टवर पाच तासांपेक्षा जास्त वेळ घालवणाऱ्या सेनने ५७ मिनिटांच्या लढतीत विजेत्या लिनविरुद्ध कठोर संघर्ष केला, परंतु ऑल इंग्लंडच्या अंतिम फेरीत दुसऱ्यांदा तो चुकीच्या बाजूने खेळला. या वर्षाच्या सुरुवातीला योनेक्स-सनराईज इंडिया ओपन सुपर ५०० विजेतेपद जिंकणारा लिन हा प्रतिष्ठित स्पर्धेत विजेतेपद जिंकणारा चीन तैपेईचा पहिला पुरुष एकेरीचा खेळाडू ठरला. २०२२ च्या अंतिम फेरीत पोहोचलेल्या सेनला त्याच्या लिफ्ट आणि टॉसमध्ये खोली शोधण्यासाठी संघर्ष करावा लागला आणि लिनने क्रॉस कोर्ट विजेते शोधण्यासाठी आणि पहिला गेम जिंकण्यासाठी त्यांच्यावर झेप घेतली.

### मध्य पूर्वेतील युद्धामुळे दोहातील आयसीसीची बैठक पुढे ढकलली

**नवी दिल्ली** : अमेरिका, इस्रायल व इराण यांच्यात सुरू असलेल्या युद्धाच्या पृष्ठभूमीवर कतारमधील दोहा येथे २५ ते २७ मार्च दरम्यान होणारी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेची (आयसीसी) तीन दिवसांची बैठक पुढे ढकलण्यात आली आहे. ही बैठक पुढील महिन्यात त्याच खंडात पुन्हा आयोजित करण्यात आली आहे. अहमदाबाद येथे भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील टी-२० विश्वचषक अंतिम सामन्याच्या एक दिवस आधी शनिवारी आयसीसी सदस्यांना औपचारिक पत्र पाठवण्यात आले, असे आयसीसीच्या सूत्राने सांगितले.

### दीक्षाला पाचवे स्थान, प्रणवी १४ व्या स्थानी

**मॅजेन्टा** : दीक्षा डागरने २०२६ च्या हंगामात ऑस्ट्रेलियन महिला क्लासिक गोल्फ स्पर्धेत अव्वल पाच क्रमांकात स्थान मिळविले. १-अंडर ७१ कार्डिंग केल्यानंतर दीक्षाने विश्वासाई पाचवे स्थान मिळवले. अव्वल-५ स्थान पटकावण्यासाठी सज्ज असलेली प्रणवी उर्स अंतिम फेरीत घसरली व ती एकमेव ७८ गुणांसह १४ व्या स्थानावर राहिली. या आठवड्यात मैदानात असलेल्या इतर दोन भारतीय, अवनी प्रशांत आणि हिताशी बक्षी अपयशी ठरल्या.

### महिला सक्षमीकरणमुळे समाज समृद्ध : मांडविया

**कोलकाता** : महिला सक्षम होतात, तेव्हा कुटुंबे आणि समाज समृद्ध होतो, राष्ट्र उभारणीत थेट योगदान देतो, असे प्रतिपादन क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी केले. क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी रविवारी आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आणि महिलांच्या तंदुरुस्ती आणि सायकलिंगला प्रोत्साहन देण्यासाठी येथे आयोजित फिट इंडिया पिंक ऑन सायकल रॅलीमध्ये भाग घेतला. देशभरात संडे ऑन सायकल उपक्रमात नागरिकांनी उत्साहाने भाग घेतला. सायकल उपक्रमामुळे तंदुरुस्ती, शाश्वतता व सामुदायिक सहभागाचा संदेश बळकट झाला.

# मार्टिनच्या गाण्यावर प्रेक्षकही थिरकले

◆ **अहमदाबाद, ८ मार्च**

भारत व न्यूझीलंड संघ यांच्यातील आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यापूर्वी नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये झालेल्या समारोप समारंभात पॉप स्टर रिकी मार्टिन आणि सुखबीर सिंग यांनी उत्साहवर्धक सादरीकरणाने स्टेडियममध्ये उपस्थित प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. रिकी मार्टिनने प्रेक्षकांना 'शेक युअर बॉन-बॉन' वर नाचायला लावले, तर सुखबीरच्या उत्साही 'ओ हो हो' गाण्याने स्टेडियममधील प्रेक्षकांच्या आनंदाला पारावर उरला नाही. चाहत्यांनी जोरदार गर्जना केली, जल्लोष केला. त्यामुळे बहुप्रतिक्षित अंतिम सामन्यापूर्वी उत्साही वातावरण निर्माण झाले.



(वृत्तसंस्था)

## विश्वचषकासाठी उत्सुक : सूर्यकुमार

रविवारी अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक २०२६ स्पर्धेच्या अंतिम सामन्यात न्यूझीलंडचा कर्णधार मिचेल सॅण्टनरने नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला.



नाणेफेक करताना सूर्यकतुमार यादव व मिचेल सॅण्टनर

न्यूझीलंडने आपल्या अंतिम एकादशमध्ये एक बदल केला आणि अष्टपैलू व ऑफ-स्पिनर कोल मॅककॉन्चीच्या जागी वेगवान गोलंदाज जेकब डफीला संधी दिली. दरम्यान, भारताने मुंबईतील उपांत्य फेरीत इंग्लंड संघाला पराभूत करणाऱ्या संघालाच कायम ठेवले. नाणेफेक जिंकल्यानंतर, न्यूझीलंडचा कर्णधार मिचेल सॅण्टनरने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय स्पष्ट केला. आम्ही प्रथम गोलंदाजी करणार आहोत. ते खूप चांगले दिसते. भारतीय संघ काय करतात ते बघू व त्यांना धावसंख्येपर्यंत मर्यादित ठेवण्याचा प्रयत्न करू. आमचे खेळाडू चांगले खेळत आहे, त्यामुळे आम्हाला उत्तम संधी आहे. उपांत्य सामन्यातून खेळाडू आत्मविश्वास घेतील. हा सर्वात मोठा टप्पा आहे आणि सर्वजण सज्ज आहे. अंतिम एकादशमध्ये मॅककॉन्ची नाही, डफी खेळत आहे, असे न्यूझीलंडचा कर्णधार सॅण्टनर म्हणाला. आम्ही प्रथम फलंदाजी करण्यास आणि त्याच संयोजनासह पुढे जाण्यास आनंदी आहे, असे भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादव म्हणाला.

## साडेतीन वाजतापासून स्टेडियमवर चाहत्यांची गर्दी



आयसीसी पुरुषांच्या टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारत आणि न्यूझीलंडदरम्यानच्या अंतिम सामन्याची सर्वच क्रिकेटप्रेमींना उत्सुकता लागली होती, अशातच अहमदाबादच्या क्रिकेटरसिकांना प्रत्यक्ष अंतिम सामना बघण्याची मेजवानी मिळाली होती. त्यामुळे प्रेक्षकांनी रविवारी दुपारी साडे तीन वाजतापासूनच नरेंद्र मोदी स्टेडियमवर गर्दी केली.

काहींनी टीम इंडियाची जर्सी परिधान केली होती, तर काहींनी तिरंगा असलेले फेटे परिधान केले होते. काही प्रेक्षकांच्या हातात जितेगा भाई जितेगा इंडिया जितेगा असे लिहिलेले फलक होते. प्रवेशद्वार खुले होताच सुमारे ९० हजार प्रेक्षकांनी तिकीट दाखवित स्टेडियममध्ये प्रवेश केला.


# कलबुर्गी टेनिस स्पर्धेत पुण्याची वैष्णवी विजेती

**सानिया मिर्झानंतर पहिली भारतीय खेळाडू**

◆ **पुणे, ८ मार्च**

कर्नाटकातील कलबुर्गी येथे झालेल्या इंटर नॅशनल टेनिस फेडरेशन डब्लू ३५स्पर्धेत अखिल भारतीय गटात अंकिता रैनाचा पराभव करून पुण्याच्या वैष्णवी आडकरने तिच्या कारकिर्दीतील दुसरे आणि आतापर्यंतचे सर्वात मोठे विजेतेपद पटकावले.

दुहेरीचे विजेतेपद जिंकल्यानंतर दुसऱ्या दिवशी,स्पर्धेत दोन्ही खेळाडूंनी दोन तास आणि १४ मिनिटे संघर्ष केला आणि त्यानंतर ३३ वर्षीय अंकिताला तिच्यापेक्षा १२ वर्षांनी लहान असलेल्या वैष्णवीकडून ७-६(३), ६-४ असा पराभव पत्करावा लागला. वैष्णवीच्या सर्व्हिसवर सेट पॉइंट असूनही तिला सलामीचा सामना ६-५ असा बंद करता आला नाही. अंकिताने टायब्रेकमध्ये वर्चस्व गाजवत स्पर्धेत आघाडी घेतली. दुसऱ्या सेटमध्ये ४-२ अशी आघाडी घेत वैष्णवीने अंकिता आणि तिच्यात काही अंतर ठेवले असे दिसते. तीन वर्षांत पहिल्यांदाच अंतिम फेरी खेळणाऱ्या अंकिताने बरोबरी साधण्यासाठी पुनरागमन केले. गेल्या महिन्यात, पुण्यातील वैष्णवीने बेंगळुरूमध्ये उपविजेतेपद पटकावले होते आणि २००९ मध्ये सानिया मिर्झा नंतर



विजेती वैष्णवी आडकर व उपविजेती अंकिता रैना

डब्लू १०० किंवा त्याहून अधिक स्तरावरील स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचणारी ती पहिली भारतीय महिला ठरली होती.

कलबुर्गीमधील तिच्या विजयासह, जागतिक क्रमवारीत ४६४ व्या स्थानावर असलेल्या वैष्णवीने ४ हजार ८६० अमेरिकन डॉलर्स आणि ३५ रँकिंग गुण मिळवले. लाईव्ह रँकिंगमध्ये, तिने ३९६ या कारकिर्दीतील सर्वोच्च स्थानावर झेप घेतली आहे, जी भारताच्या क्रमांक १ सहजा यमलापल्लीपेक्षा फक्त तीन स्थानांनी खाली आहे. पुढील महिन्यात नवी दिल्ली येथे होणाऱ्या बिली जीन किंग कप आशिया-ओशनिया स्पर्धेसाठी वैष्णवी आणि अंकिता या दोघांनाही भारतीय संघात स्थान देण्यात आले आहे.

> ''माझ्यासाठी हा आठवडा खूप चांगला होता, परिस्थिती खूप कठीण होती आणि मला अभिमान आहे की, मी या परिस्थितीत शेवटच्या सामन्यापर्यंत धडपड करू शकलो. मी लहान असल्यापासून अंकिताला उच्च पातळीवर खेळताना पाहिले आहे. म्हणून, तिच्याशी स्पर्धा करणे, तिच्यासोबत दुहेरी खेळणे ही खूप मोठी गोष्ट आहे. मला माहित होते की ती शेवटच्या टप्प्यापर्यंत सामना सोडत नाही. म्हणून, मला प्रत्येक टप्प्यावर लढत राहावे लागले आणि मी ते करू शकलो,''
>
> **- वैष्णवी आडकर**



(वृत्तसंस्था)

# जोकोविच ऑलिम्पिक जेतेपद कायम राखण्यास उत्सुक

◆ **इंडियन वेल्स, ८ मार्च**

मी सध्या ३८ वर्षांचा असूनही माझे अजूनही दीर्घकालीन ध्येय आहे. २०२८ साली होणाऱ्या लॉस एंजेलिस ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत पॅरिस ऑलिम्पिकमधील आपले जेतेपद राखण्यास उत्सुक आहे, असे सर्बियाचा स्टार टेनिसपटू नोवाक जोकोविच म्हणाला.

जोकोविचने २०२४ च्या उन्हाळी ऑलिम्पिकमध्ये कार्लोस अल्काराझवर विजय मिळवून सुवर्णपदक मिळविले. हे माझ्या कारकिर्दीतील सर्वात मोठे क्रीडा यश असल्याचे तो म्हणाला. परंतु २०२८ लॉस एंजेलिस ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा सुरू झाल्यावर जोकोविच ४१ वर्षांचा असेल.

ऑलिम्पिकमध्ये पोहोचण्यासाठी हे दीर्घकालीन ध्येयांपैकी एक आहे. ते साध्य झाल्यास छान होईल, असे तो इंडियन वेल्समध्ये कामिल माजचझाकवर दुसऱ्या फेरीत विजय मिळवल्यानंतर पत्रकारांशी बोलताना म्हणाला.



नोवाक जोकोविच

लॉस एंजेलिस अजून खूप दूर आहे. माझ्या वयात व माझ्या कारकिर्दीच्या या टप्प्यावर, प्रत्येक वर्ष हे लहान असलेल्यांसाठी जास्त काळ असल्यासारखे वाटते, असे तो म्हणाला. पण मी ते पूर्ण करण्याचा प्रयत्न करेन.

(वृत्तसंस्था)

# भारतीय महिला हॉकी संघाची विजयी सलामी

## ऊरुग्वेवर ४-० ने विजय

◆ **हैदराबाद, ८ मार्च**

तेलंगणातील हैदराबाद येथील जी. एम. सी. बालयोगी हॉकी मैदानावर रविवारपासून प्रारंभ झालेल्या एफआयएच हॉकी विश्वचषक पात्रता फेरी २०२६ च्या पहिल्या दिवशी भारताने आपल्या सलामीच्या सामन्यात उरुग्वेवर सरळ ४-० असा विजय नोंदविला.

दुसऱ्या चरणात पेनॉल्टी कॉर्नरवर भारताने पहिला गोल केला, या गोलच्या आधारावर भारताने मध्यंतरापर्यंत १-० अशी आघाडी मिळविली होती. तिसऱ्या चरणात ईशिकाने भारताची आघाडी दुप्पट केली. चौथ्या चरणातही भारताने सामन्यावर आपले नियंत्रण राखले व लालसेरियामीने संघासाठी तिसरा गोल केला. ५८ व्या मिनिटाला ऋतुजाने गोलरक्षकाला हुलकावणी देत चौथा गोल नोंदवून भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला.



विजयी सलामी नोंदविणारा भारतीय महिला हॉकी संघ

**इंग्लंडचा इटलीवर विजय**

इंग्लंडने इटलीवर ५-२ अशी विजयी सलामी नोंदविला. कोरियाने ऑस्ट्रियाचा १-० असा पराभव केला. इंग्लंडकडून ग्रेस बाल्सडन (१२, ३२), लोटी बिंगहॅम (१५), एलिझाबेथ नील (१६) आणि अण्णा तोमनने (२७) गोल केले, तर इटलीसाठी इव्हाना पेसिना (१९) आणि फेडेरिका कार्टाने गोल केले.

**ॲमी कॅस्टीलोचा विजयी गोल**

ॲमी कॅस्टीलोने २० व्या मिनिटाला नोंदविलेल्या एकमेव गोलच्या जोरावर स्कॉटलंडने वेल्सवर १-० असा विजय नोंदविला.

**कोरियाची ऑस्ट्रियावर मात**

अन्य सामन्यात कोरियाने ऑस्ट्रियावर १-० ने मात केली. कोरियाकडून सिओना किम (३४) ही एकमेव गोल करणारी खेळाडू आहे.

(वृत्तसंस्था)

# न्यूझीलंडची ली ताहुहू वन-डे क्रिकेटमधून निवृत्त

## टी-२० मध्ये खेळत राहणार

◆ **वेलिंग्टन, ८ मार्च**

न्यूझीलंडची अनुभवी वेगवान गोलंदाज ली ताहुहूने रविवारी महिला एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली. ३५ वर्षीय ताहुहूने १५ वर्षांच्या कारकिर्दीला पूर्णविराम दिला, १०३ सामन्यांत १२५ बळी घेतले, हा न्यूझीलंड महिला एकदिवसीय संघाचा विक्रम आहे, मात्र ती टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये खेळत राहणार आहे.

ली ताहुहूने जून २०११ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध पदार्पण केले. तिने चार महिला एकदिवसीय विश्वचषक (२०१३, २०१७, २०२२ आणि २०२५) मध्ये भाग घेतला. गत वर्षीच्या विश्वचषकात इंग्लंडविरुद्धचा तिचा सामना न्यूझीलंडसाठीचा तिचा शेवटचा एकदिवसीय सामना होता.



केवळ विश्वचषकात ताहुहूने ३६ बळी घेतले, जे न्यूझीलंडसाठी एक विक्रम आहे व सर्वकालीन यादीत तीन नवव्या क्रमांकाची सर्वोत्तम फलंदाज आहे. एकदिवसीय क्रिकेटमध्ये व्हाईट फर्न्स शर्ट घालणे हा नेहमीच एक भाग्य आणि सन्मान राहिला आहे, असे ताहुहूने म्हटले आहे.२०२४ मध्ये टी विश्वचषक जिंकणे ही एक मोठी कामगिरी होती आणि या वर्षाच्या अखेरीस या संघाला आमचे विजेतेपद राखण्यास मदत करण्यासाठी मी खरोखरच इंग्लंडमध्ये जाण्यास प्रेरित आहे, असे ती म्हणाली.

(वृत्तसंस्था)

# अर्शदीप कौरचा सुवर्णभेद

◆ **नवी दिल्ली, ८ मार्च**

येथील करणीसिंग शूटिंग रेंजमध्ये आयोजित राष्ट्रीय निवड चाचणी नेमबाजी स्पर्धेत गट अमध्ये २५ मीटर पिस्तूल महिला स्पर्धेच्या अंतिम फेरीत अर्शदीप कौरने अव्वल स्थान पटकावले. या स्पर्धेत दुहेरी ऑलिम्पिक पदक विजेती मनू भाकर सुद्धा होती. आठव्या स्थानावर पात्र ठरलेल्या पंजाबच्या या महिला नेमबाजाने अनुभवी दिव्या टी.एस. चा ३७-३६ असा पराभव करून आठ नेमबाजांच्या अंतिम फेरीत अव्वल स्थान मिळवले. माजी आशियाई विजेती राही सरनोबतने ३३ हिट्ससह तिसरे स्थान पटकावले, दिव्याने शूट-ऑफमध्ये तिच्यावर विजय मिळवला. रिदम सांगवान चौथ्या स्थानावर राहिली, त्यानंतर निवेदिता व्ही. नायर, भाकर, राष्ट्रीय कांस्यपदक विजेती अंजली चौधरी आणि चिंकी यादव आदींनी अव्वल आठमध्ये स्थान मिळविले.



सुवर्णपदकाची मानकरी अर्शदीप कौर

सोमवारी पुरुष आणि महिला दोघांसाठी ५० मीटर रायफल ३ पोझिशनची पात्रता आणि अंतिम फेरी तसेच १० मीटर एअर पिस्तूल पुरुषांची पात्रता आणि अंतिम फेरी होणार आहे.

(वृत्तसंस्था)

# जॉर्ज रसेल ऑस्ट्रेलियन ग्रांप्री विजेता

◆ **मेलबर्न, ८ मार्च**

मेलबर्नच्या अल्बर्ट पार्कमध्ये आयोजित ऑस्ट्रेलियन ग्रॅण्ड प्रिक्स सर्कीट फॉर्म्युला वन शर्यतीत मर्सिडीज स्वार जॉर्ज रसेलने सहकारी किमी अँटोनेलीला मागे टाकत जोरदार विजय मिळवला. हंगामाच्या सुरुवातीच्या ऑस्ट्रेलियन ग्रांप्रीमध्ये रसेलने फेरारीच्या सुरुवातीच्या आव्हानाला हरवले.

पात्रता फेरीत वर्चस्व गाजवणाऱ्या रसेलने अल्बर्ट पार्क येथे पहिल्या विजयाने मर्सिडीजच्या हंगामपूर्व जबरदस्त फॉर्मला अधोरेखित केले. रविवारी लेकसाइड सर्किटवर ढगाळ वातावरणात ब्रिटनच्या रसेलने अँटोनेलीपेक्षा जवळजवळ तीन सेकंद पुढे कामगिरी केली, फेरारीचा चार्ल्स लेक्लेर्क १५ सेकंदांपेक्षा जास्त मागे होता.




आनंद साजरा करताना ब्रिटनचा मर्सिडीज चालक जॉर्ज रसेल

रसेलने लेक्लेर्कसोबत एक रोमांचक सुरुवातीच्या द्वंद्वयुद्धात भाग घेतला कारण रेसर्सनी सुरुवातीच्या नऊ लॅप्समध्ये सात वेळा आघाडीची अदलाबदल केली. रसेलने ४५ लॅप्ससाठी हार्ड कंपाउंड्स चालवले आणि मर्सिडीजच्या गतीने उर्वरित कामगिरी केली. गतविजेता लँडो नॉरिस पाचव्या स्थानावर राहिला, तो सात वेळा विश्वविजेता फेरारीचा लुईस हॅमिल्टनपेक्षा एक स्थान मागे राहिला. चार वेळा चॅम्पियन मॅक्स व्हर्स्टापेन रेड बुलसाठी सहाव्या स्थानावर राहिला.

(वृत्तसंस्था)

# ऑस्ट्रेलिया महिला संघाने जिंकली एकमेव कसोटी

## ॲनाबेल सदरलॅण्ड सामनावीर मालिकावीर

◆ **पर्थ, ८ मार्च**

ऑस्ट्रेलियाने तीन दिवसांतच भारताविरुद्धचा गुलाबी चेंडूचा एकमेव कसोटी क्रिकेट सामना १० गड्यांनी जिंकला. ऑस्ट्रेलियाने गत तीन दिवसांत आपल्या जबरदस्त वर्चस्वाचे रूपांतर एकतर्फी विजय मिळवून केले.

पहिल्या डावांत १२५ धावांनी पिछाडीवर राहिलेल्या भारतीय महिला संघाने दुसऱ्या डावांत १४९ धावा काढल्या, त्यामुळे ऑस्ट्रेलियासमोर विजयासाठी २५ धावांचे सोपे लक्ष्य राहिले. ऑस्ट्रेलियाने २५ धावांचे नाममात्र लक्ष्य कोणताही अडथळा न आणता व एकही गडी न गमावता पूर्ण केले.

कर्णधार एलिसा हिलीसाठीही हा एक योग्य निरोप ठरला. हिलीने आपल्या कारकिर्दीचा शेवट आपल्या प्रतिस्पर्ध्यावर शानदार विजय मिळवून केला.



एकमेव कसोटी जिंकणारा ऑस्ट्रेलियाच महिला संघ चषकासह

भारताने तिसऱ्या दिवशी ६ बाद १०५ धावांवर सुरुवात केली. नाबादवीर प्रतीका रावल (६३) व स्नेह राणाने (३०) भारताला १३२ धावांपर्यंत पोहोचवले. रावलने आपल्या अर्धशतकादरम्यान उत्कृष्ट फलंदाजी केली. राणाला ॲश गार्डनरने वेगवान चेंडूने बाद केले. गार्डनर व सामनावीर ॲनाबेल सदरलॅण्ड यांच्या जोडीने भारताचा दुसरा डाव ४८.२ षटकांत १४९ धावांत संपविला.

ऑस्ट्रेलियाच्या सलामीवीर जॉर्जिया वोल व फोबी लिचफिल्डने २५ धावांचे आव्हान केवळ ४.३ षटकांत सहजतेने पार केले. जॉर्जियाने नाबाद १६ धावांची, तर फोबीने नाबाद ११ धावांची खेळी केली.

आम्ही टी-२० मध्ये मालिका विजयासह चांगली सुरुवात केली, परंतु एकदिवसीय आणि कसोटी सामन्यांमध्ये चांगली कामगिरी कायम राखू शकलो नाही. ऑस्ट्रेलियात पूर्ण मालिका खेळणे हा एक चांगला अनुभव होता. गुलाबी चेंडूवरील कसोटी एक वेगळे आव्हान होते, असे भारताची कर्णधार हरमनप्रीत कौर सामन्यानंतर म्हणाली. टी-२० मालिकेतील पराभवातून पुनरागमन करणे अविश्वसनीय होते आणि सर्व खेळाडूंचा अभिमान वाटतो. संघाला पुढे जाताना पाहून आणि काही चांगले निकाल मिळाल्याने मला आनंद झाला आहे, असे ऑस्ट्रेलियाची कर्णधार एलिसा हिली म्हणाली.

(वृत्तसंस्था)

# आयसीसी टी-२० विश्वचषक ट्रॉफीचे जयपूरशी नाते

◆ **जयपूर, ८ मार्च**

आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक आपल्या उच्च-स्तरीय क्रिकेटसाठी जगाचे लक्ष वेधून घेते, परंतु या स्पर्धेचे जयपूरशीही फारसे ज्ञात नसलेले नाते आहे. या जयपूरमध्ये आयकॉनिक विश्वचषक ट्रॉफी तयार करण्यात आली.

ऑस्ट्रेलियाच्या मिनाले ब्राइस यांनी प्रारंभिक डिझाइन संकल्पना तयार केल्यानंतर त्यांनी या स्पर्धेसाठी ट्रॉफी बनवली होती, असे जयपूर येथील ट्रॉफी डिझायनर अमित पाबुवाल यांनी सांगितले.

ट्रॉफीची डिझाइन रूपरेषा २००७ मध्ये तयार करण्यात आली होती, त्याच वर्षी आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक स्पर्धेची पहिली आवृत्ती आयोजित करण्यात आली होती. त्यानंतर, आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने त्यांना ट्रॉफी तयार करण्याचे काम सोपवले.



आयसीसी टी-२० विश्वचषक ट्रॉफी

डिझाइन रूपरेषा अंतिम झाल्यानंतर आयसीसीने मला ट्रॉफी बनवण्याचे काम सोपवले. २००७ मध्ये आयसीसी टी-२० विश्वचषक ट्रॉफी अशा प्रकारे तयार करण्यात आली होती, असे त्यांनी सांगितले.

पाबुवाल यांनी यापूर्वी क्रिकेटसाठी जगातील सर्वात मोठी चांदीची 'फ्रेंडशिप चषक' ट्रॉफी डिझाइन केली होती व अखेर आयसीसीने टी-२० विश्वचषक ट्रॉफीसाठी त्यांच्याशी संपर्क साधला.

आयसीसीने सुरुवातीला टायटॅनियम व काचेच्या मिश्रणाचा वापर करून ट्रॉफी तयार करण्याची योजना आखली होती जेणेकरून डिझाइन टी-२० क्रिकेटच्या जलद व आधुनिक शैलीचे प्रतिबिंबित करेल, असे त्यांनी सांगितले.

अनेक प्रोटोटाइप तयार करण्यात आले होते, परंतु धातूच्या रचनेशी एकत्रित करताना काचेचे घटक वारंवार तुटले, त्यामुळे संकल्पना अंमलात आणणे तांत्रिकदृष्ट्या कठीण झाले. अनेक प्रयोगांनंतर, मी सल्ला दिला की हे संयोजन तांत्रिकदृष्ट्या कार्य करणार नाही, असे त्यांनी सांगितले.

अंतिम आवृत्ती प्लॅटिनम प्लेटिंगसह चांदीची बनलेली होती, त्यामुळे ती टिकाऊ व आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी योग्य बनली.

मूळ ट्रॉफी आयसीसी मुख्यालयात राहते, तर विजेत्या संघाला एकसारखीच प्रतिकृती मिळते, असे पाबुवाल म्हणाले. ही ट्रॉफी सुमारे २१ इंच उंच आहे, सुमारे सहा किलोग्रॅम वजनाची आहे व प्लॅटिनम प्लेटिंगसह चांदीची बनलेली आहे, असे ते म्हणाले.

(वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## अर्थसंकल्प प्रतिक्रिया...

### शेतकऱ्यांचा सातबारा कोरा होणार नाही



भाजपा सरकार पूर्वीपासून शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याच्या घोषणा करत आहे. परंतु अर्थसंकल्पात सरकारने शेतकऱ्यांची निराशा केली आहे. दोन लाखापर्यंत कर्जमाफीची घोषणा केली असली तरी पात्र शेतकऱ्यांना असा शब्द वापरला आहे म्हणजेच कर्जमाफी अटी शर्तीवर आधारित आहे. शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी तर नाहीच आणि कोणत्याही शेतकऱ्यांचा सातबारा कोरा होणार नाही हे स्पष्ट दिसून येते. सर्वसामान्यांना दिलासा नाही. युवकांना रोजगार निर्मितीसाठी तसेच पायाभूत सुविधा वाढीसाठी ही या बजेटमध्ये तरतुदी असल्याचे दिसून येत नाही. एकूणच राज्याला प्रगतीकडे नेणारा हा अर्थसंकल्प नसल्याचे दिसते.

**- ॲड. सविता शिंदे, करमाळा**

### सर्वसमावेशक अर्थसंकल्प



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभा निवडणुकीच्या काळात शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचे आश्वासन दिले होते. ते आश्वासन यावेळी अर्थमंत्री म्हणून अर्थसंकल्प सादर करताना देवा भाऊंनी पाळले आहे .यामुळे शेतकऱ्याचा उतारा कोरा होण्यास मोठा हातभार लागणार आहे. या अर्थसंकल्पामध्ये देवा भाऊंनी महिला ,शेतकरी, युवक, सर्वसामान्य मजूर यांना न्याय देण्याची भूमिका घेतली आहे. त्यामुळे हा अर्थसंकल्प सर्व समावेशक ठरणार असून राज्याच्या प्रगतीला मोठा हातभार लावणारा ठरणार आहे .

**- सुशील क्षीरसागर, नगरसेवक,मोहोळ**

### ग्रामीण भागाचा चेहरा मोहरा बदलणार



मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत सादर केलेला अर्थसंकल्प राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारा ठरला आहे. राज्यातील शेतकऱ्यांना २ लाख पर्यंतच्या कर्जमाफीची मोठी घोषणा यामध्ये करण्यात आली आहे. तसेच १००० लोकसंख्या असणाऱ्या गावांमध्ये सिमेंट काँक्रीटचे रस्ते सरकार बनवणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. यामुळे ग्रामीण भागाचा चेहरा मोहरा बदलणार आहे. लाडकी बहीण योजना अविरतपणे सुरु राहणार असल्याने बहिणींना आनंद देणारा अर्थसंकल्प ठरला आहे.या अर्थसंकल्पात महिला, विद्यार्थ्यांसह सर्व घटकांचा विचार करुन विविध योजना जाहीर करण्यात आल्या आहेत. त्यामुळे हा परिपूर्ण असलेला अर्थसंकल्प राज्याला पुढे घेऊन जाणारा ठरणार आहे.

**- सचिन जाधव, अध्यक्ष जकराया शुगर, वटवटे.**

### शेतकरी केंद्रित अर्थसंकल्प



पीक कर्जमाफी व सिंचन प्रकल्पांवर भर शेती उत्पादन वाढवणे व शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे. २. महिला सक्षमीकरण : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना पुढे चालू ठेवणे. महिलांना आर्थिक मदत व स्वावलंबन. ३.जलव्यवस्थापन व सिंचन : नदी जोड प्रकल्प, पाणी साठवण व पाणी व्यवस्थापन सुधारणा करण्यात येणार आह. ४.पर्यावरण संरक्षण : मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड, प्रदूषण कमी करण्यासाठी जुनी वाहने स्क्रॅप धोरण. ५.पायाभूत सुविधा विकास : रस्ते, शहरे, औद्योगिक विकासावर भर. ग्रामीण आणि शहरी भागात विकासकामे यावर भर. ६.दीर्घकालीन आर्थिक विकास : महाराष्ट्राला २०४७ पर्यंत ५ ट्रिलियन अर्थव्यवस्था बनवण्याचे उद्दिष्ट आहे.

**- जुबेर मुजावर, सी ए, सांगोला.**

### अन्नपूर्णा धनशेट्टी यांची आज श्रध्दांजली सभा

**सोलापूर, दि. ८ मार्च-**



सोलापूरचे थोर हुतात्मा मल्लप्पा धनशेट्टी यांच्या सुनबाई व थोर स्वातंत्र्यसैनिक, शांतीसंग्राम, माजी आमदार कै. शिवशंकर मल्लप्पा धनशेट्टी यांच्या धर्मपत्नी, स्वातंत्र्य लढ्यापासून विविध आंदोलनात सहभागी झालेल्या कै. अन्नपूर्णा शिवशंकर धनशेट्टी यांचे वयाच्या १०० व्या वर्षी वृध्दापकाळाने नुकतेच निधन झाले. त्यांच्या त्यागमय जीवनाला अभिवादन करण्यासाठी सोमवार दि. ९ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता ''मातोश्री सेवा कुंज'' जोडभावी पेठ येथे श्रध्दांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या श्रध्दांजली सभेस उपस्थित राहावे, असे आवाहन हुतात्मा शिक्षण प्रसारक मंडळ, बसव ब्रिगेड, श्री. बसवेश्वर सर्कल मित्र परिवार व श्री. श्रावण मास भक्त मंडळ आदी संघटनांच्या वतीने केले आहे.

## निधन वृत्त...

### निर्मला नाकील

**सोलापूर, दि. ८ मार्च-**



विजापूर रोड नुतन प्रशालेजवळील पापारामनगर येथील निर्मला वसंतराव नाकील यांचे रविवारी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मोदी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. दंगबर जैन गुरुकुलचे सेवानिवृत्त शिक्षक स्व.वसंतराव नाकील यांच्या पत्नी होत.

### अमोल पाटील

**माळशिरस, दि. ८ मार्च -**



येथील बांधकाम व्यावसायिक अमोल पाटील ( वय ४५ वर्षे) यांचे हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले.त्यांच्या पश्चात आई,पत्नी,एक मुलगी असा परिवार आहे.त्यांच्या अकस्मात जाण्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

### सरोजिनी हब्बु

**सोलापूर, दि. ८ मार्च-**



उत्तर कसबा येथील सरोजिनी शाम्भुलिंग हब्बु (वय ७५) यांचे रविवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सिद्धेश्वर मंदिराचे मुख्य पुजारी आनंद हब्बू यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी कर्नूल येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.

# डाळिंब झाले निर्यात; केळी, द्राक्ष अडकली

**शेतकऱ्यांवर आर्थिक संकट**

**द्राक्षापासून बेदाणा मात्र केळीचे काय?**

**कमी दामात माल विकल्याशिवाय पर्याय नाही**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मार्च-**

मध्यपूर्वेतील युध्दामुळे सोलापूर जिल्ह्यातील करमाळा, माढा आणि पंढरपूर भागातून आखाती देशांत जाणारे केळीचे २५० कंटेनर 'हार्मुज' बंदरावर रोखण्यात आली आहेत. जहाजे पुन्हा नवी मुंबईच्या जेएनपीटी बंदराकडे वळवण्यात येत आहेत. डाळिंबाचे निर्यात झाले मात्र केळी व द्राक्ष अडकून पडल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढावले आहे.

सोलापुरातून निर्यात केलेला माल जवळपास केळी १२०० टन आणि द्राक्ष ४०० टन बंदरावर अडकल्याची माहिती मिळत आहे. सोलापूर जिल्ह्यात ३५ हजार हेक्टर केळीक्षेत्र आहे तर २३ हजार हेक्टर टन द्राक्षाचे क्षेत्र आहे. तर ३५ ते ४० हजार हेक्टरवर डाळिंब आहे. डाळिंबाचे लवकर निर्यात झाल्याने या शेतकऱ्यांची मोठी आर्थिक हानी झाली नाही.

सध्या ज्या शेतकऱ्यांचा माल उशिराने आला आहे; त्यांचेच थोडेफार नुकसान होणार आहे. जळगावच्या बरोबरीने सोलापुरात केळी उत्पादन होत असते. कतार, कुवेत, इराण, सौदीअरब, कुवेत आदी आखाती भागात केळीला अधिक मागणी असते. ही केळी गेली नसल्याने या शेतकरी बांधवांचे मोठे नुकसान होत आहे.

पंढरपूर, माळशिरस, करमाळा, माढा या भागांत जवळपास १५ हून अधिक कोल्डस्टोरेज आहेत. पण ती सध्या फुल्ल झाली आहेत. पुढे माल जाऊच शकत नसल्याने आलेली केळी ठेवायची कुठे आणि विकायची कुठे? द्राक्ष उत्पादकांना बेदाणा करता येतील. मात्र केळीचे काय करायचे? असा सवाल शेतकरी बांधवांना पडला आहे.केळीबरोबरच द्राक्षाचीही मोठी निर्यात जिल्ह्यातून होते. द्राक्षाचे २३ हजार हेक्टरवर क्षेत्र जिल्ह्यात आहे. जिल्ह्यातून विशेषतः पंढरपूर, बार्शी, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, माढा, धाराशिव जिल्ह्यातून दरवर्षी मोठ्या प्रमाणात द्राक्ष निर्यात होते. मात्र, सध्याची स्थिती पाहता सुमारे ४०० टन द्राक्षे कोल्ड स्टोअरेजमध्ये आहेत.

आखाती देशाशिवायही अधिक युरोपिय देशात द्राक्षांची निर्यात होते, पण त्याचा अप्रत्यक्ष फटका द्राक्ष निर्यातीला बसला आहे. युध्द नाही थांबल्यास स्थानिक बाजारपेठांत कमी दामात शेतकऱ्यांना माल विकल्याशिवाय आता पर्यायच उरणार नाही. या युध्दामुळे आंतरराष्ट्रीय सागरी वाहतूक प्रभावित झाली आहे.



**दररोज एक हजार ते बाराशे टन केळी निर्यात**

सोलापूर जिल्ह्यातील डाळिंब निर्यात जानेवारी-फेब्रुवारीमध्ये मोठ्या प्रमाणात झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून इराण-इस्त्राईल युध्द चालू झाल्याने शेतकऱ्यांचा माल निर्यात करण्यात अडचणी होत आहेत. आपल्या एका जिल्ह्यातून दररोज जवळपास १००० ते १२०० टन केळी निर्यात होत असते, असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी सांगितले.

## अल्पवयीन मुलीशी गैरवर्तन

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ८ मार्च-**

शहरात नातेसंबंधांना काळीमा फासणारी धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. घरात कोणी नसताना एका इसमाने पाचवीत शिकणाऱ्या अवघ्या ११ वर्षीय मुलीशी गैरवर्तन केल्याचा गुन्हा नोंद झाला आहे. संबंधित मुलीने धाडस दाखवत वडिलांसह पोलिस ठाण्यात येवून तक्रार दाखल केली आहे.



पीडितेने फिर्यादीत म्हटले की, दि. २२ फेब्रुवारी रोजीच्या दिवशी घरी मुलगी एकटी असताना तो नराधम घरी आला व त्या कोवळ्या मुलीला जवळ ओढून तिचा विनयभंग केला. त्या मुलीने कशीबशी त्याच्या तावडीतून सुटका करून दूर झाली. दि. २३ फेब्रुवारी रोजी तो पुन्हा घरात आला आणि तु पण छान दिसतेस, असे म्हणून हसत निघून गेला. त्याच दिवशी रात्रीच्या वेळी पिडीत मुलगी झोपेत असताना आवाज आल्याने झोपेतून उठुन पप्पांना आवाज दिला. परंतु पप्पांना जाग आली नाही. पीडित मुलगी झोपेतुन जागी झाल्याचे त्याने पाहिले व तो मुलींकडे पळत आला व तोंड दाबुन कोणाला काही बोलू नकोस नाहीतर तुला जिवे मारीन, अशी धमकी दिली. त्यामुळे पिडीता खूप घाबरली होती. दरम्यान, पिडीतेची आई व तो इसम अंधारात कोठे गेले ते पिडीत मुलीला कळाले नाही. दुसऱ्या दिवशी आई कोठे दिसेना म्हणून वडिलांनी पोलिस ठाणेस येवून आई हरवल्याची तक्रार दिली होती.

## बेशिस्त वाहन चालकावर कारवाई करा

**पिलीव, दि.७ मार्च-**

पिलीव (ता.माळशिरस) येथे दोन हायस्कूल व एक ज्युनिअर कॉलेज आहे. याठिकाणी पिलीव व आसपासच्या परीसरातील अल्पवयीन मुले मोठ्या प्रमाणावर मोटारसायकलचा वापर करतात. शाळा, कॉलेज सुटल्यावर ही मुले तीनजण गाडीवर बसून गाडया अतिशय वेगाने चालवितात. या सर्वांचा ताबडतोब बंदोबस्त करावा अशी मागणी भाजपा युवा मोर्चाचे सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष राहुल मदने यांनी पिलीव पोलीस प्रशासनाकडे केली आहे. निवेदन हवालदार धनाजी झगडे व पंडीत मिसाळ यांनी स्विकारले. याबाबत अनेकदा पालकांना समज दिली पण तरीसुद्धा विद्यार्थी, पालक यांना काही सुद्धा फरक पडत नाही. ही मुले शाळा, कॉलेज सुटल्यावर अक्षरशः रेस खेळतात. यामुळे वारंवार अपघात होतात. तसेच मुलींना सुद्धा याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. पालकही कसलाही न विचार करता मुलांना गाड्या देत आहेत, असेही या निवेदनात म्हटले आहे.

## 'नवभारत'मध्ये विज्ञान प्रदर्शनाचा उत्साह

**करे-पाटील यांच्याकडून २५ हजारांचे बक्षीस जाहीर**

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.६ मार्च-**



राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त येथील नवभारत इंग्लिश मीडियम स्कूल व ट्रिकलिंग स्टार्स येथे झालेल्या विज्ञान प्रदर्शनात विविध वैज्ञानिक संकल्पना, नाविन्यपूर्ण मॉडेल्स आणि प्रयोगांची मांडणी होती. उपस्थितांनी विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले.

नवीन कल्पनांना चालना आणि संशोधनाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने शाळेने या प्रदर्शनाचे आयोजन केले होते. यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष डॉ. गणेश करे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली या प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. यावेळी शितल करे, डॉ. स्मिता बंडगर, डॉ. निलेश मोटे, शितल लोंढे, अभंग, आगरवाल, भिंगारे, विवेक ननवरे आणि दिग्विजय घोलप उपस्थित होते. प्रदर्शनात नर्सरी ते नववीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत पर्यावरण संवर्धन, ऊर्जा, अवकाश संशोधन, आरोग्य आणि आधुनिक तंत्रज्ञान अशा विविध विषयांवरील मॉडेल्स सादर केली. यावेळी विज्ञान क्षेत्रातील विशेष योगदान व मानद डॉक्टरेट' पदवी प्राप्तीबद्दल डॉ. करे-पाटील यांचा मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यावेळी डॉ. करे-पाटील यांनी विज्ञान प्रदर्शनासाठी २५ हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले. तसेच, नवभारत शाळेला 'राज्यस्तरीय आदर्श शाळा पुरस्कार' आणि सहभागी ३५ विद्यार्थ्यांना 'विशेष पुरस्कार' देण्याची महत्त्वाची घोषणाही केली. मुख्याध्यापिका अश्विनी क्षीरसागर यांनी प्रास्ताविक केले.

## हंजगी आश्रम शाळेत महिलांचा ओटी भरुन सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि.७ मार्च**



अक्कलकोट तालुक्यातील हंजगी येथील प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळेत जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिला सप्ताह कार्यक्रमात ओटी भरुन महिलांचा सन्मान करण्यात आला. ओटी भरणे हा स्त्रीच्या सर्जनशीलतेचा आपल्या संस्कृतीने केलेला सन्मान मानला जातो.

यावेळी जेऊर ग्रामीण उपकेंद्राचे डॉ श्वेता जाधव यांनी शिक्षणामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास आणि निर्णय घेण्याची क्षमता वाढते. शिक्षणामुळे स्त्री सक्षम बनते. म्हणूनच शिक्षण हा स्त्री सक्षमीकरणाचा मुख्य पाया असल्याचे प्रतिपादन केले.अध्यक्षपदी सरपंच भाग्यश्री हालोळे होते. सरपंच,आरोग्य सेविका,नर्स,आशा वर्कर, अंगणवाडी सेविका ,मदतनीस, विद्यार्थी व ग्रामस्थ यांच्या सहकार्याने महिला दिनाचा कार्यक्रम झाला. सुत्रसंचालन पुजा वंजारी तर आभार साक्षी हडपद यांनी मानले.

**आईचा खेळ पाहून विद्यार्थी झाले आनंदीत**

आश्रम शाळेच्या मैदानावर अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात बहुसंख्य माता पालक यांनी महिला दिनाचे औचित्य साधून विविध खेळांचा मनसोक्त आनंद लुटला. आपल्या आईचे खेळ पाहून विद्यार्थी मात्र पोट धरून हसले. तेव्हा आईच्या चेहऱ्यावर खरोखर नारी सन्मानाचे झलक दिसली.

## प्रा.डॉ. सुवर्णा हजारे-डांगे यांना राज्यस्तरीय 'पु.ल.देशपांडे मुक्तांगण शिक्षक रत्न' पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ८ फेब्रुवारी -**




येथील पांडुरंग शिक्षण प्रसारक मंडळाच्या उमा महाविद्यालयातील इतिहास विषयाच्या प्रा.डॉ. सुवर्णा हजारे डांगे यांना विटा (जि. सांगली) येथील भारतमाता ज्ञानपीठ संस्थेतर्फे राज्यस्तरीय 'पद्मश्री पु.ल.देशपांडे मुक्तांगण शिक्षक रत्न' पुरस्कार प्रदान करण्यात आला. मुक्तांगण ग्रंथालय, विटा यांच्या माध्यमातून आयोजित ४४ व्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्र कामगार साहित्य परिषद, पुणेचे अध्यक्ष तथा नामांकित कवी पुरुषोत्तम सदाफुळे पाटील यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, शाल आणि संत तुकारामांची मूर्ती देऊन डॉ.हजारे यांचा गौरव करण्यात आला. या प्रसंगी साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त साहित्यिक आसाराम लोमटे यांच्यासह सुप्रसिद्ध उद्योजक प्रसाद गायकवाड, साहित्यिक शरद तांदळे, दौलतनाना शितोळे, आमदार सुहास बाबर, महेश कदम आदी मान्यवर उपस्थित होते.डॉ.सुवर्णा हजारे डांगे यांनी साहित्य, मराठी भाषा, इतिहास संशोधन आणि समाजप्रबोधनाच्या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. शैक्षणिक सेवेसोबत अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनाधीनतेविरोधी जनजागृती, स्त्रीशक्तीचा जागर आणि विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक भान व प्रेरणा निर्माण करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. हा पुरस्कार भारतमाता ज्ञानपीठचे सचिव वैशाली कोळेकर, कार्याध्यक्ष डॉ. ऋषिकेश मेटकरी आणि रघुराज मेटकरी यांच्या संस्थेतर्फे प्रदान करण्यात आला.

'संयुक्त महाराष्ट्र चळवळ व महिला : एक चिकित्सक अभ्यास' या डॉ. सुवर्णा हजारे डांगे यांच्या पीएच.डी. प्रबंधाचे विशेष कौतुक करण्यात आले. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांनी सादर व प्रकाशित केलेले संशोधनपर लेख शैक्षणिक क्षेत्रासाठी मोलाचे ठरले आहेत. शिक्षण, संशोधन आणि समाजप्रबोधन यांचा प्रभावी समन्वय त्यांच्या व्यक्तिमत्त्वात प्रकर्षाने जाणवतो.

## अक्कलकोटमध्ये कॅन्सर उपचारात मोठी झेप : मालगोंडा हॉस्पिटलमध्ये पोटाच्या कॅन्सरवर यशस्वी उपचार

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि.७ मार्च-**





ग्रामीण भागातील रुग्णांना उच्च दर्जाची वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याच्या दिशेने अक्कलकोटमधील मालगोंडा हॉस्पिटलने एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. येथे पोटाच्या कॅन्सरने ग्रस्त असलेल्या दोन रुग्णांवर अत्यंत जटिल आणि बहुपदरी उपचार यशस्वीरीत्या करण्यात आले.

या उपचार प्रक्रियेत सुरुवातीला कॅन्सर केमोथेरपी तज्ज्ञ डॉ. सुमा डी यांच्या मार्गदर्शनाखाली फलाट केमोथेरपीचे चार सायकल देण्यात आले. केमोथेरपीद्वारे कॅन्सरचे नियंत्रण मिळवल्यानंतर पुढील टप्प्यात शस्त्रक्रिया करण्यात आली. यानंतर कॅन्सर सर्जन तज्ज्ञ डॉ. प्रथमेश मालगोंडा यांनी अत्यंत जटिल अशी टोटल गॅस्ट्रेक्टॉमी विथ डी २ लिम्फ नोड डिसेक्शन व इसोफॅगो-जेजुनोस्टोमी ही मोठी शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडली. ही शस्त्रक्रिया अनेक तास चालणारी असून त्यामध्ये अनेक महत्त्वाचे आणि अत्यंत कौशल्यपूर्ण टप्पे असतात.

शस्त्रक्रियेनंतर दोन्ही रुग्णांची प्रकृती उत्तम राहिली आणि कोणतीही गुंतागुंत न होता त्यांना यशस्वीरीत्या रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. हा संपूर्ण उपचार मालगोंडा हॉस्पिटलच्या वैद्यकीय टीमच्या एकत्रित प्रयत्नांमुळे शक्य झाला. कॅन्सर सर्जन डॉ. प्रथमेश मालगोंडा, कॅन्सर केमोथेरपी तज्ज्ञ डॉ. सुमा डी तसेच हॉस्पिटलमधील सर्व वैद्यकीय कर्मचारी आणि सहाय्यक स्टाफ यांच्या समन्वयामुळे ही जटिल उपचार प्रक्रिया यशस्वी झाली. अक्कलकोटसारख्या ग्रामीण भागात पोटाच्या कॅन्सरसारख्या गंभीर आजारावर केमोथेरपीपासून ते अत्यंत मोठ्या शस्त्रक्रियेपर्यंत संपूर्ण उपचार यशस्वीपणे उपलब्ध होणे हे वैद्यकीय क्षेत्रातील मोठे यश मानले जात आहे.

## मंगळवेढा पोलिस ठाण्यात 'सीसीटीएनएस'चा तांत्रिक बिघाड

**तब्बल १८ तास गुन्हे नोंदविण्याचे काम रेंगाळले**

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि. ८ मार्च**

मंगळवेढा पोलीस ठाण्यातील ऑनलाईन सी.सी. टी.एन.एस. बंद पडल्याने तब्बल १८ तास तक्रारदारांचे गुन्हे नोंदी घेण्याचे काम थांबल्याने अल्पवयीन मुलींनाही तक्रारीसाठी तासंतास तिष्ठत बसावे लागल्याचा प्रकार घडला आहे. शुक्रवारी १२ च्या दरम्यान नवीन यंत्रणा जोडल्यानंतर तक्रारदारांचे गुन्हे नोदवण्याचा कामास प्रारंभ झाल्याने उपस्थित तक्रारदारांनी सुटकेचा निश्वास सोडला.

मंगळवेढा पोलीस ठाण्यातील ऑनलाईन सी.सी. टी.एन.एस.वर घेण्यात येणार्या नागरिकांच्या फिर्यादी नोंदविल्या जातात. या संगणकाचा सॉफ्टवेअर उडाल्याचा प्रकार घडला होता. गुरुवार दि.५ रोजी सकाळी संगणकावरील यांत्रीक घोटाळ्यामुळे गुरुवारी दिवसभर नागरिकांच्या फिर्यादी नोंदवता आल्या नाहीत. दरम्यान या दिवशी दोन अल्पवयीन मुलींच्या तक्रारी असल्याने या मुलीलाही सकाळपासून रात्री उशीरापर्यंत तिष्ठत बसावे लागले. शुक्रवारी पुन्हा अल्पवयीन मुलगी सकाळी आल्यानंतर हे ऑनलाईन सी.सी.टी.एन.एस चालू झाले नाही. परिणामी १२ वाजेपर्यंत अल्पवयीन मुलींना व तक्रार घेवून आलेल्या महिलांना, पुरुषांना ताटकळत बसावे लागले होते. या घटनेनंतर सदर तक्रारादारांनी याबाबत तक्रार केली होती. सोलापूरहून यामधील एक तज्ञ व्यकती बोलावण्यात आली,मात्र त्या व्यक्तीला यामधील फॉल्ट न निघाल्यामुळे पुण्याहून तज्ञव्यक्त दुरुस्तीसाठी शुक्रवारी सकाळी ११ पर्यंत येणार असल्याचे सांगण्यात आले. ती व्यक्ती न आल्याने अखेर नवीन संगणक बसवून तक्रार नोंदवण्यास प्रारंभ केल्याने गेली १८ तास तक्रार नोंदवण्यास थांबलेले काम पुन्हा सुरु झाले. मंगळवेढा पोलीस प्रशासनाच्या इतिहासात सी.सी.टी.एन.एस.प्रणाली सुरु झाल्यापासून प्रथमच असा घोटाळा झाला असल्याचे सांगण्यात आले. गेली १८ तास पेंडींग गुन्ह्याचा ढिगारा पाहून शुक्रवारी चार्ज घेण्यास एका ठाणे अंमलदाराने सुरुवातीला साफ नकारही दिला.




मात्र अखेर नाविलाजाने त्या ठाणे अंमलदारास चार्ज घेणे भाग पडले. दरम्यान ठाणे अंमलदार ड्युटी असतानाही व्हॉलीबॉल खेळण्यात मग्न असतात त्यामुळे तक्रार घेवून येणार्या नागरिकांना ठाणे अंमलदाराची खुर्ची रिकामी दिसल्याने तक्रार नेमकी कोणाकडे द्यायची याबाबत संधीग्ता निर्माण होत आहे. मारापूर येथील क्रॉस तक्रारी आल्यामुळे त्यांनाही बराच वेळ तिष्ठत बसावे लागले. वरिष्ठ पोलीस अधिकार्यांनी ठाणे अंमलदारची ड्यूटी सोडून व्हॉलीबॉल खेळणार्या कर्मचार्याची चौकशी करुन यापुढे कारवाई करावी अशी मागणीही यावेळी तक्रार घेवून आलेल्या नागरिकांनी करत हा खेळाचा तास आहे का? असा संतापजनक सवालही उपस्थित केला.

## महिलादिनानिमित्त....

### महिलांमध्ये सामर्थ्यांची भूमिका



महिला सक्षमीकरण ही संकल्पना नवीन नाही. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासूनच महिलांना सन्मान आणि सामर्थ्याची भूमिका मिळाली आहे. आजची महिला घर आणि बाहेरील जबाबदाऱ्या समतोलपणे सांभाळत समाजात आपले वेगळे स्थान निर्माण करत आहे. कुटुंबाची जबाबदारी, नोकरी किंवा व्यवसाय आणि समाजातील कर्तव्ये या सर्व गोष्टी ती सक्षमपणे पार पाडते. स्त्रीच्या स्वभावात निसर्गतः संवेदनशीलता, जपणूक आणि माणुसकीचा ओलावा असतो. नातेसंबंध टिकवून ठेवण्याची आणि समाजात सकारात्मक वातावरण निर्माण करण्याची ताकद तिच्यामध्ये असते. म्हणूनच स्त्री ही केवळ कुटुंबाची आधारस्तंभ नसून समाजाच्या प्रगतीचीही महत्त्वाची शक्ती आहे.

**- डॉ. प्रभा कासलीवाल,**
**प्राजेक्ट डायरेक्टर, एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठ.**

### रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा



स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवून घरच्या परिस्थितीवर मात करत मामा, पती व आई-वडिलांच्या मदतीने ध्येयावर लक्ष केंद्रित करत जस्मिनबी मुल्ला यांनी आपले एम.फार्मसी शिक्षण पूर्ण केले. मामा हुसेन मुलाणी गुरुजी यांनी त्यांना शिक्षणासाठी पाठिंबा दिला. लग्नानंतर पती इम्रानखान मुल्ला यांनी पुढील शिक्षणासाठी त्यांना सहकार्य केले. अकलूज येथील फार्मसी कॉलेजवर नऊ वर्ष प्राध्यापिका म्हणून काम केल्यानंतर शासकीय सेवेत औषधनिर्माण अधिकारी म्हणून त्या रुजू झाल्या. सध्या त्या ग्रामीण रुग्णालय, सांगोला येथे औषधनिर्माण अधिकारी म्हणून एकनिष्ठेने रुग्णांना सेवा देण्याचे कार्य सांभाळत आहेत.

**- जस्मिनबी मुल्ला,**
**औषधनिर्माण अधिकारी, ग्रामीण रुग्णालय, सांगोला**

### प्रत्येक महिलेने एक तरी झाड लावावे



शितल सोमनाथ गव्हाणे बार्शी नगरपरिषद बार्शी आरोग्य विभागामध्ये कार्यरत आहे. आजच्या धावळपळीच्या आणि मोबाईलच्या युगामध्ये आपण निसर्ग निरिक्षण तसेच वाचन संस्कृतीपासून दुरावत चाललो आहोत. झाडे लावा झाडे जगवा' या घोषवाक्यास अनुसरून झाडांचे महत्व लक्षात होऊन घरातील प्रत्येक सदस्याच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आणि महिला दिनानिमित्त एक झाड लावले अन् त्याचे संगोपन केले तर हा विचार माझ्या मनात आला आणि प्रत्येक सदस्याच्या वाढदिवसाच्या दिवशी एक झाड लावणे सुरु केले आहे. अगोदर स्वतः कृती करून हा उपक्रम सुरु करण्याविषयी इतरांनाही प्रेरित केले आहे.

**- शितल गव्हाणे, बार्शी**

### म्युझिक थेरिपीतून मानसिक आरोग्य सुधारते



योगा हे जगण्याचे शास्त्र आहे. शरीर आणि मनया दोन्ही अंगांचा विचार या शास्त्रात केला जातो. मेडिटेशन म्हणजे ध्यान. कोणतीही गोष्ट लक्षपूर्वक करणं किंवा एखाद्या गोष्टीवर लक्ष केंद्रित करणे म्हणजे ध्यान. डॉ. तनुजा चिकणे हे गेली पाच वर्ष योगा मेडिटेशन म्युझिक थेरिपीच्या माध्यमातून लोकांचं शारीरिक आणि मानसिक आरोग्य चांगलं राहावं म्हणून प्रयत्नशील आहेत. स्वतःचा वैद्यकीय व्यवसाय सांभाळत अनेक शाळा, हॉस्पिटल, गाव खेडे येथे तणावमुक्त जीवन जगण्यासाठी म्युझिक थेरिपी याचे प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण दिलेल आहे.

**- डॉ. तनुजा चिकणे, बार्शी**

### स्वावलंबनाचा धागा विणणाऱ्या शिल्पकार



लग्नानंतर अवघ्या १५ दिवसांत प्रशिक्षणाची जिद्द उराशी बाळगून सुरू केलेला प्रवास आज एक वटवृक्ष बनला आहे. गेल्या ३० वर्षांपासून शिवणकलेच्या माध्यमातून त्यांनी केवळ कापड सांधले नाही, तर तब्बल ५ हजार महिलांचे आयुष्य साधण्याचे काम केले आहे. आपल्या कौशल्याच्या जोरावर स्वतः चा व्यवसाय यशस्वीपणे उभा केलाच, पण एकटीने पुढे जाण्यापेक्षा सर्वांना सोबत घेऊन जाणे हा मंत्र त्यांनी जपला. आज त्यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेल्या हजारो महिला स्वतःच्या पायावर उभ्या असून सक्षमपणे आपला संसार सांभाळत आहेत. त्यांनी दिलेले प्रशिक्षण हे केवळ रोजगाराचे साधन नसून महिलांना मिळालेली स्वाभिमानाची शिदोरी आहे.

**- विजयालक्ष्मी धरणे, वागदरी**

### स्त्री कुटुंबाचा आधारस्तंभ



आई ही कुटुंबाचा आधारस्तंभ असते. मुलांच्या उज्वल भविष्यासाठी ती दिवस-रात्र मेहनत करते. स्वतःच्या थकव्याची पर्वा न करता ती त्यांच्या शिक्षणासाठी, संस्कारांसाठी आणि स्वप्नांसाठी झटत राहते. विद्या बाबर या गेली वीस वर्षे कांबळे कलेक्शन, सांगोला येथे काम करत आहेत. त्यांच्या त्यागामुळे आणि कष्टामुळेच त्यांची दोन्ही मुले यशाच्या शिखरावर पोहोचली आहेत. त्यांची दोन्ही मुले इंजिनिअर असून एक मुलगा सहकार आयुक्तालय, पुणे येथे कार्यरत आहे तर दुसरा मुलगा स्पर्धा परीक्षेची तयारी करत आहे. त्यांनी घेतलेली मेहनत आणि मुलांना दिलेली साथ हेच त्यांच्या यशाचे खरे गुपित आहे.

**- विद्या बाबर, सांगोला.**

# ४५ गर्भवती महिलांचे सामुहिक डोहाळ जेवण

## टेंभुर्णी ग्रामपंचायतीचा स्तुत्य उपक्रम



**तभा वृत्तसेवा । अनिल जगताप**
**टेंभुर्णी, दि. ८ मार्च-**

ग्रामपंचायत टेंभुर्णी व एकात्मिक बालविकास सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या अनुषंगाने टेंभुर्णी येथे सुमारे ४५ गर्भवती महिलांचे भव्य डोहाळे जेवण कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमात उपस्थित गर्भवती म हिलांचा सन्मान करण्यात आला. त्यांना फळे, साडी-चोळी देऊन त्यांचे औक्षण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रकल्प अधिकारी बालाजी अल्लडवार यांनी गर्भवती महिलांना संतुलित आहार, चांगले संस्कार आणि आरोग्याची विशेष काळजी घेण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमादरम्यान अंगणवाडी सेविका, आशा सेविका तसेच टेंभुर्णी पंचक्रोशीतील महिला व समाजसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. हा कार्यक्रम टेंभुर्णीच्या कर्तव्यदक्ष विद्यमान सरपंच मा. सुरजा बोबडे मॅडम, उपसरपंच राजश्री नेवसे तसेच ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामपंचायत अधिकारी साळुंखे भाऊसाहेब यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडला. या उपक्रमा मुळे गर्भवती महिलांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली असून उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

## महिला आरोग्य तपासणी ही काळाची गरज : शोभा मोरे



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ मार्च-**

आजच्या काळात महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होत असल्या तरी त्यांचे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ असणे तितकेच आवश्यक आहे. महिलांनी स्वतः च्या आरोग्याकडे वेळेवर लक्ष देणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन मनोरमा मल्टिस्टेटच्या चेअरमन शोभा मोरे यांनी केले.

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून मनोरमा परिवाराच्या वतीने आयोजित केलेल्या महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिरात बोलताना त्या पुढे म्हणाल्या, 'म नोरमा'चे आधारस्तंभ श्रीकांत मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली मनोरमा परिवार, मनोरमा हॉस्पिटल आणि प्राइड हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला.

डॉ.मिताली मोरे, डॉ.सुमित मोरे यांनी रुग्णांची तपासणी केली. एकूण १४० महिलांनी या शिबीराचा लाभ घेतला. याप्रसंगी मनोरमा बँकेच्या कार्याध्यक्षा अस्मि ता गायकवाड, सीईओ शिल्पा कुलकर्णी, मनोरमा मल्टीस्टेटच्या सीईओ कविता कुलकर्णी, डेप्युटी सीईओ अरुंधती नायडू, एचआर विद्या भोसले उपस्थित होते.

## विवाहितेचा छळ; चौघांविरोधात गुन्हा

**सोलापूर, दि. ८ मार्च-**

सासरी चौघांनी मिळून विवाहितेला माहेरून २० लाख रुपये घेऊन तुला तलाक देतो, जीवे मारतो अशी दमदाटी करत शिवीगाळ करून मारहाण करून तिच्या चारित्र्यावर संशय घेतला. तिला उपाशी ठेवून शारीरिक व मानसिक, आर्थिक त्रास देऊन छळ केल्याप्रकरणी चौघांनी विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. २०२३ ते १५ डिसेंबर २०२५ दरम्यान सानिया अन्वर पिरजादे (वय २२, रा. ४९, सिद्धेश्वर नगर ५) यांच्या सासरी अन्वर पती, अल्ताफ दीर, ताहेर पतीचे आजोबा, फर्जना सावत्र सासू (सर्व रा. श्रीशैल मल्लिकार्जुन नगर होटगी रोड) यांनी सानिया यांना नवीन गॅरेज साठी म ाहेरून २० लाख रुपये घेऊन तुला तलाक देतो, जीवे मारतो अशी दमदाटी केली, असे एमआयडीसी पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

## सोलापुरात हंगामातील उच्चांकी ४०.२ अंश सेल्सिअस तापमान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ८ मार्च-**

राज्यात उन्हाळ्याची चाहूल लागताच सूर्याने आग ओकायला सुरुवात केली आहे. आज सोलापूर जिल्ह्यात या हंगामातील सर्वात जास्त तापमानाची नोंद झाली. पारा ४०.२ अंश सेल्सिअस वर पोहोचला आहे. यामुळे नागरिक उन्हाच्या झळांनी अक्षरशः होरपळून निघाले आहेत.

हवामान अहवालानुसार कमाल तापमान: ४०.२ अंश सेल्सिअस तर किमान किमान तापमान: २०.६ अंश सेल्सिअस इतके होते. तर हवेतील आर्द्रता केवळ २४ टक्के इतकी कमी झाल्यामुळे हवेत कोरडेपणा वाढला आहे. यामुळे दुपारी १२ ते ४ या वेळेत अंगाची लाहीलाही होत असून, रस्ते ओस पडू लागले आहेत.

वाढत्या उष्णतेमुळे उष्म ाघाताचा धोका देखील वाढला आहे. यामुळे वाढत्या तापम ानाचा विचार करता आरोग्य विभागाने नागरिकांना काही



महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. यामध्ये भरपूर पाणी प्या. लिंबू सरबत, ताक आणि नैसर्गिक पेयांचा वापर करावा. तर दुपारी १२ ते संध्याकाळी ४ या काळात शक्यतो घराबाहेर पडणे टाळावे.

## महिलांसाठी योजनांचा वर्षाव

# 'लाडकी बहीण'पासून ते उच्च शिक्षणापर्यंत नारी होतेय स्वावलंबी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ मार्च-**

राज्य सरकारकडून महिलांच्या सक्षम ीकरणासाठी विविध योजना राबविल्या जात असून त्यांचा मोठा फायदा मुली व महिलांना होत आहे. लेक लाडकी योजना, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुलींसाठी मोफत उच्च शिक्षण तसेच एसटी बस प्रवासात सवलत यांसारख्या योजनांमुळे महिलांचे आर्थिक व सामाजिक सक्षम ीकरण होत आहे.

'उमेद' अभियानांतर्गत महिला बचतगटांना अल्पदराने कर्ज, फिरता निधी आणि उत्पादनांच्या विक्रीसाठी 'अस्मिता' बाजारपेठ उपलब्ध करून दिली जाते. राज्यात सध्या सुमारे एक कोटी महिलांचे १० लाख बचतगट कार्यरत असून त्यात सोलापूर जिल्ह्यातील २४ हजार बचतगटांचा समावेश आहे.

सोलापूर जिल्हा परिषदेचे महिला व बालविकास अधिकारी प्रसाद मिरकले म्हणाले की, लेक लाडकी आणि लाडकी बहीण योजनेसह इतर योजनांमुळे महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाला मोठा हातभार लागत आहे. सोलापूर जिल्ह्यात लेक लाडकी योजनेचे सुमारे दहा हजारांहून अधिक लाभार्थी आहेत.



✻ मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना : कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २.५ लाख रुपयांपेक्षा कमी असलेल्या महिलांसाठी ही योजना आहे. महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी दरमहा १,५०० रुपये थेट बँक खात्यात जमा केले जातात.

✻ लेक लाडकी योजना : पिवळ्या व केशरी रेशनकार्डधारक कुटुंबातील मुलींसाठी ही योजना आहे. मुलीच्या जन्मापासून ते १८ वर्षांपर्यंत टप्प्याटप्प्याने आर्थिक मदत दिली जाते. जन्मानंतर ५,००० रुपये, इयत्ता पहिली ६,००० रुपये, इयत्ता सहावी ७,००० रुपये, इयत्ता अकरावी ८,००० रुपये, वय १८ पूर्ण झाल्यावर ७५,००० रुपये, एकूण १.०१ लाख रुपयांपर्यंत लाभ दिला जातो.

✻ मुलींसाठी मोफत उच्च शिक्षण : कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपर्यंत असलेल्या मुलींना वैद्यकीय, अभियांत्रिकीसह ८०० हून अधिक व्यावसायिक अभ्यासक्रम ांसाठी १०० टक्के मोफत शिक्षण दिले जाते.

✻ एसटी बस प्रवासात सवलत : महिला सन्मान योजनेअंतर्गत राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व बसमध्ये तिकीट दरात ५० टक्के सवलत दिली जाते.

✻ सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना : शाळा सोडण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी पाचवी ते दहावीतील मुलींना शिष्यवृत्ती दिली जाते. पाचवी ते सातवी दरमहा ६० रुपये, आठवी ते दहावी दरमहा १०० रुपये.

नमो शेतकरी महासन्मान निधी : ज्या महिलांच्या नावावर शेती आहे, त्यांना केंद्र व राज्य सरकारकडून दरवर्षी १२,००० रुपये सन्मान निधी दिला जातो. यासोबतच लाडकी बहीण योजनेचा लाभही मिळतो.



गोविंद सहकारी सोसायटी येथील महिलांची रंगपंचमी



बाल सुधारगृहात मुलींनी उत्साहात रंगपंचमी साजरी केली



महेश नगर परिसरात बालगोपालाची रंगपंचमी.



ज्ञानेश्वर सोसायटीतील नागरिकांनी कोरडे रंग खेळून रंगपंचमीचा आनंद लुटला.



मजरेवाडी येथील राघवेंद्रनगर मधील मुली रंगपंचमी खेळताना.



आयकर कॉलनीत रंगपंचमी साजरी करण्यात आली.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लोहाऱ्यात घरफोडी; १.४२ लाखांचा मुद्देमाल चोरी

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.८ मार्च -**

तालुक्यातील धानुरी येथे अज्ञात चोरट्याने घरात शिरून रोख रक्कम व मोबाईल असा १ लाख ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी लोहारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आनंदराव शाहुराज सुर्यवंशी (वय ५७, रा. धानुरी, ता. लोहारा, जि. धाराशिव) यांच्या घराच्या गच्चीवरील दरवाजातून अज्ञात व्यक्तीने दि. ५ मार्च २०२६ रोजी पहाटे सुमारे २.४५ वाजण्याच्या सुमारास घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील कपाटातून रोख रक्कम १,३५,००० रुपये व पोको कंपनीचा मोबाईल असा एकूण १,४२,००० रुपयांचा ऐवज चोरून नेला.



या प्रकरणी आनंदराव सुर्यवंशी यांनी दि. ६ मार्च २०२६ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून लोहारा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



## संक्षिप्त वृत्त...




### महिला दिनानिमित्त उमरग्यात कर्तृत्ववान महिलांचा गौरव

**उमरगा, दि.८ मार्च -**

येथील आयएसओ मानांकित व टोबॅको फ्री जिल्हा परिषद हायस्कूल, उमरगा येथे ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शकुंतला मोरे होत्या, तर सुजाता मोरे प्रमुख उपस्थितीत होत्या. यावेळी मुख्याध्यापक पद्माकर मोरे उपस्थित होते. कार्यक्रमात जि.प.प्रा. शाळा बालाजी नगरच्या मुख्याध्यापिका वंदना बिराजदार, सहशिक्षिका वैशाली चिट्टे, गंगुबाई लोखंडे, सोनाली मुसळे, भाग्यश्री पंडित, वर्षाराणी पाटील, तसेच सुमन साठे, कविता केदारे व सखुबाई चव्हाण या कर्तृत्ववान महिलांचा सत्कार करण्यात आला. हा सत्कार शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शकुंतला मोरे व सुजाता मोरे यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी धनराज तेलंग व संजय रूपाजी यांनी प्रयत्न केले.



### एकलव्य विद्या संकुलात महिलांचा गौरव

**तुळजापूर, दि.८ मार्च -**

एकलव्य विद्या संकुल यमगरवाडी येथे जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने शाळेतील विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिलांचा सन्मान करण्यात आला.महिलांनी शिक्षण क्षेत्रात दिलेल्या योगदानाबद्दल उपस्थितांनी त्यांचे कौतुक केले. याप्रसंगी सरस्वती जाधव, लता जाधव, सुनिता राठोड, लक्ष्मी पवार, विमल निंबाळकर, शशिकला भोजने, जयश्री, प्रणिता शेटकार, निर्मला हुग्गे, संगीता पाचंगे आणि सुमन सोमानी यांचा कार्यकर्ते गोविंद सोमानी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन अनिल घुगे यांनी केले. या कार्यक्रमास गोविंद सोमानी, विठ्ठल म्हेत्रे, अण्णासाहेब कोल्हटकर तसेच शाळेतील सर्व शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



### परंडा येथे वेडे महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त रथोत्सव

**परंडा, दि.८ मार्च -**

परंडा शहरात सदगुरू यज्ञेश्वर शिवाचार्य (वेडे महाराज) यांच्या २२६ व्या पुण्यतिथीनिमित्त भव्य दिव्य रथोत्सव शोभायात्रा उत्साहात काढण्यात आली. या धार्मिक सोहळ्यात परंडा शहरासह पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. परंपरेनुसार भोत्रा रोड येथील वेडे महाराज मठात बुधवारपासून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शनिवारी (दि.७) पुण्यतिथीनिमित्त सकाळी सिधलिंग राजदेशीकेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या मार्गदर्शनाखाली रथोत्सव वाजतगाजत काढण्यात आला. यानंतर वेडे महाराज मठ येथे धर्मसभेचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्यास वेदांताचार्य मुक्तेश्वर शिवाचार्य महाराज (वेळापूर), सिद्धलिंग राजगुरू शिवाचार्य महाराज (शिंगणापूर), डॉ. निळकंठ शिवाचार्य महाराज (धारेश्वर), शिवानंद शिवाचार्य महाराज (वाळवा), वेदांताचार्य महाराज (वसमत), प्रभुदेवा शिवाचार्य महाराज (माढा), विरूपाक्ष शिवाचार्य महाराज (मानूर) आदी मान्यवर उपस्थित होते.



### लोटस पोदार लर्नमध्ये महिला दिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम

**उमरगा, दि.८ मार्च -**

जागतिक महिला दिनानिमित्त लोटस पोदार लर्न स्कूल, उमरगा येथे महिला पालकांसाठी विविध खेळ व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात संस्थेच्या विश्वस्त संजीवनी अरगडे व सुषमा कोकरे तसेच परीक्षक डॉ. अमृता इनामदार, कविता माने आणि प्रणिता पाटील यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. कार्यक्रमात महिलांसाठी संगीत खुर्ची, रिंग-बॅलून, बुक बॅलन्स, उखाणे आणि रॅम्प वॉक अशा विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. महिला पालकांनी उत्साहाने सहभाग नोंदवत कार्यक्रमाची रंगत वाढवली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मंजिरी सूर्यवंशी, संगीता अरिकर आणि रोहिणी डांगे यांनी समन्वयक म्हणून पुढाकार घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांनी केले.

## पर्यटन विद्यापीठामुळे शहराला नवी ओळख : आ. राणाजगजितसिंह पाटील

### नळदुर्गमध्ये ६ कोटींच्या ४१ विकासकामांचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.८ मार्च -**

नळदुर्ग येथे उभारण्यात येणाऱ्या पर्यटन विद्यापीठामुळे स्थानिकांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळणार असून शहराच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. त्यामुळे नळदुर्ग पर्यटन क्षेत्रात नावारूपास येईल, असे मत आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केले.



नळदुर्ग नगरपालिकेच्या वतीने अंबाबाई मंदिर परिसरात नगरपालिकेच्या विविध विकासकामांच्या भूमिपूजनाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी सुमारे ६ कोटी रुपये खर्चाच्या ४१ विकासकामांचा शुभारंभ आमदार पाटील यांच्या हस्ते झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष बसवराज धरणे होते. यावेळी युवा नेते सुनिल चव्हाण, प्रदेश कार्यकारिणी सदस्य नितीन काळे, उपनगराध्यक्ष नय्यर जहागीरदार, नगरसेवक दत्तात्रय दासकार, बांधकाम सभापती शशिकांत पुदाले यांच्यासह अनेक नगरसेवक उपस्थित होते.

आ. पाटील म्हणाले की, शहरात होणारी सर्व विकासकामे दर्जेदार असावीत. निकृष्ट काम झाल्यास त्याचे पैसे मिळणार नाहीत. विकासकामांवर नगरसेवकांसह नागरिकांनीही लक्ष ठेवावे. नळदुर्गच्या ऐतिहासिक किल्ल्यामुळे पर्यटन विकासाची मोठी संधी असून किल्ला परिसरात टुरिझम विद्यापीठ उभारण्याची संकल्पना राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी अंबाबाई देवस्थान ट्रस्टतर्फे आमदार पाटील व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

## धाराशिवात महिला गळ्यातील सोन्याचे गंठण हिसकावले

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ मार्च -**

शहरातील भीमनगर परिसरात एका महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठण हिसकावून नेल्याची घटना घडली असून याप्रकरणी आनंदनगर पोलीस ठाण्यात दोन अज्ञात इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी अलका हर्ष बनसोडे (वय ४८, रा. भीमनगर, धाराशिव) या दि.६ मार्च रोजी रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास धाराशिव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ फिरत होत्या. यावेळी पाठीमागून मोटरसायकलवर आलेल्या दोन अनोळखी इसमांनी त्यांच्या गळ्यातील सुमारे १५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनी गंठण (किंमत अंदाजे ७० हजार रुपये) हिसकावून घेतले व घटनास्थळावरून पळ काढला.



या घटनेबाबत अलका बनसोडे यांनी दि.७ मार्च रोजी दिलेल्या फिर्यादीवरून आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याबाबत अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## श्री तुळजाभवानी मंदिरात रंगपंचमी साजरी; देवीला सप्तरंगांची उधळण

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.८ मार्च -**

श्री तुळजाभवानी मंदिरात रंगपंचमीचा उत्सव आज अत्यंत भक्तिमय वातावरणात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. दरवर्षीप्रमाणे यंदाही मंदिरात देवीची विशेष पूजा, अभिषेक आणि रंगउधळण करून रंगपंचमी साजरी करण्यात आली.



सकाळी लवकर देवीचा विधीवत अभिषेक व पूजा करण्यात आली. त्यानंतर देवीला पांढराशुभ्र शालू नेसविण्यात आला. या पांढऱ्या शालूवर सप्तरंगांची उधळण करून रंगपंचमीचा मुख्य सोहळा पार पडला. मंदिरातील महंत आणि पुजाऱ्यांनी पारंपरिक पद्धतीने देवीला रंग अर्पण करून उत्सवाची सुरुवात केली.

रंगपंचमीच्या दिवशी देवीला रंग अर्पण करण्याची जुनी परंपरा आहे. या दिवशी देवीला विविध रंग अर्पण करून भक्त तिच्या चरणी प्रार्थना करतात. देवीला रंग अर्पण केल्यानंतर मंदिरातील पुजारी, सेवेकरी आणि भाविक एकमेकांना रंग लावून आनंद व्यक्त करतात. या उत्सवात प्रामुख्याने नैसर्गिक रंगांचा वापर करण्यात येतो. या उत्सवानिमित्त मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. अनेक भाविकांनी देवीचे दर्शन घेऊन रंगपंचमीचा आनंद लुटला. मंदिर प्रशासनाने भाविकांच्या सोयीसाठी आवश्यक व्यवस्था केली होती.

यावेळी महंत वाकोजी बुवा, महंत हमरोजी बुवा, सहायक व्यवस्थापक, पुजारी बांधव तसेच मंदिर संस्थानचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. रंगपंचमीच्या या पारंपरिक उत्सवामुळे मंदिर परिसरात भक्तिमय आणि उत्साही वातावरण निर्माण झाले होते. अनेक भाविकांनी देवीच्या चरणी रंग अर्पण करून सुख-समृद्धीची प्रार्थना केली.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार; पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल

### कळंब तालुक्यातील शिराढोण येथील घटना...

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.८ मार्च -**

शिराढोण पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची गंभीर घटना समोर आली असून या प्रकरणी संबंधित तरुणाविरुद्ध पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका गावातील १७ वर्षीय मुलगी (नाव व गाव गोपनीय) हिला दि. ११ नोव्हेंबर २०२४ रोजी रात्री १० वाजल्यापासून ते २२ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १० वाजेपर्यंत एका गावातील तरुणाने लॉजवर नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. तसेच तिला शिवीगाळ करून मारहाण केली व पीडितेच्या आई-वडिलांना जिवे ठार मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी पीडित मुलीने दि.६ मार्च रोजी दिलेल्या फिर्यादीवरून शिराढोण पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## निवडीनंतर दुसऱ्याच दिवशी कामाला सुरुवात

### सभापती आकांक्षा चौगुले यांची उपोषणस्थळी भेट...

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.८ मार्च -**

उमरगा पंचायत समितीच्या नवनिर्वाचित सभापती ॲड. आकांक्षा चौगुले यांनी निवडीनंतर दुसऱ्याच दिवशी आपल्या कामकाजाला सुरुवात करत काळेवाडी येथे सुरू असलेल्या आमरण उपोषणाची दखल घेत उपोषणस्थळी भेट दिली.



भगतवाडी, कोळेवाडी व चिरेवाडी या ग्रुप ग्रामपंचायतीअंतर्गत विविध विषयांवरून ग्रामस्थांनी प्रशासनाकडे वारंवार तक्रारी केल्या होत्या. या मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी बलभीम इरले व बालाजी करणुरे हे ग्रामस्थ मागील दहा दिवसांपासून ग्रामपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसले होते. शनिवार (दि.७) रोजी सभापती ॲड. आकांक्षा चौगुले यांनी काळेवाडी येथे उपोषणस्थळी भेट देऊन ग्रामस्थांच्या मागण्या जाणून घेतल्या. तसेच संबंधित मागण्यांची चौकशी करून आठवड्याच्या आत अहवाल सादर करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या. यावेळी त्यांनी उपअभियंता दिलीप बिराजदार यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून या विषयावर चर्चा केली.

सभापती यांच्या आश्वासनानंतर उपोषणकर्त्यांनी नारळ पाणी घेऊन आपले उपोषण स्थगित केले. यावेळी पंचायत समितीचे विस्तार अधिकारी भांगे, अत्तार, नगरसेवक पंढरीनाथ कोणे तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

## मसला खुर्द येथे निकृष्ट प्लेवरब्लॉक कामाचा आरोप

### चौकशी न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.८ मार्च -**

तुळजापूर तालुक्यातील मसला खुर्द येथे दलित वस्ती निधी योजनेतून करण्यात आलेले प्लेवरब्लॉकचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या कामाची तात्काळ चौकशी करून संबंधित कंत्राटदारावर कारवाई करावी, अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

याबाबत ग्रामस्थांनी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना निवेदन दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की, अनुसूचित जाती व नवबौद्ध घटक विकास योजनेंतर्गत मसला खुर्द येथे करण्यात आलेले प्लेवरब्लॉकचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाले असून परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.



या कामाबाबत १२ मार्च २०२५ रोजी जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद कार्यकारी अभियंता, तुळजापूर बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता तसेच ग्रामपंचायत कार्यालयाला लेखी तक्रार देण्यात आली होती. मात्र ११ महिने उलटूनही कोणतीही चौकशी करण्यात आली नाही.

उलट कामाची पाहणी न करता सरपंच, ग्रामसेवक व संबंधित अभियंता यांच्या सहमतीने कामाचे बिल अदा करण्यात आल्याचा आरोपही ग्रामस्थांनी केला आहे. संबंधित कंत्राटदाराचे लायसन्स रद्द करून कायदेशीर कारवाई करावी व पुढील कामे देऊ नयेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावर हनुमान शिंदे, आकाश वडवराव, राजेंद्र वडवराव, सुनील शिंदे, विकास शेंडगे, अंकुश शिंदे, नागनाथ शिंदे, यशवंत डोलारे, धनाजी डोलारे, राजेंद्र शेंडगे, धनाजी येडाळे यांच्यासह अनेक ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## धाराशिव शहरात स्वस्त सोन्याच्या आमिषाने ३.५० लाखांची फसवणूक

### शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ मार्च -**

स्वस्त दरात सोन्याची माळ देण्याचे आमिष दाखवून एका तरुणीची ३ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक केल्याची घटना शहरात उघडकीस आली आहे. याप्रकरणी दोन अज्ञात इसमांविरुद्ध धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, स्नेहल दत्ता नन्नवरे (वय २२, रा. कुरणे नगर, धाराशिव, मूळ रा. भातंब्रे ता. बार्शी, जि. सोलापूर) या दि.१० डिसेंबर २०२५ रोजी धाराशिव येथील छत्रपती संभाजी महाराज चौकातील रिटेल-होलसेल दुकानाजवळ होत्या.

यावेळी दोन अनोळखी इसमांनी त्यांचा विश्वास संपादन करून कमी किंमतीत सोन्याची माळ विकण्याचे आमिष दाखवले. फिर्यादी यांनी ती माळ खरेदी केल्यानंतर ती सोन्याची नसून पितळ सदृश्य धातूची असल्याचे त्यांच्या लक्षात आले. अशा प्रकारे आरोपींनी फिर्यादींची ३,५०,००० रुपयांची फसवणूक केली.

स्नेहल नन्नवरे यांनी दि.६ मार्च रोजी दिलेल्या फिर्यादीवरून शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## परंडा न्यायालयात शनिवारी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.८ मार्च -**

उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार परंडा न्यायालयात शनिवार, दि..१४ मार्च रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या लोक अदालतीत विविध प्रकरणे तडजोडीच्या माध्यमातून निकाली काढण्यात येणार आहेत.

या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये दिवाणी दावे, तडजोडीस पात्र फौजदारी प्रकरणे, पोटगी प्रकरणे तसेच दावा दाखलपूर्व प्रकरणे सामंजस्याने मिटविण्याची संधी नागरिकांना उपलब्ध होणार आहे. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा न्यायाधीश डॉ.एफ.ए.एम. ख्वाजा यांनी केले आहे.

## तेरखेड्यात लहानग्यांचा रंगपंचमीचा जल्लोष



**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.८ मार्च -**

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यात रंगपंचमीचा सण मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा करण्यात आला. गावोगावी नागरिकांनी एकमेकांना रंग लावून सणाचा आनंद लुटला.

तालुक्यातील तेरखेडा येथे मात्र लहान मुलांचा उत्साह विशेष पाहायला मिळाला.

रविवारची शाळेला सुट्टी असल्याने सकाळी नऊ वाजल्यापासूनच मुलांनी ग्रुप तयार करून गावातील गल्लोगल्ली फिरत रंगपंचमी साजरी केली.

बॉटल पिचकारी, रंगांनी भरलेल्या बाटल्या आणि विविध रंग हातात घेऊन मुलांनी एकमेकांवर रंगांची उधळण केली. लहान मुलांच्या या आनंदी जल्लोषामुळे संपूर्ण गावात सणाचा उत्साह पसरला होता.

## 'सावित्रीच्या कविता' संग्रहाला साहित्य पुरस्कार

**धाराशिव, दि.८ मार्च -**

एकता फाउंडेशनतर्फे दिला जाणारा सन २०२५ चा राज्यस्तरीय उत्कृष्ट संशोधन-संपादन साहित्य पुरस्कार येथील डॉ. रेखा ढगे यांनी संपादित केलेल्या 'सावित्रीच्या कविता' या साहित्यकृतीला जाहीर झाला आहे.

हा पुरस्कार कै. परमेश्वर कैतके यांच्या स्मरणार्थ दिला जातो. 'सावित्रीच्या कविता' या काव्यसंग्रहाचे संपादन डॉ. रेखा ढगे यांनी केले असून कविता रमेश पुदाले यांनी सहसंपादक म्हणून काम पाहिले आहे.

## संक्षिप्त...

### निलंग्यात अवैध दारू वाढली

**निलंगा :** निलंगा शहरातील मिलिंदनगर, अशोकनगर, वीर लहुजी साळवेनगर आदी विविध भागात सुरू असलेली बेकायदेशीर देशी दारू, हातभट्टी दारू, केमिकल मिश्रीत शिंदी बंद करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे शहराध्यक्ष धम्मानंद काळे यांनी उत्पादन शुल्क विभागाच्या निरीक्षकांकडे निवेदनाद्वारे केली आहे.या भागामध्ये वैध परवाना नसताना बेकायदेशीररित्या दारूविक्री मोठ्या प्रमाणात केली जात आहे. दारूच्या व्यसनामुळे कमी वयात मुली विधवा होण्याचे प्रमाण वाढले असून मुलांच्या डोक्यावरील वडिलांचे छत्र हरवल्यामुळे मुले वाईट मार्गास लागत आहेत. याकडे दारूबंदी अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे. सदरील ठिकाणी दिवस-रात्री तसेच बे - रात्री दारू पिण्यासाठी लहान मोठे युवक, वयस्क मंडळींची गर्दी असते. यामुळे शहरांमध्ये भांडणे, शिवीगाळ, मारहाणीचे प्रमाण वाढल्याने नागरिकांना याचा त्रास होत आहे. तेव्हा तात्काळ चौकशी करून संबंधित बेकायदेशीर अवैध दारूविक्री करणाऱ्यावर तत्काळ कायदेशीर कार्यवाही करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. उत्पादन शुल्क विभागाकडे अवैध दारुविक्रीवर प्रतिबंध करण्यासाठी देण्यात आलेल्या निवेदनावर कोणती कार्यवाही करुन संबधितांना प्रतिबंध करण्यात यावा, अशी अपेक्षा नगारिकांतून व्यक्त केली जात आहे.

### शिक्षक पतसंस्थेत शिक्षकांनी रंगविली कवितेची मैफिल

**औसा :** औसा तालुका शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त आयोजित स्वरचित काव्य स्पर्धेत शिक्षक शिक्षीकांनी धूलिवंदन दिवशी संस्थेच्या कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात कवितासादर केल्या. . साहित्यप्रेमींच्या उपस्थितीत आणि कवी- कवयित्रींच्या दर्जेदार सादरीकरणामुळे कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेचे उद्घाटन उमरगा विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रवीण स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कवी तथा वात्रटिकाकार भारत सातपुते हे होते. स्पर्धेस परीक्षक म्हणून कंधार नांदेड येथील ज्येष्ठ कवि तथा कृषि अधिकारी काळे, राज्यशासन पुरस्कार प्राप्त कवयित्री वृषाली पाटील (लातूर) यांनी जबाबदारी पार पाडली. उद्घाटनपर भाषणात आ. स्वामी यांनी साहित्यिक शिक्षकांच्या रचनांचे कौतुक केले. शिक्षकांनी अध्यापनासोबतच आपल्या लेखनावरही भर द्यावा असे आवाहनही त्यांनी केले. अध्यक्षीय भाषणात भारत सातपुते यांनी कविता म्हणजे नवी दृष्टी, नवी आशा देणारी आणि भावनेतील उद्रेक समोर ठेवणारी कविता असते असे सांगितले. शेवटी नवोदित कवी-कवयीत्रींना सातत्याने लेखन करण्याचे व साहित्यीक परंपरेचा वारसा जपण्याचे आवाहन केले. औसा शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन महादेव खिचडे यांनी प्रास्ताविक केले.या स्पर्धेत एकूण ७५ स्पर्धकांनी नोंदणी करून सहभाग घेतला. या काव्य स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी पतसंस्थेचे चेअरमन महादेव खिचडे, व्हाईस चेअरमन हरीश आयतनबोने, सचिव संजय जगताप, काव्य स्पर्धा प्रमुख महेश कांबळे, संचालक युसुफ पिरजादे, मधुकर गोरे, रमेश जाधव, दिपक डोंगरे, धीरजकुमार रुकमे, संजय रोडगे, अमोल शेळके, मंदाकिनी माने, संगीता कानडे व काव्य स्पर्धा समितीचे सदस्य यांनी परिश्रम घेतले.

### कार - दुचाकीच्या धडकेत दोघे ठार

**उदगीर :** उदगीर-लातूर रस्त्यावरील करडखेल पाटीजवळ शनिवारी रात्री साधारणतः ८ वाजण्याच्या सुमारास कार आणि दुचाकीच्या समोरासमोर झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवरील दोघे तरुण ठार झाल्याची घटना घडली आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, शनिवारी रात्री ८ वाजेच्या सुमारास करडखेल पाटी येथून दुचाकी क्र .एम एच २४ एई ८९९८ वरून गौतम ज्ञानोबा कांबळे (वय २५, रा. लोहारा ता. उदगीर) आणि सुनील नागू कांबळे (वय १९, रा. लोहारा ता. उदगीर) हे दोघे लोहारा गावाकडे जात होते. समोरून भरधाव वेगात येणारी कार (एम एच २४ बीएल ०८६७) लातूरकडे जात होती. करडखेल पाटीजवळ दुचाकी व कारचा समोरासमोर भीषण अपघात झाला. यात दुचाकीवरील दोघेही जागीच ठार झाले. या अपघातानंतर घटनास्थळावर उदगीर-लातूर मार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार व्यंकट शिरसे, अंमलदार नामदेव चेवले व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन अपघातग्रस्त वाहने बाजूला काढून वाहतूक सुरळीत केली.या अपघातात दुचाकी व कार या दोन्ही वाहनाचे मोठे नुकसान झाले आहे.

### सचिन चंद्रराव पाटील यांचे निधन



**शिरूर अनंतपाळ :** दैठणा ता. शिरूर अनंतपाळ येथील श्री. सचिन चंद्रराव पाटील यांचे शनिवार दिनांक ०७ मार्च २०२६ रोजी हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने वयाच्या ४४ व्या वर्षी दुःखद निधन झाले. त्यांच्यावर रविवार दिनांक ०८ मार्च २०२६ रोजी सकाळी ०९ :३० वाजता दैठणा येथील पारंपरिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. स्वभावाने अतिशय नम्र, मनमिळावू आणि सर्वांना आपलेसे करणारे असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या अकस्मात निधनामुळे दैठणा गावासह परिसरात तीव्र शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात आई-वडील, भाऊ-बहीण, पत्नी, एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे. ते प्रा. चंद्रराव रामराव पाटील यांचे द्वितीय चिरंजीव होत. दैठणा येथील पाटील परिवारावर आलेल्या या दुःखद प्रसंगाबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# पळसाच्या फुलांनी वन ज्योती वसंत ऋतूत निसर्गाचा रंगोत्सव

**तभा वृत्तसेवा/ शंकर मिटकर**

**शिरूर अनंतपाळ दि. ०८ मार्च :** शिरूर अनंतपाळ तालुक्यासह थेरगाव परीसरात वसंत ऋतूची चाहूल लागताच निसर्गानि जणू नवसंजीवनी घेतली असून, ग्रामीण, डोंगराळ तसेच माळरान परिसरात केशरी रंगाच्या पळसाच्या फुलांनी संपूर्ण परिसर उजळून निघाला आहे. शिशिराची थंडी ओसरू लागली की पानगळीने उघडी पडलेल्या वृक्षांनी नव्या पालवीचे लेणे अंगावर मिरवू लागते आणि वसंत ऋतूचे आगमन जाहीर होते. 'वनज्योती' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पळसाच्या झाडांवर सध्या फुलांची दाटी पाहायला मिळत आहे. पानांशिवाय फुलणारा हा वृक्ष वसंत ऋतूच्या आगमनाची स्पष्ट जाणीव करून देतो. शेतांच्या बांधावर, रस्त्यांच्या कडेला, ओसाड जमिनीत तसेच डोंगर उतारांवर बहरलेला पळस निसर्ग सौंदर्यात मोलाची भर घालत आहे. पळसाची केशरी तांबडी फुले म्हणजे जणू निसर्गानि पेटवलेले दीपच असल्याचे चित्र सर्वत्र दिसून येते.



सकाळच्या कोवळ्या उन्हात ही झाडे अधिकच खुलून दिसतात, तर संध्याकाळच्या सोनेरी प्रकाशात पळसाच्या फुलांचा रंग अधिक गडद व आकर्षक भासतो. या फुलांमुळे विविध पक्षी, मधमाश्या, भुंगे आणि फुलपाखरे परिसरात आकर्षित होत असून, जैवविविधतेला चालना मिळत आहे. निसर्गातील ही साखळी पर्यावरणीय संतुलनासाठी अत्यंत महत्त्वाची असल्याचे जाणकार सांगतात.

पूर्वी आम्ही पळसाच्या फुलांपासून नैसर्गिक रंग तयार करायचो. रानातून फुले गोळा करून ती वाळवायचो, कुटून रंग बनवला जायचा. त्या रंगांनी होळी साजरी करताना वेगळाच आनंद मिळायचा. रसायनांचा वापर नव्हता, निसर्गाशी नातं अधिक घट्ट होतं. आज पळस फुललेला पाहिला की त्या जुन्या आठवणी पुन्हा ताज्या होतात. मात्र आजच्या पिढीला या गोष्टींचं फारसं महत्त्व उरलेलं नाही. मोबाईल आणि डिजिटल जीवनात गुंतल्यामुळे निसर्गाशी असलेलं नातं हळूहळ दुरावत चाललं आहे.

**-.डॉ.शिंदे सुर्यकांत केशव**

ग्रामीण भागातील नागरिक, शेतकरी, विद्यार्थी तसेच निसर्गप्रेमींसाठी पळसाचा हा बहर आनंददायी आणि उत्साहवर्धक ठरत आहे. अनेक ठिकाणी नागरिक थांबून या निसर्गसौंदर्याचा मनमुराद आस्वाद घेताना दिसत असून, मोबाईल कॅमेऱ्यातून हे क्षण टिपण्याचाही मोह आवरत नाही.

होळी सणात पारंपरिक नैसर्गिक रंग तयार करण्यासाठी पळसाच्या फुलांचा वापर केला जात होता. आयुर्वेदात पळसाच्या फुलांपासून व झाडाच्या इतर भागांपासून विविध औषधे तयार केली जातात, ज्यांचा उपयोग अनेक आजारांवर केला जातो. वसंत ऋतूचे आगमन आणि पळसाच्या फुलांचा हा केशरी बहर निसर्गातील नवचैतन्याचे प्रतीक ठरत आहे. उन्हाळ्याच्या आगमनापूर्वीचा हा काळ म्हणजे निसर्गाचा उत्सवच असून, पळसाच्या फुलांनी संपूर्ण परिसर फुलून गेला आहे. निसर्गाशी नाते घट्ट करण्याची आठवण करून देणारा हा देखावा प्रत्येकाच्या मनाला आनंद देणारा ठरत आहे.

## अहमदपूर पोलिसांकडून जप्त केलेला गुटखा व दारू साठा नष्ट

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. ०८ मार्च :** अहमदपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गेल्या पाच वर्षांत विविध धाडींमध्ये जप्त करण्यात लाखो रुपयांच्या अवैध गुटखा आणि दारू साठा पोलिसांकडून नष्ट करण्यात आला. पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विनोद मेत्रेवार यांनी ही मोठी मोहीम राबविली.

यावाबत पोलीसांकडून मिळालेली सविस्तर माहिती अशी की, सन २०२१ ते २०२५ या कालावधीत अहमदपूर पोलिसांनी दारूबंदी कायद्यांतर्गत गुन्ह्यांमध्य दारू जप्त केली होती, तर गुटखाबंदीच्या गुन्ह्यात जप्त गुटखा करण्यात आला होता.



हा सर्व साठा नष्ट करण्यासाठी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी व जिल्हा सत्र न्यायालय अहमदपूर यांची रितसर परवानगी प्राप्त करण्यात आली होती. त्यानंतर जिल्हा दारूबंदी अधिकारी यांचे प्रतिनिधी दुय्यम निरीक्षक माकोडे आणि अन्न व औषध प्रशासन विभागाचे प्रमुख लोंढे यांच्या उपस्थितीत संयुक्त कारवाई करण्यात आली. दिनांक २ आणि ६ मार्च २०२६ रोजी अहमदपूर नगरपरिषदेच्या डंपिंग ग्राऊंडवर हा सर्व मुद्देमाल खड्डा खोदून, बाटल्या फोडून आणि गुटखा जाळून नष्ट करण्यात आला.

या महत्त्वपूर्ण कारवाईत पोलीस उपनिरीक्षक रवी बुरकुले, महिला पोलीस उपनिरीक्षक स्मिता जाधव, पोलीस हवालदार मनोहर राठोड, बाळू आरदवाड, गंगाधर चपडे, पोलीस कॉन्स्टेबल गणेश चव्हाण, दिलीप साबळे आणि होमगार्डच्या पथकाने सक्रिय सहभाग नोंदवला.

## युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर यांच्या वाढदिवसानिमित्त निलंग्यात विविध उपक्रम

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. ०८ मार्च :** युवा नेते अरविंदभाऊ पाटील निलंगेकर यांच्या वाढदिवसानिमित्त निलंगा शहर व तालुक्यात विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार दि. ९ मार्च २०२६ रोजी हा अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात साजरा होणार असून कार्यकर्त्यांच्या वतीने दिवसभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ७ वाजता महादेव अभिषेकाने होणार आहे. त्यानंतर सकाळी ८ वाजता पीरपाशा साहेब दर्गा, ८.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, तसेच ८.४५ वाजता दादापीर दर्गा येथे अभिवादन करण्यात येणार आहे.

यानंतर सकाळी ९ वाजता शासकीय उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांना फळवाटप करण्यात येणार आहे. तसेच समाजातील गरीब व होतकरू विद्यार्थ्याला शालेय साहित्याचे वाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्याचा उपक्रमही या निमित्ताने राबविण्यात येणार आहे.

सकाळी ९.३० वाजता डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर साहेबांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात येणार असून त्यानंतर ९.४५ वाजता छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात येणार आहे. तसेच निलंगा नगरपरिषदेतील स्वच्छता, पाणीपुरवठा व दिवाबत्ती कर्मचाऱ्यांना शिधा वाटप हा उपक्रम संजयजी हलगरकर यांच्या माध्यमातून राबविण्यात येणार आहे.

दरम्यान, संयोजन समितीच्या विनंतीवरून युवा नेते अरविंदभाऊ पाटील निलंगेकर हे दुपारी १ वाजल्यापासून अजंठा थिएटर येथे उपस्थित राहून सर्वांच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा स्वीकारणार आहेत.

या अभिष्टचिंतन सोहळ्यास नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, सभापती, नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, भारतीय जनता पक्षाचे सर्व पदाधिकारी, बूथप्रमुख, शक्ति केंद्र प्रमुख, कार्यकर्ते तसेच अरविंदभाऊंवर प्रेम करणारे नागरिक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन वाढदिवस संयोजन समिती व भारतीय जनता पार्टी परिवार निलंगा यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### व्हॉईस ऑफ मिडीयाच्या लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी
## ॲड. विनोद निला यांची निवड

**तभा वृत्तसेवा**

**चाकूर, दि. ०८ मार्च :** आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असलेल्या व्हॉईस ऑफ मिडीया या पत्रकार संघटनेच्या लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी पत्रकार ॲड. विनोद निला यांची नुकतीच सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. त्यांच्या पत्रकारितेतील सक्रिय कार्याची दखल घेत ही जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.



संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे, राष्ट्रीय महासचिव दिव्या भोसले व राज्याध्यक्ष अनिल मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य कार्याध्यक्ष विजय चोरडिया, विभागीय अध्यक्ष संगम कोटलवार आणि बालाजी फड यांच्या हस्ते ॲड. विनोद निला यांना लातूर येथील कार्यालयात नियुक्तीपत्र देण्यात आले.

यावेळी काकासाहेब गुट्टे, अनिल पुरी तसेच संघटनेचे जिल्हा कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.

ॲड. विनोद निला हे पत्रकारितेबरोबरच सामाजिक प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवणारे, सामान्यांच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचवणारे आणि निष्पक्ष पत्रकारितेसाठी ओळखले जाणारे व्यक्तिमत्त्व आहे.

त्यांच्या निवडीमुळे लातूर ग्रामीण जिल्ह्यातील पत्रकारांना नवे बळ मिळेल, असा विश्र्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

या निवडीबद्दल पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते व विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून ॲड. विनोद निला यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.

### विद्यार्थी सुरक्षा व भौतिक विकसन समितीची बैठक संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. ०८ मार्च :** लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात विद्यार्थी सुरक्षा व भौतिक विकसन समितीची बैठक संपन्न झाली . या बैठकीसाठी अध्यक्ष डॉ. संजय कुलकर्णी सचिव प्रशालेचे मुख्याध्यापक संजय कुलकर्णी, सदस्य ॲड अश्विनी कुलकर्णी, सुनिता नेलवाडकर, छाया कुलकर्णी, प्रिया दुरुगकर ,रमेश कांबळे प्रशालेचे उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर, पर्यवेक्षक कृष्णा मारावार,किरण नेमट, समिती प्रमुख श्रीपाद सन्मुखे उपस्थित होते.



## टेक्नोवा स्पर्धा संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. ०८ मार्च :** छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयामध्ये संगणक विभागाच्या वतीने कोड डिबगिंग,पोस्टर प्रेझेंटेशन, वेब डिझायनिंग आणि पीपीटी प्रेझेंटेशन अशा विविध तांत्रिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.विद्यार्थ्यांना तांत्रिक कौशल्य आत्मसात करता यावी यामुळे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेमध्ये लातूर आणि उदगीर महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. त्यामधून वेब डिझाईनिंग स्पर्धेमध्ये प्रथम शेख सुफियान व रेहान कादरी, द्वितीय कुलकर्णी श्रीकांत व वैभव अनिलवार, तृतीय भक्ती संजय कुंदबले व श्रुती तांबारे,पीपीटी सादरीकरण स्पर्धेत प्रथम ओम रायवाडी, द्वितीय प्राची चराटे, तृतीय बागबान भूसरा व चौधरी अफीफानाज, कोड डिबगिंग स्पर्धेत प्रथम अवधूत गिरी छत्रपती द्वितीय फलक जयस्वाल तृतीय शेख फिरदोज व शेख नवीरा तर पोस्टर प्रेसेंटेशन प्रथम श्रुती तांबारे द्वितीय गायकवाड अंजली तृतीय मिताली जायभाये यांनी क्रमांक पटकावले.

यावेळी बक्षीस वितरण ठेवण्यात आले. त्या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.आर.एम.मांजरे हे होते तर प्रमुख उपस्थिती डॉ.आर.बी.एडकर डॉ. विजयकुमार जाधव गुरनाळे व्हि. डी.यांची होती. यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. परीक्षक म्हणून प्रा.रसिद दायमी,डॉ. विजयकुमार जाधव यांनी काम पाहिले. ही स्पर्धा संगणक विभागप्रमुख प्रा.शेख झेड. ए., प्रा.मोरे एम.बी.प्रा. पटेल के. एन. प्रा. मुक्कावार पी. एस. यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. विद्यार्थ्यांच्या जास्तीत जास्त सहभागामुळे टेक्नोवा २०२६ या स्पर्धांना उत्तमरीत्या प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.मोरे एम.बी. यांनी तर आभार प्रा.मुक्कावार पी.एस.यांनी केले.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान समाधान शिबिराचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते उद्घाटन

### नागरिकांना शासकीय प्रमाणपत्रे, योजनांच्या लाभ पत्राचे वितरण

**तभा वृत्तसेवा**

**चाकूर, दि. ०८ मार्च :** छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाच्या पहिल्या टप्प्यात सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी आणि शासकीय योजनांचा लाभ एकाच छताखाली मिळवून देण्यासाठी चाकूर तालुक्यातील वडवळ नागनाथ येथे समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते झाले. तसेच यावेळी विविध शासकीय योजना मंजुरी प्रमाणपत्रे,दाखल्यांचे वाटप करण्यात आले.

रोहयो उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे, तहसीलदार नरसिंग जाधव, जिल्हा परिषद सदस्य भानुदास पोटे, पंचायत समिती सदस्य मिरावती कसबे, गजानन होनराव, भुजंगराव शिंदे, वडवळ नागनाथचे सरपंच मुरलीधर सोनकांबळे यांच्यासह वडवळ नागनाथ महसूल मंडळातील सरपंच व नागरिक यावेळी उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत समाधान शिबिरामुळे एकाच ठिकाणी विविध शासकीय सेवा, योजनांचा लाभ मिळत आहे.महसूल विभागामार्फत पांदण रस्ते, शेत रस्त्याची कामे केली जात आहेत. यासाठी सुटसुटीत धोरण तयार करण्यात आले आहे. तसेच विद्यार्थी, सर्वसामान्य नागरिकांसाठी आवश्यक दाखले वाटपाची कार्यवाही गतिमान करण्यात आली असल्याने नागरिकांची गैरसोय दूर झाली असल्याचे सहकार मंत्री पाटील यांनी सांगितले.राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकताच राज्याचा अर्थसंकल्प सादर केला असून शेती आणि ग्रामीण विकासाला गती देण्यासाठी यामध्ये भरीव तरतूद करण्यात आली असल्याचे ते म्हणाले.

उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे यांनी समाधान शिबिराच्या आयोजनाचा उद्देश सांगितला. या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, सेवा महसूल मंडळात एकाच छताखाली मिळाव्यात, यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.चाकूरचे तहसीलदार नरसिंग जाधव यांनी प्रास्ताविक केले. महसूल विभागाच्या योजना, सेवांची माहिती व लाभ देण्यासोबतच इतरही शासकीय विभागांच्या योजनांची माहिती समाधान शिबिराच्या माध्यमातून देण्यात येत आहे. या शिबिरात महसूल विभागाच्या जवळपास पंधरा सेवा देण्यात येत आहेत. तालुक्यातील सर्व महसूल मंडळांमध्ये या शिबिराचे आयोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी संजय गांधी निराधार योजना, प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत लाभार्थ्यांना प्रमाणपत्र, पुरवठा विभागामार्फत नवीन शिधापत्रिका,आरोग्य विभागामार्फत आयुष्यमान भारत कार्ड, दिव्यांग प्रमाणपत्र, महिला व बालविकास विभागामार्फत बेबी कीटचे प्रातिनिधिक स्वरूपात वाटप करण्यात आले. तसेच पशुसंवर्धन विभागामार्फत दुधाळ जनावरांच्या गटासाठी अनुदान धनादेश वितरण करण्यात आले.या कार्यक्रमामध्ये विविध शासकीय विभागांच्या अधिकाऱ्यांनी आपापल्या विभागांमार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. शिबिरानिमित्त उभारण्यात आलेल्या स्टॉल्सला सहकार मंत्री पाटील यांनी भेट देवून उपलब्ध सेवांची माहिती घेतली.



धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## गावठी कट्टा, स्कॉर्पिओसह ५.२८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ मार्च -**

शस्त्रबंदी व जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करून बेकायदेशीरपणे गावठी कट्टा बाळगणाऱ्या एका युवकावर येरमाळा पोलिसांनी कारवाई करत त्याच्याकडून स्कॉर्पिओसह लाखोंचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विकास कल्याण काळे (वय २३, रा. बोरी पाटी, ता. वाशी, जि. धाराशिव) याने मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी, धाराशिव यांनी लागू केलेल्या शस्त्रबंदी व जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करून बेकायदेशीररीत्या गावठी कट्टा जवळ बाळगला होता.

दि.६ मार्च रोजी पहाटे ३.४५ वाजण्याच्या सुमारास एनएच-५२ रोडवरील तेरखेडा शिवारातील सुर्या हॉटेलसमोर पोलिस पथकाने त्याला ताब्यात घेतले.

त्यावेळी त्याच्याकडून सुमारे २५ हजार रुपये किंमतीचा गावठी कट्टा, स्कॉर्पिओ (क्र. एमएच २५ ए २०७७) तसेच निळ्या रंगाच्या कॅनमध्ये ३५ लिटर डिझेल (किंमत अंदाजे ३,१८५ रुपये) असा एकूण ५,२८,१८५ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी येरमाळा पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## धानोरी येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान' समाधान शिबिर संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.८ मार्च -**

महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत टप्पा-१ मधील मंडळस्तरीय समाधान शिबिराचे आयोजन लोहारा तालुक्यातील धानोरी येथे करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन तहसीलदार रणजितसिंह कोळेकर यांच्या हस्ते झाले.



या शिबिरामध्ये महसूल विभागाच्या विविध योजनांअंतर्गत लाभार्थ्यांना लाभांचे वितरण करण्यात आले. एकूण ४७४ लाभार्थ्यांना विविध प्रकारचे लाभ देण्यात आले. यामध्ये प्रलंबित फेरफार प्रकरणे निकाली काढणे - १९, ७/१२ दुरुस्ती अर्जांवर कार्यवाही करून ११ अर्ज निकाली काढणे, डिजिटल ७/१२ वाटप - १२१, डिजिटल ८अ वाटप - १०५, तसेच जात प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवास प्रमाणपत्र आदी विविध प्रकारची १४७ प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. तसेच एक खिडकी योजनेअंतर्गत संजय गांधी योजना, इंदिरा गांधी योजना लाभ, आधार अद्ययावत करणे, शिधापत्रिका दुरुस्ती आदी ६१ लाभार्थ्यांना विविध सुविधा देण्यात आल्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार रणजितसिंह कोळेकर होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समिती सदस्य नागनाथ पाटील, प्रगती घोटाळे, नायब तहसीलदार अनिल आहिरे, मंडळ अधिकारी वाजीद मणियार यांची उपस्थिती होती.

यावेळी सरपंच, उपसरपंच, कर्मचारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## बसस्टँडला सोडण्याच्या बहाण्याने लुटमार

**उमरग्यात तिघांकडून २५ हजारांचा ऐवज लंपास...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ मार्च -**

बसस्टँडला सोडण्याच्या बहाण्याने एका व्यक्तीला बुलेटवर बसवून नेऊन मारहाण करत रोख रक्कम व मोबाईल हिसकावल्याची घटना उमरगा येथे घडली आहे. याप्रकरणी तिघा अज्ञातांविरुद्ध उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लक्ष्मण जनार्धन चंडकापुरे (वय ४८, रा. कोळसूर (क), ता. उमरगा, जि. धाराशिव) हे दि.४ मार्च रोजी पहाटे सुमारे ३ वाजता कोरेगाव रोडवरील एस.टी. बस डेपोच्या पाठीमागील रस्त्यावरून पायी जात होते.

यावेळी दत्ता मंदिर, उमरगा परिसरात बुलेट मोटारसायकलवर ट्रिपल सीट आलेल्या तीन अनोळखी इसमांनी त्यांना बसस्टँडला सोडतो असे सांगून बुलेटवर बसवले. त्यानंतर कोरेगाव रोडवरील एस.टी. बस डेपोच्या पाठीमागील रस्त्यावर नेऊन लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व त्यांच्या खिशातील रोख रक्कम व मोबाईल असा एकूण २५ हजार रुपये किंमतीचा ऐवज जबरदस्तीने हिसकावून घेतला. त्यानंतर तिघेही बुलेटवरून पळून गेले.

## तुळजापूर-नळदुर्ग न.पा.कडे पाणीपट्टी थकीत; १५ मार्चपर्यंत भरण्याचा इशारा




**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.८ मार्च -**

नळदुर्ग व तुळजापूर शहराला कुरनूर मध्यम प्रकल्प (बोरी धरण) येथून पाणीपुरवठा केला जात असून दोन्ही नगरपरिषदांकडे पाटबंधारे विभागाची मोठ्या प्रमाणात पाणीपट्टी थकीत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे संबंधित नगरपरिषद प्रशासनाने तातडीने थकीत पाणीपट्टीचा भरणा करावा, असे आवाहन नळदुर्ग पाटबंधारे उपविभागाचे अधिकारी रमेश टोकलवाड यांनी केले आहे.

पाटबंधारे विभागाच्या माहितीनुसार जानेवारी २०२६ अखेर तुळजापूर नगरपरिषदेकडे ६३.८३ लाख रुपये, तर नळदुर्ग नगरपालिकेकडे ४४.८१ लाख रुपये इतकी पाणीपट्टी थकीत आहे. याशिवाय तुळजापूर तालुक्यातील ९ ग्रामपंचायतींकडे सुमारे ७८ लाख रुपये पाणीपट्टी बाकी असल्याची माहिती देण्यात आली. दरम्यान, १५ मार्चपर्यंत थकीत पाणीपट्टीचा भरणा न केल्यास वरिष्ठांच्या आदेशानुसार वीज तोडणी करून पाणीपुरवठा खंडित करण्याची कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

## कक्कया महाराज जयंतीनिमित्त समाज मंदिर सभागृहाचे लोकार्पण

**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.८ मार्च -**

मुरूम शहरात वीरशैव समाजाचे आराध्य दैवत संत कक्कया महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिंदे गल्लीतील समाज मंदिर सभागृहाचे लोकार्पण मोठ्या उत्साहात पार पडले. पंचायत समिती सदस्या आकांक्षा चौगुले यांच्या हस्ते सोमवारी हा लोकार्पण सोहळा संपन्न झाला.



यावेळी सर्वप्रथम संत कक्कया महाराज यांच्या मूर्तीचे विधिवत पूजन आकांक्षा चौगुले यांच्या हस्ते करण्यात आले. शिवसेनेचे माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांच्या आमदार निधीतून शिंदे गल्लीतील समाज मंदिर सभागृहाचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. या सभागृहामुळे समाजाच्या विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांना भक्कम आधार मिळणार आहे.

कक्कया महाराज यांच्या जयंतीनिमित्त युवतीसेनेच्या मराठवाडा निरीक्षक तथा पंचायत समिती सदस्या आकांक्षा चौगुले मुरूम शहरात उपस्थित होत्या. यावेळी त्यांनी कक्कया महाराज यांच्या मूर्तीचे मनोभावे पूजन करून समाज मंदिर सभागृहाचे लोकार्पण केले. कार्यक्रमात समाजबांधवांमध्ये आनंद व समाधानाचे वातावरण दिसून आले.

या लोकार्पण सोहळ्याला संदीप चौगुले, भगत माळी, राजेंद्र कारभारी, झुंबर बनसोडे, किरण गायकवाड, प्रसाद मुदकन्ना, सचिन शिंदे, राजेंद्र कांबळे यांच्यासह जयंती उत्सव मंडळाचे अध्यक्ष, पदाधिकारी, नागरिक, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमानंतर आकांक्षा चौगुले यांनी किसान चौक येथील जोडलिंगेश्वर मंदिरात जाऊन महादेवाचे दर्शन घेतले व शहराच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली.

## अजिंक्य शाळेचे तीन विद्यार्थी सैनिक स्कूल प्रवेशासाठी पात्र

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.८ मार्च -**

फेब्रुवारी महिन्यात झालेल्या सैनिक स्कूल प्रवेशपूर्व परीक्षेत अजिंक्य प्राथमिक विद्यामंदिर शाळेचे तीन विद्यार्थी पात्र ठरले आहेत.

यामध्ये धवलसिंह दत्तात्रय कवडे याने ३०० पैकी २६८ गुण मिळवत राज्य गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे. तसेच सोहम राजे रामहरी जगदाळे (२२८ गुण) आणि श्रेया विश्वनाथ विश्वेकर (१३९ गुण) हे विद्यार्थी देखील सैनिक स्कूल तसेच एन.एस.एस. प्रवेशासाठी पात्र झाले आहेत.

या यशाबद्दल गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संस्थेच्या वतीने शाळेचे सचिव एस. एल. पवार यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी विद्यार्थ्यांचे पालक तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका एम. एन. माने उपस्थित होत्या.

पालकांनी शाळेची गुणवत्ता व स्पर्धा परीक्षांमधील यशाबद्दल समाधान व्यक्त करत शिक्षकांच्या कार्याचे कौतुक केले. एस. एल. पवार, स्वप्नाली माने आणि पल्लवी क्षीरसागर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या यशाबद्दल पात्र विद्यार्थ्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## महिलांनी स्वत:च्या गुणाची पारख केली पाहिजे : ज्योत्सना पाटील

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.८ मार्च -**

महिलांनी आपल्या अंगी असलेल्या गुणांची ओळख करून त्यांची जोपासना करत कुटुंब व समाजाच्या उभारणीत योगदान द्यावे. आजच्या स्त्रीला पूर्वीपेक्षा अधिक स्वातंत्र्य मिळाले असून ती प्रत्येक क्षेत्रात उच्च स्थानावर पोहोचली आहे. हे स्थान टिकवण्यासाठी स्त्रीनेच स्त्रीचा सन्मान करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्योत्सना पाटील यांनी केले.


स्वामी विवेकानंद व बसवेश्वर विद्यालयात महिला दिन साजरा

श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर व श्री महात्मा बसवेश्वर माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिन मोठ्या साजरा करण्यात आला. या वेळी संस्थेतील सर्व महिला कर्मचाऱ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमात ज्योत्सना पाटील प्रमुख वक्त्या म्हणून मार्गदर्शन करत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिरच्या मुख्याध्यापिका सविता लोहार या होत्या. या प्रसंगी बेबी सरोजा पवार, नेताजी गायकवाड, भागीरथी शिंदे, जैतून बी मेंडके, संगीता भावसार, सिमंता शेटगार, सुरेखा नारायणकर, सुमन कुंवर, रूपाली वेदपाठक, वर्षा शाही वाले, सोनाली कांबळे आदींची उपस्थिती होती. अध्यक्षीय समारोपात सविता लोहार यांनी सांगितले की, पूर्वीच्या महिलांपेक्षा आजच्या महिलांना अधिक स्वातंत्र्य मिळाले असून त्या संधींचा उपयोग स्वत:च्या प्रगती व उन्नतीसाठी करणे गरजेचे आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक वर्षा शाही वाले, सूत्रसंचालन संजय कोथळीकर यांनी केले, तर आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख समीर देशपांडे यांनी मानले. कार्यक्रमास दोन्ही शाळांतील विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

## गुढीपाडव्यानिमित्त सवलतीच्या दरात साखर वाटपाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ मार्च -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखान्याच्या वतीने गुढीपाडव्याच्या निमित्ताने सभासदांना सवलतीच्या दरात साखर वाटप उपक्रमाचा शुभारंभ दि.८ मार्च रोजी करण्यात आला.



या उपक्रमाचा शुभारंभ प्रा. भालचंद्र हुच्चे व उद्योजक शरद जाधव यांच्या हस्ते सभासद अनिलकुमार अजमेरा व माणिकराव खोचरे यांना साखरेचा कट्टा देऊन करण्यात आला. या प्रसंगी संस्थापक अध्यक्ष अरविंद दादा गोरे, व्हाईस चेअरमन हनुमंत भुसारे, संचालक ड. निलेश आण्णा बारखेडे पाटील, आबासाहेब देशमुख, युवराज राजे निंबाळकर, दिलीप गणेश, पुष्पकांत माळाळे, राजाभाऊ पाटील, जयंत नाना शिंदे, किसन मते, सदाशिव आप्पा कोळगे, बाळासाहेब मैरान, वैजनाथ गुळवे तसेच कारखान्याचे कर्मचारी गायकवाड, डोके, मंडलिक आदी उपस्थित होते.

साखर वाटप श्री तुळजाभवानी स्टेडियम, सुनील प्लाजा येथे तसेच आंबेडकर चौकात युवराज लॉजजवळ दि.८ मार्च ते १७ मार्च या कालावधीत सुरू राहणार असून सभासदांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन कारखान्याच्या वतीने करण्यात आले आहे.

## शांतिनिकेतनमध्ये शिवजयंतीनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात



**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.८ मार्च -**

शहरातील शांतिनिकेतन शाळेत शिवजयंतीनिमित्त दि.१९ रोजी सायंकाळी उत्साहात सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करून करण्यात आली.

यानंतर आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात बालगट तसेच इयत्ता पहिली ते चौथीतील विद्यार्थ्यांनी शिवचरित्रावर आधारित विविध कलाविष्कार सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

शिवरायांचे शौर्य, स्वराज्याची संकल्पना, मातोश्री जिजाऊंचे संस्कार आणि मावळ्यांचा पराक्रम या विषयांवर विद्यार्थ्यांनी भाषणे, पोवाडे, नृत्य, बालनाट्य व संवादात्मक सादरीकरणे केली.

या कार्यक्रमास संस्था अध्यक्ष शरणप्पा मुदकण्णा, सचिव सुषमा मुदकण्णा, तेजस्विनी मुदकण्णा, शिल्पा बिराजदार, प्रियंका सूतके, माया बोंदर, कीर्ती काशेट्टी आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक अब्दुलगनी बागवान तसेच शिक्षक मनोज बोंदर, नलिनी जाधव, स्वाती महामुनी, माधवी कलशेट्टी, मनीषा निंबरगे, रुपाली मुगळे, प्रिया वेदपाठक, सुनिता स्वामी, प्रज्ञा कांबळे, काजल कांबळे, मेघा भोसले, पल्लवी वाघमोडे, गोकर्णा चव्हाण, प्रतिक्षा गायकवाड, आराध्या तडकले, प्रभावती गिरिबा, शंकर अंबुसे आदींनी परिश्रम घेतले.

## स्पर्धांमध्ये यशस्वी विद्यार्थ्यांचा रोटरी क्लबकडून गौरव

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.८ मार्च -**

शिक्षणासोबत विविध कौशल्ये आत्मसात केल्यास आत्मविश्वास, चिकाटी आणि योग्य मार्गदर्शनाच्या बळावर कोणत्याही क्षेत्रात यश मिळवता येते. त्यामुळे करिअर नियोजनाला महत्त्व देत सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे मत पोलिस सहायक निरीक्षक श्रीकांत भराटे यांनी व्यक्त केले.



मायक्रोकॉम कम्प्युटर एज्युकेशन व रोटरी क्लब यांच्या वतीने विविध स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रा. डॉ. धनंजय मेनकुदळे होते. यावेळी नगरसेवक विजय दळगडे, मायक्रोकॉमचे संचालक प्रा. युसुफ मुल्ला आणि रोटरीचे सचिव प्रा. राजू जोशी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी इरफान मुल्ला, पंकज बेलकोणे, श्रीकांत कोळी, सुमैय्या जमादार, रमेजा मोमीन, प्रज्ञा जाधव, रेवती वाडीकर, भूमी गायकवाड, महेक जमादार यांनी पुढाकार घेतला. सूत्रसंचालन दिव्या सूर्यवंशी, तर आभार मोनिका जाधव यांनी मानले.

## वाढदिवसानिमित्त शिक्षकांची शाळेला आर्थिक मदत

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.८ मार्च -**

लोहारा तालुक्यातील आरणी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक व शिक्षकांनी वाढदिवसानिमित्त समाजाभिमुख उपक्रम राबवत शाळेच्या विकासासाठी आर्थिक मदत दिली.

शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय पांचाळ आणि सहशिक्षक मेघराज कदम यांनी वाढदिवस साजरा करताना होणारा अनावश्यक खर्च टाळून शाळेच्या गरजा लक्षात घेत शाळेला मदत करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार मुख्याध्यापक दत्तात्रय पांचाळ यांनी ७ हजार रुपये, तर सहशिक्षक मेघराज कदम यांनी ५ हजार रुपये शाळेच्या विकासासाठी दिले.

## महिला दिनानिमित्त तुळजाभवानी मंदिरात महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.८ मार्च -**

जागतिक महिला दिनानिमित्त श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर तसेच आरोग्य विभाग यांच्या वतीने महिला कर्मचाऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. मंदिर परिसरातील आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरास महिला कर्मचाऱ्यांचा प्रतिसाद मिळाला.



या शिबिरामध्ये रक्तदाब, रक्तातील साखर, हिमोग्लोबिन तसेच इतर आवश्यक तपासण्या करण्यात आल्या. उपस्थित डॉक्टरांनी महिलांना आरोग्याबाबत मार्गदर्शन करत नियमित आरोग्य तपासणी, संतुलित आहार व व्यायामाचे महत्त्व सांगितले. जिल्हाधिकारी तथा श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अध्यक्ष कीर्ती किरण पुजार यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मंदिर व्यवस्थापक (प्रशासन) माया माने यांच्या संकल्पनेतून या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन आर्ना पुजार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी यांच्या पत्नी सौमय्याश्री पुजार, मंदिर व्यवस्थापक माया माने यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी वैद्यकीय अधिकारी डॉ. वैशाली काळे यांनी विशेष सहकार्य केले. या आरोग्य तपासणी शिबिरामध्ये मंदिरातील स्वच्छता व सुरक्षा विभागातील महिला कर्मचाऱ्यांनी सहभाग घेत आरोग्य तपासणी करून घेतली. अशा उपक्रमांमुळे महिला कर्मचाऱ्यांच्या आरोग्याबाबत जागरूकता वाढण्यास आणि त्यांच्या आरोग्याची योग्य काळजी घेण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी मंदिर संस्थानचे जयसिंग पाटील, नागेश शितोळे, स्वच्छता निरीक्षक मनोज घोडगे, सुरज घुले, सहायक स्वच्छता निरीक्षक नितीन भोयर, सुरक्षा निरीक्षक ऋषिकेश पाटील, रिषभ रेहपांडे, श्रीकांत पवार तसेच डॉ. वैशाली काळे, महेश पाठक, शहाजी आवटे, विनोद मोरे व मंदिर परिसरातील आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जागतिक महिला दिनानिमित्त कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०८ मार्च :** येथील आधार सामाजिक संस्था व राजश्री फाउंडेशनच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला यावेळी संस्थेचे पदाधिकारी व परिसरातील नागरिक उपस्थित होते. आज सर्वच क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून अगदी त्याच्याही पुढे जाऊन कार्य करत आहेत, या महिलांचे मनोबल वाढावे, त्यांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने येथील आधार सामाजिक संस्था आणि राजश्री फाउंडेशनचे कार्यालय प्रकाश नगर याठिकाणी महिला बाल कल्याण विभागातील सेवानिवृत्त उप मुख्य कार्यकारी अधिकारी अड मल्लिकार्जुन करडखेलकर यांच्या शुभ हस्ते प्रा. अनिता गायकवाड, मुख्याध्यापक जयश्री ढवळे,डॉ. रुपाली येळीकर, पो. कॉ. अनिता सातपुते,रुकसाना मुल्ला, सौ. काळे यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष धनंजय कांबळे, सचिव प्रा. रविंद्र सुरवसे, प्रा. कल्याण कांबळे, प्रा. शिवशरण हावळे, प्रा. संगमेश्र्वर पानगावे, प्रा. बालाजी माने, रेश्मा कांबळे, ज्योती सुरवसे, अतुल कांबळे आणि संस्थेचे प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुरवसे, प्रास्ताविक बालाजी माने तर आभार संगीता कांबळे यांनी मानले.



## विविध वृत्त...

### प्रकल्प प्रदर्शनात जिजामाता विद्यालयाचे यश, जिल्हास्तरीय द्वितीय क्रमांक

**लातूर :** जिल्हास्तरीय अटल टिंकरिंग लॅब प्रकल्प प्रदर्शन २०२५-२६ मध्ये जिजामाता माध्यमिक विद्यालय, एम.आय.डी.सी., लातूर येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था मुरुड (जि. लातूर) यांच्या संयुक्त विद्यमाने या प्रकल्प प्रदर्शनाचे दयानंद कला महाविद्यालय लातूर येथे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विद्यालयातील मयुरी काळे यांच्या मार्गदर्शनाखाली इलेक्ट्रॉनिक प्रकल्प, शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली मेकॅनिकल प्रकल्प तसेच भाग्यशाली गुडे यांच्या मार्गदर्शनाखाली डिजिटल लिटरेसी प्रकल्प सादर करण्यात आले. प्रत्येक प्रकल्पासाठी दोन विद्यार्थ्यांचा सहभाग अशा एकूण आठ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला.

यामध्ये मेकॅनिकल विभागातील प्रकल्पाला जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. या प्रकल्पात मुंडे शुभम व सूर्यवंशी राधिका, शिंदे अधिष्ठा, अलोक वाघमोडे, वैष्णवी सोनवते, सूर्यवंशी राघव, वाघमारे श्रेया, चुनचुने शुभम या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शंकर पांचाळ, मयुरी काळे, भाग्यशाली गुडे व प्रा. सुधीर बाळापुरे यांचे संस्थेचे सचिव व शिक्षक आमदार विक्रम काळे, प्राचार्य अनिल बापू काळे तसेच प्राचार्या शुभांगीताई काळे, मुख्याध्यापक देविदास कोल्हे, प्रा. बाबासाहेब सोनवणे, राजकुमार शिंदे, गोकुळ मतकंटे, वैशाली वाघमारे व अर्जुन कांबळे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. .

### डॉ. संतुजी रामजी लाड यांची जयंती उत्साहात साजरी

**लातूर :** सत्यशोधक समाजाचे अग्रदूत, महात्मा ज्योतिबा फुले यांचे सहकारी तथा शिष्य हिंदु खाटीक समाज भूषण डॉ संतुजी रामजी लाड यांची १८५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

लातूर शहराती गांधी मार्केट परिसरात डॉ. लाड यांचा पुतळा बसविण्यात येणार आहे. त्या नियोजित पुतळ्याच्या ठिकाणीच हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष एड. . व्यकटराव बेंद्रे होते. तर प्रमुख पाहूणे म्हणून खा. डॉ. शिवाजीराव काळगे उपस्थित होते. यावेळी नवनिर्वाचित महापौर जयश्रीताई भालचंद्र सोनकांबळे, उपमहापौर ॲड. स्नेहल उटगे, गटनेते विजयकुमार साबदे, नगरसेविका सुजाता सौदागर, नगरसेवक अभिषेक पतंगे, बालाजी झिपरे, नगरसेवक गिरीश ब्याळे, नगरसेवक अँड. अतिश चिकटे, नगरसेवक उद्धव तेलंगे, नगरसेवक सचिन गायकवाड, नगरसेवक विनय जाकते, नगरसेविका जयश्री बाहेती, नगरसेविका करुणा शिंदे, सुनिल बसपुरे, शेख आ रफ, आसिफ बागवान, नगरसेविका सुरेखाताई ईगे, नगरसेवक गणेश गवारे, अँड रोहित सोमवंशी, तबरेज तांबोळी, नगरसेविका तबस्सुम शेख, नगरसेवक पवन सोलकर, नगरसेविका नसरीन शेख, इस्माईल शेख यांचा सत्कार डॉ. संतुजी लाड सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विश्वनाथ सौदागर, लातूर जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरसिंह घोणे, एन. डी. सोनकांबळे यांची उपस्थिती होती तर डॉ. संतुजी लाड चॅरिटेबल ट्रस्टचे एड. प्रदिपसिंह गंगणे, एटीएम ग्रुप अध्यक्ष ताहेरभाई सौदागर, भारत धाकपाडे, एड. दत्तात्रय इंगळे, अजीज बागवान, महादेव फिसके, भारत थोरात, शिवाजी तपासे, भारत वंजारे, दीपक इंगळे, माजी मुख्याध्यापक राजाराम काथवटे, शिवशंकर फिस्के, विक्रम सौदागर, संजय कांबळे, अनिल कांबळे, ॲड. औदुंबर कांबळे, दीपक गंगणे आदींची उपस्थिती होती.

### व्हिडीएफ ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्समध्ये तांत्रिक महोत्सवाचे आयोजन

**लातूर :** विलासराव देशमुख फाऊंडेशन ग्रुप ऑफ इन्स्टिट्युशन्स कॉलेज येथे मंगळवार दि. १० मार्च २०२६ रोजी राज्यस्तरीय तांत्रिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांमधील तांत्रिक कौशल्यांना वाव देणे, नवकल्पनांना प्रोत्साहन देणे तसेच संशोधनाची दृष्टी विकसित करणे या उद्देशाने हा महोत्सव आयोजित करण्यात येत असल्याची माहिती कॉलेजच्या वतीने देण्यात आली. आजच्या वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांनी केवळ सैद्धांतिक ज्ञानावर न थांबता प्रत्यक्ष प्रयोग, प्रकल्प आणि संशोधनाकडे वळावे, या अभिनव संकल्पनेतून 'कल्पनेतून नवसर्जन' या संकल्पनेवर हा राज्यस्तरीय महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या कल्पनांना तंत्रज्ञानाच्या मदतीने प्रत्यक्षात उतरवण्याची आणि व्यापक व्यासपीठावर मांडण्याची संधी मिळणार आहे. या महोत्सवामध्ये पेपर प्रेझेंटेशन, प्रोजेक्ट प्रदर्शन आणि तांत्रिक प्रश्नमंजुषा अशा विविध स्पर्धांचा समावेश असणार आहे. राज्यभरातील विविध पॉलिटेक्निकमधील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होणार असून त्यांच्या नाविन्यपूर्ण प्रकल्पांचे आणि संशोधनपर कल्पनांचे सादरीकरण या निमित्ताने होणार आहे. शिक्षण क्षेत्रातील नामांकित तज्ज्ञ, उद्योजक तसेच शिक्षणतज्ज्ञ उपस्थित राहणार असून ते विद्यार्थ्यांना नवतंत्रज्ञान आणि करिअरच्या नव्या संधींबाबत मार्गदर्शन करणार आहेत.

# रंगोत्सवात रंगली तरुणाई..!

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०८ मार्च :** लातूर शहर व परिसरात रविवारी रंगपंचमी उत्साहात साजरी करण्यात आली. अगदी सकाळपासून तरुणाई रंगोत्सवाच्या तयारीत असल्याचे पाहायला मिळत होते. शहराच्या प्रमुख रस्त्यावर सगळीकडे रंगाची उधळण करताना विविध वयोगटातील नागरिक दिसत होते. यामध्ये महिला आणि युवतींचा सहभागही उल्लेखनिय होता.

अनेक ठिकाणी होळीच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे धुलीवंदनाच्या दिवशीच रंग खेळला जातो. मात्र, लातूर शहर आणि उदगीर वगळता अन्य तालुक्यात होळीनंतरच्या पाचव्या दिवशी म्हणजे रंगपंचमीच्या दिवशी हा उत्सव हर्षोल्हासात साजरा केला जातो. मागच्या काही वर्षात लातूर शहराचा विस्तार झपाट्याने वाढला आहे. त्यामुळे शहराच्या सर्वच भागात हा उत्सव मौज - मस्तीच्या



वातावरणात साजरा करण्यात आला. शहरात ठिकठिकाणी डीजेच्या तालावर तरुणाई थिरकताना दिसत होती. लोकप्रिय गीतांच्या धुनीवर रंगाची उधळण केली जात होती. रंगपंचमी म्हटले की, रंग - भांग ओघाने आलेच. शहराच्या ठराविक भागात या दिवशी नागरिकांना थंडाईच्या माध्यमातून ही भांग उपलब्ध करून दिली जाते. काही ठिकाणी तर मित्रमंडळींना बोलावून आग्रहाने या थंडाईचा आस्वाद घेण्यास भाग पाडले जाते. यामध्ये शहरातील सेंट्रल हनुमान परिसर अग्रेसर असतो. या परिसरात रंगाची उधळण करणाऱ्यांना हे पेय उपलब्ध करून दिले जाते. त्याचा मोठ्या संख्येने आस्वादही घेतला जातो.

शहराच्या सुभाष चौक, खडक हनुमान, पटेल चौकसह गावभागात ठिकठिकाणी संगीताच्या तालावर रंगाची उधळण मुक्तकंठाने केली जात असल्याचे पाहायला मिळाले. बच्चेकंपनी तर भल्या सकाळपासूनच हातात पिचकाऱ्या घेऊन एकमेकांवर रंग उडवताना दिसत होते. ही मंडळी केवळ आपल्या सवंगड्यांच्या अंगावरच रंग उडवत नव्हती तर रस्त्याने जाणाऱ्या - येणाऱ्यांची अंगावर रंग उडवून आनंद व्यक्त करत होती. लहानमुले आनंदाने रंग खेळत असल्याचे पाहून अंगावर रंग का टाकला ? अशी विचारणाही कोणी करतांना दिसत नव्हते. दरवर्षी रंगपंचमीच्या दिवशी इतर लोकप्रिय गीताबरोबरच शोले चित्रपटातील ' होली के दिन दिल खिल जाते हैं , रंगो में रंग मिल जाते हैं ' हे गीतही ऐकायला मिळत होते. पन्नास वर्षे उलटून गेली तरीही या गीताची भारतीय प्रेक्षकांवरची जादू तसूभरही कमी झालेली नसल्याचे या निमित्ताने अनुभवायला मिळाले.

रंगपंचमीच्या दिवशी शहरातील हनुमान चौक, ट्युशन एरिया, पाच नंबर चौक, नवा रेणापूर नाका, संविधान चौक, राजीव गांधी चौक तसेच इतर महत्त्वाच्या चौक व गर्दीच्या ठिकाणी विशेष नाकाबंदी व कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. या ठिकाणी पोलिसांकडून संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवले जात असल्याचे पाहायला मिळाले.

महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने दामिनी पथकाकडून विशेष गस्त वाढविण्यात आली होती. काही युवकांकडून उत्साहाच्या भरात रॅश ड्रायव्हिंग, मोटारसायकलवर दोनपेक्षा अधिक जण बसून धोकादायक पद्धतीने वाहन चालविणे, स्टंटबाजी करणे तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणे असे प्रकार घडण्याची शक्यता वर्तवली जात होती. ती प्रत्यक्षात उतरली. वाहनांवर दोहांपेक्षा जास्त जण बसून अतिशय धोकादायकपणे वाहने चालवतानाही काही मंडळी आढळून आली. पोलीस प्रशासनाने नुकतेच फटाके सायलेन्सर धारक वाहनांवर कारवाई केली होती. तरीही रंगपंचमीदिवशी रिंग रोड परिसरात फटाके सायलेन्सरच्या गाड्या फिरताना आढळून आल्या. उत्साहाच्या भारत अनेकांकडून वाहतुकीच्या नियमांचे सर्रास उल्लंघन केल्याचेही पाहावयास मिळाले. एकंदर उत्साही वातावरणात रंगपंचमी, रंगोत्सव साजरा करण्यात आला.

## शिवसेना लातूर शाखेच्या वतीने शिवछत्रपती ग्रंथालयास ऐतिहासिक ग्रंथ भेट

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०८ मार्च :** प्रतिवर्षाप्रमाणे तिथीप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करताना शिवसेनेच्या लातूर शाखेच्या वतीने येथील शिवछत्रपती ग्रंथालयास ऐतिहासिक ग्रंथ भेट देण्यात आले.

याप्रसंगी एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे लातूर शहर प्रमुख दिनेश बोरा, शहर संघटक संदीपमामा जाधव, चंद्रकांत शिंदे, श्रीनिवास लांडगे, दत्ता भोसले, आकाश चामले , शंकर कलवले यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या सक्षम नेतृत्वाखाली राज्यात शिवसेनेची कारकीर्द दिवसेंदिवस बहरत आहे. सामान्यांना न्याय देण्यासोबतच तरुण पिढीला ऐतिहासिक वारशांची संपूर्ण माहिती मिळावी, त्यांच्या ज्ञानात कमालीची भर पडावी याकरिता दरवर्षी लातूर शहरातील शिवछत्रपती ग्रंथालयास ऐतिहासिक ग्रंथ भेट देण्यात येतात. या ग्रंथाचा उपयोग स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसह इतिहास अभ्यासकांना होताना दिसतो. शिव जयंतीच्या निमित्ताने अनावश्यक आणि अवास्तव खर्चाला फाटा देऊन छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावरील मौलिक ग्रंथ भेट देण्यात आले. या ऐतिहासिक ग्रंथांचा आपल्याला अतिशय उपयोग होत असल्याच्या प्रतिक्रिया यावेळी स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या.



## एआय अँड डिजिटल स्किल्स फॉर करिअर ग्रोथ विषयावर एक दिवसीय कार्यशाळा



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०८ मार्च :** दयानंद कॉलेज ऑफ कॉमर्स, लातूर येथे.४ मार्च २०२६ रोजी फ्युचर-रेडी स्टुडंट्स: एआय अँड डिजिटल स्किल्स फॉर करिअर ग्रोथ या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित केली. या कार्यशाळेत बीसीए, बीबीए, बी.कॉम, एमबीए, एम.कॉम आणि एमसीए या शाखेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल कौशल्यांचे आधुनिक करिअरमध्ये असलेले महत्त्व समजावून सांगणे हा होता.

या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी ग्रोथ स्टोरी कंपनीचे संस्थापक श्री. गौरव बाहेती आणि सौ. जान्हवी बाहेती होत्या. आपल्या भाषणात श्री. बाहेती यांनी स्पष्ट केले की तंत्रज्ञान माणसांची जागा घेणार नाही, परंतु जे लोक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करतील तेच भविष्यात आघाडीवर राहतील. त्यांनी विद्यार्थ्यांना डिजिटल कौशल्ये आत्मसात करण्याचे आणि नव्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान एम सी ए विभाग प्रमुख डॉ. एस. व्ही. स्वामी यांनी भूषविले. तसेच प्रा.श्री. एन. व्ही. पाटील हेही व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक प्रा. एस. एन. चेरकर यांनी केले, तर अतिथी परिचय सहाय्यक प्रा. धनश्री शर्मा यांनी करून दिला. आभार प्रदर्शन सहाय्यक प्रा. एस. एन. पाटील यांनी केले.

हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी माहितीपूर्ण आणि प्रेरणादायी ठरला. विद्यार्थ्यांना भविष्यातील करिअर संधींसाठी एआय आणि डिजिटल कौशल्यांनी सज्ज होण्याची प्रेरणा मिळाली.

## ग्रंथालय संघाचे वार्षिक सभासद नोंदणी अभियान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०८ मार्च :** लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाची सन २०२६ या वर्षासाठीची सभासद नोंदणी दि ७ मार्च रोजी पासून सुरु झाली आहे. लातूर जिल्ह्यातील सार्वजनिक शासनमान्य ग्रंथलयांनी 'आपापल्या तालुक्यातील तालुका प्रतिनिधीकडे दि. २५ मार्च २०२६ पर्यंत संस्था व व्यक्ती सभासद नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. उदगीर येथे सुर्यकांत शिरसे, राम मोतीपवळे, जळकोट-यशवंत कुलकर्णी, अशोक कारभारी, शिरुर अनंतपाळ-काशिनाथ बोडके, देवणी अनिल पाटील, निलंगा गुप्तलिंग स्वामी, औसा प्रभाकर कापसे, लातूर- राम मेकले, हुतात्मा स्मारक, लातूर, चाकूर- हावगीराव बेरकीळे, तुकाराम सुगावकर, अहमदपूर-अशोक खोडवे, नंदकुमार घोगरे, रेणापूर- सिध्देश्र्वर उकिरडे या तालुका प्रतिनिधींकडे आपली सभासद नोंदणी करावी,असे आवाहन जिल्हा ग्रंथालय संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

## सिध्देश्वर कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०८ मार्च :** स्त्री म्हणजे शक्ती, स्त्री म्हणजे प्रेरणा, स्त्री म्हणजे जीवनाची सुंदर कहाणी. स्त्री ही केवळ आई, बहीण, पत्नी किंवा मुलगी नसून ती समाजाची शक्ती आहे तिच्या कष्टांमुळे आणि समर्पणामुळे कुटुंब समाज भाणि देश प्रगती करतो असे जागतिक महिला दिनानिमित्त सिध्देश्वर कोलेज ऑफ फार्मसीच्य फार्मसीच्या प्राचार्या डॉ. शामलिला बावगे (जेवळे) मॅडम यांनी सांगितले.

दिं.८ मार्च जागतिक महिला दिनाचे औचित्य साधुन जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. या निमित्त महाविद्यालयात डॉ. शामलिला बावगे मॅडम आणि प्रमुख पाहुणे अश्विनी मॅडम, क्राती सुर्यवंशी मॅडम, यांच्या हस्ते वृक्षारोपण



करून हा दीन साजरा करण्यात आला. वक्ष लावा,वक्ष जगवा. झाडे आपल्याला प्राणवायू देतात, पर्यावरण स्वच्छ ठेवतात. आजचे वृक्षारोपण, उद्या चे जीवन आहे असे सुंदर मार्गदर्शन अश्विनी मॅडम नी केले. या प्रसंगी प्रा.आकाश पाटील, प्रा.भुईभार ऊषा, प्रा.शेळके सुप्रिया, प्रा. शिवणगे सागर ग्रंथपाल अलका कोरे सर्व विद्याथ्यर्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## पोलिसांकडून मोटारसायकल चोरी करून स्क्रॅप करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०८ मार्च :** लातूर शहरातील गर्दीच्या ठिकाणांहून मोटारसायकली चोरी करून त्या स्क्रॅपमध्ये रूपांतरित करणाऱ्या टोळीचा गांधी चौक पोलिसांनी पर्दाफाश केला असून या प्रकरणी चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. या कारवाईत चोरी केलेल्या मोटारसायकलींचे सुटे भाग तसेच एक मोटारसायकल असा एकूण सुमारे १ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून ७ गुन्ह्यांचा उलगडा करण्यात पोलिसांना यश आले आहे.

पोलीस ठाणे गांधी चौक हद्दीत मागील काही दिवसांत गुळ मार्केट, भाजी मार्केट तसेच बसस्थानक परिसरातील वर्दळीच्या ठिकाणांहून मोटारसायकल चोरीच्या घटना घडल्या होत्या. या प्रकरणी गांधी चौक पोलीस ठाण्यात विविध गुन्हे दाखल करण्यात आले होते. सदर गुन्ह्यांचा तपास सुरू असताना पोलीस निरीक्षक सुनिल रेजितवाड यांनी पोलीस अधिकारी, अंमलदार तसेच गुन्हे प्रकटीकरण शाखेला सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करून व गोपनीय बातमीदारांच्या माध्यमातून आरोपींचा शोध घेण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार विशेष पथके तयार करून तपासाची दिशा निश्चित करण्यात आली.

तपासादरम्यान पथकाने दि. ०६ मार्च २०२६ रोजी सापळा रचून आरोपी रफिक रहीमसाब शेख (वय ५१ वर्षे, रा. नायगाव उमरगा ता. चाकूर जि. लातूर, सध्या राहणार एकमिनार मस्जिदजवळ, आजमनगर लातूर) यास मोटारसायकल चोरी करताना रंगेहात पकडले. त्याच्या ताब्यातून हिरो होंडा कंपनीची क्क्र ऊश-श्रींश (एमएच-२४ एडी-४२२६) अंदाजे किंमत २५ हजार रुपये ही मोटारसायकल जप्त करण्यात आली. आरोपीकडे सखोल चौकशी केली असता त्याने गांधी चौक पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या अनेक मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यांची कबुली दिली. तसेच चोरी केलेल्या मोटारसायकली आपल्या साथीदारांकडे देऊन त्या स्क्रॅपमध्ये रूपांतरित करून सुटे भाग विक्रीस काढत असल्याची माहिती समोर आली.



त्यानुसार पोलिसांनी आरोपीचे साथीदार नजीर शमीम शेख,तालीफ महमद शेख, युसुफ इस्माईल शेख यांना अटक केली. आरोपींकडून चोरी केलेल्या मोटारसायकली स्क्रॅप करून वेगवेगळे केलेले सहा मोटारसायकलींचे सुटे भाग जप्त करण्यात आले. या कारवाईत पोलिसांनी एक मोटारसायकल व सहा मोटारसायकलींचे स्क्रॅप केलेले सुटे भाग असा एकूण १ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून गांधी चौक पोलीस ठाण्यातील मोटारसायकल चोरीचे एकूण ७ गुन्हे उघडकीस आले आहेत. या प्रकरणी पुढील तपास गांधी चौक पोलीस करीत आहेत.

सदर कामगिरी पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे व साहेबराव नरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुनिल रेजितवाड यांच्या नेतृत्वाखालील गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोउपनि गणेश चित्ते, एएसआय राजेंद्र टेकाळे, पोलीस अंमलदार राम गवारे, प्रकाश भोसले, रविसन जाधव, संतोष गिरी, सचिन चंद्रपाटले, शिवा भाडुळे, गोविंद सरवदे, अनिल कज्जेवाड, राहुल दरोडे, दीपक थोटे तसेच चालक गोविंद बेंबडे यांनी केली आहे.